**क्षेत्रीय महाव्यवस्थापक, वे.को.लि. वणी क्षेत्र, ता. वणी, जि. यवतमाळ यांच्या प्रस्तावित वाढीव उत्पादनाकरिता मे. वे.को.लि. कोलगांव विस्तारीत खुली खाण प्रकल्पांतर्गत विद्यमान उत्पादन क्षमता ०.६ दशलक्ष टन प्रति वर्ष वरुन ०.८० दशलक्ष टन प्रति वर्ष पर्यंत वाढ तसेच खाण लीज क्षेत्र ३९७.२५ हे.आर ते ५२०.६० हे.आर पर्यंत वाढीच्या प्रकल्पाच्या विस्तारीकरण प्रस्तावाबाबतच्या पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २०/०४/२०२६ |
| वेळ | : | सकाळी ११:०० वाजता |
| स्थळ | : | मनोरंजन केंद्र, कैलाशनगर कॉलनी, मुंगोली उप-क्षेत्र, ता. वणी, जि. यवतमाळ, महाराष्ट्र-४४५३०४. |

**प्रस्तावना:-**

क्षेत्रीय महाव्यवस्थापक, वे.को.लि. वणी क्षेत्र, ता. वणी, जि. यवतमाळ यांच्या प्रस्तावित वाढीव उत्पादनाकरिता मे. वे.को.लि. कोलगांव विस्तारीत खुली खाण प्रकल्पांतर्गत विद्यमान उत्पादन क्षमता ०.६ दशलक्ष टन प्रति वर्ष वरुन ०.८० दशलक्ष टन प्रति वर्ष पर्यंत वाढ तसेच खाण लीज क्षेत्र ३९७.२५ हे.आर ते ५२०.६० हे.आर पर्यंत वाढीच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक १० मे, २०२४ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-१ (अ) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

क्षेत्रीय महाव्यवस्थापक, वे.को.लि. वणी क्षेत्र, ता. वणी, जि. यवतमाळ यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक १५/१२/२०२५ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी यवतमाळ, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन व दैनिक नवराष्ट्र यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द टाईम्स ऑफ इंडीया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक १३/०३/२०२६ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२.
३. प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, VCA समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
४. प्रादेशिक कार्यालय/उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ.
६. जिल्हा परिषद, यवतमाळ.
७. जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ.
८. उप-विभागीय कार्यालय वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
९. नगर परिषद वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१०. तहसिल कार्यालय वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
११. पंचायत समिती कार्यालय वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१२. ग्राम पंचायत कार्यालय कोलगांव, ता. वणी, जि. यवतमाळ.
१३. ग्राम पंचायत कार्यालय चिकली, ता. वणी, जि. यवतमाळ.
१४. ग्राम पंचायत कार्यालय टाकळी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१५. ग्राम पंचायत कार्यालय येनाक, ता. वणी, जि. यवतमाळ.
१६. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ:- www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते १५ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश दिनांक २०/०४/२०२६ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आली होती:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत १६ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री. सुशिलकुमार राठोड, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. अनिल खंडागळे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) व इतर सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश, नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्ट्ये, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,

- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

**१) श्रीमती कल्पना रमेश टोंगे, सरपंच, ग्रामपंचायत येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येनक हद्दीतील जमिनी संपादित करण्यासाठी लावण्यात आलेल्या सेक्शन ०४ मध्ये उल्लेख केलेली शेतजमीन सेक्शन ०७ मध्ये १९.५५ हे.आर. ने कमी करण्यात आली. सदर वगळण्यात आलेली शेतजमीन प्रकल्पाला लागून आहे ती कसताना शेतकऱ्यांना त्रास (डस्ट मुळे पिक न येणे/डम्पिंगमुळे शेतात पाणी साचणे/जंगली जनावरे इत्यादी) होणार आहे. तसेच सेक्शन ०४ मध्ये उल्लेख केला असल्याने शेतकऱ्यांनी सदर जमिनींचे आर्थिक व्यवहार केले होते ते शेतकरी आता भूमिहीन झाले आहेत म्हणून आपणांस विनंती आहे की शिल्लक असलेली जमीन सुद्धा संपादित करण्याबाबत | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आपल्याकडे काही तरतूद आहे का? याची माहिती देण्यात यावी. | |
| २) | जमिनी अधिग्रहीत करून जवळपास १५ महिने झाले तरीसुद्धा अजून प्रकल्प बाधितांना नोकऱ्या मिळाल्या नाही तसेच भोगवटा २ असलेल्या प्रकल्प बाधितांचे ॲग्रीमेंट झाले नाहीयाचे कारण सांगण्यात यावे तसेच ही मागणी किती दिवसात पूर्ण करणार? याची माहिती देण्यात यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| ३) | जमीन गेलेल्या प्रकल्प बाधित शेतकरी महिला-पुरूषांना ह्याच ओपन खदानीत नोकरी मिळावी अशी आमची मागण आहे ती पूर्ण करणार का? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| ४) | प्रकल्पबाधित गावांमध्ये सामाजिक उत्तरदायित्व निधी (CSR) मधून करून द्यावयाच्या कामांचा आराखडा ग्रामसभेतून घेऊन विकासकामे करून देण्यात येणार का? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| ५) | कोळसा वाहतूकीसाठी रेल्वे लाईन टाकण्यात आली तरीसुद्धा कोलगाव-येनक-शिंदोला मार्गे ट्रकने कोळशाची वाहतूक चालूच आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून शेती पिकांचे सुद्धा नूकसान होत आहे. सदर वाहतूक कधी बंद करणार? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| ६) | बाधित गावांच्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत वेकोलि च्या मालमत्तेवर कर देण्यात येत होता तो मागील काही वर्षांपासून बंद करण्यात आला, सदर रक्कम ही शासन खाती जमा करण्यात येत असल्याचे वेकोलिचे म्हणणे आहे तरी सदर निधीचा उपयोग हा शासनाला न देता बाधित गावांमध्ये विकास कामांसाठी करण्यात यावा. अशी आमची मागणी आहे ती पूर्ण करणार का? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| ७) | कोळसा उत्खननासाठी दररोज होणाऱ्या ब्लास्टींगमुळे प्रकल्पबाधित गावांमध्ये जमिनीतील पाण्याच्या स्तर अतिशय खाली जातो, गावातील घरांच्या भिंतीना तडे जातात ही अतिशय गंभीर समस्या आहे त्यामुळे यावर काय उपाययोजना करण्यात येणार आहे याबद्दल माहिती द्यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ८) | परियोजना बाधित गावांमध्ये ग्रामस्थांना प्रदूषणामुळे होणाऱ्या आजारांसाठी सी.एस.आर. अंतर्गत वेकोलिच्या हॉस्पिटलमध्ये किंवा अन्य संलग्न हॉस्पिटलमध्ये मोफत उपचार करण्याची तरतूद करण्यात येणार का? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| ९) | सदर प्रकल्पात जर नाला वळती करणार असाल किंवा जास्तीचे पाणी उत्पन्न होणार असेल तर सदर पाण्यावर प्रक्रिया करून ते शेतीच्या उपयोगासाठी किंवा पिण्याचे पाणी म्हणून कसे उपयोगात आणता येईल याविषयी बाधित गावांच्या ग्रामसभेमध्ये माहिती देण्यात यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| १०) | सदर प्रकल्पामुळे उत्पादन होणाऱ्या कोळशाच्या वाहतूकीदरम्यान धूळ व इतर कारणांमुळे शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे नूकसान होते किंवा रस्ते खराब होतात ते रोखण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा बांबू लागवड किंवा वाहतूकीच्या अन्य पर्यायी मार्गाची व्यवस्था करावी जेणेकरून कोळसा वाहतूकीमुळे शेतकऱ्यांना त्रास होणार नाही. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| ११) | सदर अधिग्रहीत जमिनीला लागून असलेल्या शेतजमीनीच्या उत्पादन क्षमतेवर परियोजनेमुळे कोणताही वाईट परिणाम होणार नाही याची काय काळजी घेण्यात येणार? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| १२) | सदर प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या कंत्राटी रोजगारासाठी प्राधान्याने प्रकल्पबाधित गावातील बेरोजगार युवकांनाच रोजगार देण्यात यावा. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| १३) | वेकोलिच्या डम्पिंग वर घनदाट ऑस्ट्रेलियन बाभळीचे जंगल निर्माण होते ते जंगली जनावरांचे वास्तव्य बनले आहेत सहज शिकार उपलब्ध होत असल्याने त्या ठिकाणी वाघ सुद्धा असतात त्यामुळे मजूर वर्गाच्या तसेच गावकऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| १४) | तसेच डम्पिंगच्या जवळ असलेल्या शेतजमिनीतील पिकांची नासाडी ही जनावरे करतात. यासाठी काय उपाययोजना करणार? वेकोलिकडून संबंधितांना नूकसान भरपाई देणार का? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| १५) | गावातील जमीन मोठ्या प्रमाणात संपादित झाल्यामुळे दुधाळ जनावरे पालकांना चराईसाठी जागा राहिलेली नाही अशा लोकांसाठी पडीक जमीन उपलब्ध करून देणार का? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| १६) | प्रकल्पामुळे जेवढी झाडे तोडण्यात येणार त्या ठिकाणी किंवा पर्यायी जागेवर नवीन वृक्षारोपण करणार का? | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## २) श्री. संदीप महाजन जेनेकर, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे.को.लि.ने या क्षेत्रात १२७ हेक्टर जमीन संपादित केली आहे. कोलगांव टाकळी व चिखली येथील शेतकऱ्यांना रोजगार मिळणार आहेच परंतु शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतमजुरांना या प्रकल्पामध्ये किती प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहे याची माहिती देण्यात यावी. शेतजमीन कमी झाल्यामुळे शेत मजूरांना काम मिळणार नाही व वेकोलि मध्ये स्थानिकांना रोजगार देखील देण्यात येत नाही. वेकोलितून कोलगांवकडे जाणारा रस्ता वेकोलिने निर्माण केला असून त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे आहे. त्यामुळे कोलगांव येथील नागरीकांना त्रास होत आहे. त्यामुळे सदर रस्त्याची दुरूस्ती करण्यात यावी. कोलगांव चेकपोस्ट ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सिमेंट रस्त्यापर्यंत असलेल्या रस्त्याचे काम त्वरीत सूरू करावे जेणेकरून स्थानिकांना त्रास सहन करावा लागणार नाही. वेकोलिचे ताडाली येथील क्षेत्रीय कार्यालयाचे स्थानांतरण करून वणी येथे देण्यात यावे जेणेकरून स्थानिकांच्या समस्या मांडणे सोईचे होईल. आमची मागणी आहे की, सदर कार्यालय पुनवट किंवा वणी शहरात स्थानांतरीत करण्यात यावे. कोलगांव खाणीमध्ये होत असलेल्या ब्लास्टींगमुळे कोलगांव येथील घरांना, शासकीय शाळांना व दवाखान्यांना तडे | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | जात असून वेकोलिने सर्वेक्षण करून त्याची दुरूस्ती करून द्यावी किंवा त्याची नूकसान भरपाई द्यावी. वेकोलिने वळविलेल्या नाल्यामुळे पावसाळ्यामध्ये शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नूकसान होत आहे. गट क्रं. १६१/४, १६१/१, १६०/१, १६०/२, १६९/१ व १६९/२ या शेतकऱ्यांचे दरवर्षी मोठ्या प्रमाणात नूकसान होत आहे. वे.को.लि.ने या शेतकऱ्यांना तात्काळ नूकसान भरपाई द्यावी. वे.को.लि.तर्फे कोणत्याची प्रकारचे सर्वेक्षण केले जात नूसन टाळाटाळ करण्यात येत आहे. परिसरातील ऑस्टेलियन बाभळीमुळे जनावरांचा वावर वाढत असून त्यामुळे शेतकऱ्यांचे नूकसान होत आहे. त्यामुळे सदर ऑस्ट्रेलियन बाभूळ लवकरात लवकर साफ करून देण्यात यावी. वे.को.लि.कडे तक्रार केली असता त्याचे उत्तर आम्हाला मिळत नाही. आमच्या तक्रारींवर वे.को.लि. ने ७-८ दिवसात उत्तरे द्यावी. वे.को.लि. वणी क्षेत्रातील पैनगंगा कोळसा खाणीतून निघणाऱ्या कोळशाची वाहतूक वणी तालुक्यातून करण्यात येते. त्यामुळे वाहतूकीचा प्रश्न निर्माण होत आहे. माझी विनंती आहे की, वे.को.लि.ने पर्यायी मार्गाची व्यवस्था करून वाहतूक करावी. वे.को.लि.ने चांगल्या दर्जाचे रस्त्याचे बांधकाम करावे जेणेकरून अपघातांचे प्रमाण कमी करणे शक्य होईल. या वर्षी बोरगांव ते शिंदोला या रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतीचे वे.को.लि. व महसूल विभागाद्वारे सर्वेक्षण करण्यात आले परंतु आजपर्यंत मोबदला मिळालेला नाही. | |

### ३) श्री. वसंत लक्ष्मणराव मुसळे, चिखली, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | दि. ०१/०४/२००९ रोजी कोलगाव खाणीने ९३०.७३ हेक्टर जमीन अधिग्रहीत करण्याचे प्रस्तावित होते. त्यापैकी ५२०.६० हेक्टर जमीन अधिग्रहीत केलेली आहे. उर्वरित ४१०.१३ हेक्टर जमीन अधिग्रहीत | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, उपस्थितांनी माईक्रोफोन व्यवस्थित ॲडजस्ट |

| | | |
|---|---|---|
| | केलेली नाही. वे.को.लि.ने उर्वरित जमीन अधिग्रहीत केल्यानंतरच वाढीव उत्पादनाची परवानगी देण्यात यावी. टाकळी येथील स. नं. १९, ७५, ६७ व ७१, चिखली येथील १८, १९, २० व ०९, येनक येथील १५२, १९७, १९८, २०३ व २०१ ही जमीन अधिग्रहण न केल्यामुळे शेती करणे अवघड झाले आहे. दि. ०७/०४/२०२६ रोजी मी ऊर्जाग्राम येथील वे.को.लि. च्या क्षेत्रीय कार्यालयात पत्र दिले आहे. वे.को.लि.ने जमीन अधिग्रहीत न केल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. आमच्या प्रश्नांकरिता ऊर्जाग्राम येथील क्षेत्रीय कार्यालयास पत्र दिले आहे. ग्रामपंचायत चिखली यांनी दोन वेळा ग्रामसभेचा ठराव घेऊन पत्राद्वारे मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे निदर्शनास आणून दिले परंतु आजतक कार्यवाही केली नाही. हवेत उडणारे धुळीचे कण शेतात उभ्या असलेल्या पिकांवर पडल्यामुळे शेतीतील पिकांचे प्रमाणात घट होते. तसेच अनेक निकांच्या माध्यमातून अन्नाद्वारे पोटात गेल्यामुळे अनेक आजारांना तोंड द्यावे लागते. हवेच्या माध्यमातून धुळीचे कण नियमित जमीनीवर पडल्यामुळे जमीनीची उपजन शक्ती कमी होऊन जमीन बंजर होऊन कालांतराने ही जमीन बंजर होऊन कोणतेच पिक घेणार नाही व ही जमीन पडीत राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. कोळसा काढते वेळी ब्लास्टींग करण्यात येते. त्यामुळे जमीनीत भेगा पडतात. त्याचा परिणाम शेतातील पिकांवर पडतो. कोळसा उत्खननामुळे व ब्लास्टींगमुळे जमीनीतील पिण्याचे पाणी खाली जात आहे. त्यामुळे शेतातून उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून शेतात बोरींग खोदून ओलीत करण्यात आले. परंतु पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे बोरींगला पाणीच नाही. त्यामुळे शेतातील बोरींगला पाणी येत नसल्यामुळे ओलीत होऊ शकत नसल्यामुळे नाईलाजाने बंद पडल्यामुळे बोरींग जमीनीतून काढावे लागले. ब्लास्टींगमुळे भेगा पडल्यामुळे ग्रामपंचायत चिखली यांचे घर पाडण्याबाबत पत्र दिले त्याप्रमाणे कार्यवाही केली. घर पाडले परंतु घर पाडल्यामुळे | करून बोलावे जेणेकरून व्हिडीओ रेकॉर्डींगमध्ये आवाज स्पष्ट येईल.<br><br>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी त्यांचा परिचय दिला. |

| | | |
|---|---|---|
| | नूकसान झाले परंतु नूकसान भरपाई दिल्या गेली नाही. कोलगाव प्रोजेक्टनी शेतीतील उत्पन्न होणारी जमीन घेतली व ज्या जमीन उत्पन्न होत नाही ती जमनी तशीच ठेवली आहे. प्रोजेक्टसाठी ज्या शेतकऱ्यांची जमीन घेतली त्या शेतकऱ्यांच्या घरात ०४ मुलांचा संसार अवलंबून होता. त्यापैकी एक सदस्यांना नौकरी दिली. परंतु प्रोजेक्टनी इतर कुटुंबातली सदस्यासाठी रोजगार निर्मिती केली नाही त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढले. त्यामुळे ही मंडळी व्यसनाधीन झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे आत्महत्यांचे प्रमाण दिवसेनदिवस वाढत आहे. शेतातील पिकांचे प्रमाण घटल्यामुळे संसार करण्यास अडचण निर्माण होऊन नाईलाजाने आत्महत्या करतो. यवतमाळ जिल्ह्यात १९८६ मध्ये पहिली आत्महत्या झाली आहे याची नोंद आजपर्यंत घेण्यात आलेली नाही. शेतकऱ्यांनी उपजत काळी जमीन प्रोजेक्टसाठी दिली. म्हणजेच स्वत:च्या आत्मा दिला. म्हणजेच शरीराचा सांगाळा घेऊन मुकळीक जीवन जगत आहे. म्हणजेच भारत सरकार कोलगावला नवी दिल्ली दिनांक ०१/०४/१९९९ अन्वये कोयला खदानाला हस्तांतरीत केली. त्या जमीनीपैकी ५२०.६० हे.आर जमीनीवर कोयला प्रोजेक्टवर कार्यान्वित केला. कोयला प्रोजेक्टला शेतकऱ्यांची ४१०.१३ हेक्टर जमीन प्रोजेक्टसाटी घेण्यात आली नाही. प्रथम उर्वरित जमीन घेण्यात यावी. नंतरच विस्तारीत जमीनीची सुनावणी घेण्यात यावी. महोदय, संदर्भिय पत्रामध्ये विस्तार प्रकल्पास ३९२.६७ हेक्टर खाण पहा. तसेच खाण मर्यादेबाहेरील क्षेत्राकरिता पर्यावरण मंजूरी प्रदान करण्यात आल्याचे नमूद केले आहे. सुधारीत प्रकल्प अहवाल करताना विस्तार क्षेत्राचा खसरा नकाशा आणि ७/१२ महसूल विभागामध्ये उपलब्ध नव्हते असे नमूद केले आहे. बोर्डानी प्रस्तावित जागेचा नकाशा व ७/१२ नसताना मंजूरी कशी दिली. महसूल विभागात ही माहिती काम्पूटर काळात उपलब्ध आहे. प्रस्तावित जागेचा नकाशा व सात बारा घेऊन माहिती घेतली व माहिती तयार केली अशी माझी धारणा आहे. | |

शेतकऱ्यांना नकाशा व ७/१२ लक्षात आणून न देण्याचा उद्देश असावा अशी खात्री आहे. त्यामुळे संदर्भिय पत्रासोबत माहिती जोडली नाही. सुनावणी कशी घेतात हे आश्चर्य आहे. शकतऱ्यांची जमीन अधिग्रहण करते वेळी संदर्भिय पत्रामध्ये नमूद केले. चारही बाजूनी कोलमाईन्स क्षेत्र असल्यामुळे तसेच मातीचे ढिगाऱ्यावर वृक्षारोपण केल्यामुळे जंगल निर्माण झाले. तसेच वाघासारखी जंगली प्राणी या अंतर्गत आहे. शेतात येऊन शेतातील पिकांचे नूकसान होत आहे. या बाबत मुख्य प्रबंधन कार्यालय, ऊर्जानगर, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर स्वत: भेटून दि. ०७/०४/२०२६ अन्वये निदर्शनास आणून दिले. प्रथम प्राधान्यानी उर्वरित हस्तांतरणाची कार्यवाही केल्यास शेतकरी आभारी राहील.

१. वायु पर्यावरण:-

कोळसा उत्खननासाठी खाणीमध्ये ब्लास्टींग करतात. तेव्हा धुळीचे कण हवेत धूळ निर्माण होते. कार्यालयाची १२ ठिकाणी गुणवत्तेचे निरीक्षण केले. न्यु कोलगांव व टाकळी अनुक्रमे ७०-७९ असे दर्शविले. परंतु चिखली गावाबात उल्लेख नाही. चिखली खाण गावाला लागूनच आहे. वरील गावापेक्षा जास्तच आहे. त्याळे येथील रहिवाशांना प्रदूषण मोबदला २००५ पासून देण्यात यावा. नदीच्या पलीकडे गाडेगांव कोळसा खाण व सिमेला लागून एसीसी सिमेंट फॅक्ट्री आहे. सीएसआर फंडची निर्मित प्रोजेक्ट निर्माण करते. त्या फंडाचा दत्तक गावात मिळत नाही. रोजगार निर्मित करण्यात येत नाही. जो फंड मिळतो. बांधकामावर करतो. उदाहरण द्यायचे झाल्यास चिखली ते परमडोह हा रस्ता तयार केला. परंतु आज तो साधा दिसतच नाही. सीएसआर हा फंड प्रोजेक्टच्या दत्तक गावांवर खर्च करण्यात यावा. चिखली ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत ठराव घेऊन ब्लास्टींगमुळे घरांची भिंत पडून दुर्दैवी मृत्यू झाली अशी नोंद केली. परंतु शासन दरबारी साधी दखल सुद्धा घेतली नाही. निरीक्षण कालावधीत

परिसरातील पाण्याच्या गुणवत्तेचे मुलयमापन करण्यात आले. प्रत्येक महिन्यात पिण्याचे पाण्याचे ०६ नमूने गोळा केले. असे ३६ नमूने गोळा केले. किती कालावधीत केले याची नोंद नाही. तपासणीत काय आढळले. ग्रामस्थांना माहितीसाठी ग्रामपंचायतीला देणे गरजेचे होते परंतु अशी कोणतीच कार्यवाही झाली नाही. गुणवत्तेबाबत शंका निर्माण होते. दत्तक गांवामध्ये आजतागायत पाण्याचे नमूद कोलमाईन्सनी घेतलयाची ग्रामपंचायत रेकॉर्डला नोंद नाही भेट दिल्याची नोंद नाही.

**सामाजिक आर्थिक स्थिती:-**

प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराची संधी निर्माण झाल्या असे नमूद आहे. परंतु या बाबत कोलगाव प्रोजेक्टची कोणतीच कार्यवाही केली. सीएसआर फंड रोजगार निर्मितीसाठी दत्तक गावामध्ये खर्च केला नाही. बेरोजगारीचा कास दिवसेंदिवस पडत आहे. आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. पायाभूत सुविधा निर्माण केलीच नाही. सामाजिक व आर्थिक वातावरण सकारात्मक परिणाम झालेला नाही. आजतागायत सूविधा निर्माण केल्या नाही. समाजामध्ये दरी निर्माण झाली आहे. कितेक लोकांचे संसार डबघाईस आले आहे.

**पर्यावरणावर अपेक्षित प्रभाव आणि त्यांना शमविण्यासाठी उपाययोजना:-**

पर्यावरणासाठी झाडे लावलेले आहे असे नोंदी असेल परंतु प्रत्यक्ष पाहणी केली. झाडे लावलेले दिसून येत नाही. आजतागायत पर्यावरणासाठी कोणतीही योजना कार्यान्वित केली नाही.

**प्रदूषण करण्यासाठी उपाययोजना:-**

रस्त्यांवर पाणी फवारणी आजतक केली नाही. रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले नाही. ते केले तरी अल्पकाळात निघून जाते (०१ वर्षे).

कोळसा वाहतूक करणाऱ्या ट्रकला ताडपत्री आजतक घातली नाही. त्यामुळे प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. ताडपत्री तर टाकतच नाही.

| | | |
|---|---|---|
| | वाहतूकीमुळे धूळ हवेच्या दाबामुळे सभोवताल पसरते. ही धुळ जवळपास ८ ते १० किमी पसरते. त्यामुळे शेतातील पिकांवर पडून पिकांवर पाने काही दिवसातच व जमीन सुद्धा उपजावू राहत नाही. या बाबत गावकऱ्यांनी तक्रार केली. शेतकऱ्यांचे वैयक्तिक नूकसान आहे. याबाबत शासनाने कमेटीची स्थापना केली. त्यांनी उंबरणा पद्धतीने अहवाल दिला. त्यामुळे शेतकऱ्यांना नूकसान भरपाई मिळाली नाही. रस्त्यांच्या बाजूंनी कुठेच हिरवी पट्टी लावलेली नाही. चिखली खाण गावाला लागून १०० फुटावर आहे. त्यामुळै पूर्ण गावात पसरून गावात धुळीचे चादर पसरल्याचे दिसून येते. केंद्रीय प्रदूषणण नियंत्रण मंडळ CPCB च्या नियमानूसार हवामान गुणवत्तेचे नियमित निरीक्षण केले जाते असे नमूद आहे. तर ही बाब ग्रामपंचायतीच्या निदर्शनास आणून दिली नाही. एकंदरीत १० पर्यायी उपाय सुचविले आहे. याची अंमलबजावणी होत नाही.<br>**<u>वायु प्रदूषण नियंत्रण वृक्षारोपण:-</u>**<br>प्रकल्प निर्मितीपासून किती वृक्षारोपण केले व किती अस्तित्वात आहेत याचे निरीक्षण केल्यास १ टक्का सुद्धा दिसणार नाही. उत्खननाने निर्माण झालेली माती टाकली. तिथे वृक्षारोपण दिसते. तिथे जंगल निर्माण झाले आहे. त्यामध्ये वाघासारखे हिंस्त्र प्राणी आहेत. दररोज गावावर व जनावरांवर हल्ला करतात. ही चाखली ग्रामसभेने निदर्शनास आणून दिली आहे. परंतु कोणतीच उपाययोजना केली नाही.<br>**<u>पाण्याची गुणवत्ता:-</u>**<br>पाण्याची पातळी खाली गेली आहे. शेतामधील बोरींगला पाणीच येत नसल्यामुळे ओलीत होऊ शकत नाही. लोकांनी बुजवून टाकले. खाणीचे पाणी शेतात जावून शेतकऱ्यांचे नूकसान झाले ही बाब महाप्रबंधक वेकोलि ताडाळी यांना तहसिलदार वणी यांचे पत्र क्रं. अका/संदर्भ/कावि/२०१८ ०५/०७/२०१८ व दि. १८/१२/२०१८ अन्वये योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळविले परंतु कार्यवाही झाली नाही. मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे पत्र | |

| | | |
|---|---|---|
| | क्रं. राजस्व-३/भू.स./कावि८७१/१७ दि. ०७/०८/२०१७ अन्वये कार्यवाही करण्याबाबत नमूद केले परंतु कार्यवाही केली नाही. जय भूविज्ञान कोणतीही योजना राबविली नाही. भुजल संवर्धनाचे उपाय बाबत कोणतीच योजना राबविण्यात आली नाही. ध्वनीची गुणवत्ता याबाबत कार्यवाही आजतक केलीच नाही.<br>**<u>जमीन खाणी पुनर्भरण परिणाम:-</u>**<br>खाण क्षेत्रातील जमीनीवर मुख्य परिणाम म्हणजे शेती योग्य जमीनीचे नूकसान होते ही बाब आपण मान्य केली आहे. त्यामुळे मध्ये सोडलेले सर्वे नंबर घेण्याबाबत कार्यवाही करावी. खाण संपल्यानंतर ती जमीन शेती योग्य करून आम्हाला परत करावी जेणेकरून आमच्या पुढील पिढीला उपजिविकेचे साधन मिळेल.<br>**<u>चिखली गावाचे पुनर्वसन करणे:-</u>**<br>मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे पत्र क्रं. अका/पुनर्व/कावि/१४०/२०२० दि. ०९/११/२०२० संदर्भिय पत्राचे अनुषंगाने मुख्य प्रबंधक, वणी नॉर्थ एरिया भालर, उपविभागीय अधिकारी वणी उपक्षेत्रिय प्रबंधक उकणी खाण, क्षेत्रीय प्लॅनिंग ऑफिसर, वणी नॉर्थ क्षेत्र अन्वये नियमानूसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश दिले. परंतु आजतागायत कार्यवाही झाली नाही. कार्यवाही शिघ्र केल्यास आभारी राहील. | |

### ४) <u>श्री. विजय शामराव गारगाटे, उप-सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनावणी कोलगाव विस्तारीकरण प्रकल्पाकरिता घेण्यता येत आहे. कोलगाव विस्तारीकरण प्रकल्पामध्ये कोलगाव, चिखली, टाकळी व येनक या चार गावातील जमीनीचे संपादन करण्यात आले. १२७ हेक्टर जमीनीपैकी १०१ हेक्टर | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपण आपले मुद्दे मांडावे. प्रकल्प प्रवर्तकांतर्फे सर्व प्रश्नांची एकाच वेळी उत्तरे देण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | जमीन येनक या गावातील संपादित करण्यात आली असून सदर जनसुनावणी येनक या गावात घेणे अपेक्षित होते. येनक गावातील शेतकरी किती प्रमाणात या ठिकाणी पोहोचु शकले याची माहिती देण्यात यावी. वे.को.लि.ने येनक गावातील नागरीकांना जनसुनावणीच्या ठिकाणी आणण्याची व्यवस्था केली आहे काय? सदर जनसुनावणी येनक ग्रामपंचायतीच्या कार्यालयात किंवा येनक गावातील सभागृहात होणे अपेक्षित होते. वे.को.लि.चे प्रशासन इंग्रजी शासनापेक्षा जुल्मी प्रशासन आहे. जनसुनावणीदरम्यान प्रकल्पबाधित गावातील सरपंचांचे म्हणणे ऐकून घेण्यात यावे. परंतु यापूर्वी देखील कोलगाव खाणीकरिता याच ठिकाणी महसूल भवन, वणी येथे जनसुनावणी घेण्यात आली होती. तसेच कोलगांव उप-क्षेत्र येथे जनसुनावणी घेण्यात आली होती. परंतु या दोन्ही जनसुनावण्या रद्द करण्यात आल्या होत्या. नोकऱ्यांची नियुक्ती पत्रे देण्यात आल्यानंतरच जनसुनावण्या पार पडल्या व त्यास मंजूरी देण्यात आली. सदर विस्तारीकरणी प्रकल्पामध्ये १२७ हेक्टर जमीन संपादित करण्यात आल्या असून त्यामध्ये १५६ नोकऱ्या देण्याची तरतूद असताना देखील आजपर्यंत सदर नोकऱ्यांचे नियुक्ती पत्र का देण्यात आले नाही याची माहिती देण्यात यावी. नूकत्याच पार पडलेल्या घोन्सा खाणी जनसुनावणीदरम्यान अंदाजे १० नोकऱ्यांचे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले होते. चिखली व येनक गावातील जमीन संपादित करून नोकरी नागपूर विभागात देण्यात येत असून वे.को.लि.ने स्थानिक या शब्दाची परिभाषा बदललेली आहे. वे.को.लि.ने ज्या प्रकल्पाकरिता जमीनी संपादित केल्या आहेत त्याच प्रकल्पामध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्यात याची ही आमची प्रथम मागणी आहे. ही मागणी पूर्ण होत असेल तरच या जनसुनावणीला मंजूरी देण्यात यावी अन्यथा ही जनसुनावणी रद्द करण्यात यावी. वे.को.लि.ने ग्रामपंचायतीमध्ये सादर केलेल्या सादरीकरणाचे मी अवलोकन केले आहे. या | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सद्यस्थितीत वणी क्षेत्रामध्ये २७१३ कंत्राटी कामगार असून ९७४ कामगार हे स्थानिक यवतमाळ जिल्ह्यातील आहेत. या प्रकल्पामध्ये येनक, चिखली, टाकळी व कोलगांव या गावातील जमीन अधिग्रहीत करण्यात येत आहेत. या ठिकाणी जवळपास ४०० नागरीका उपस्थित आहेत. येनक या गावाचे अंतर जास्त असल्याने इतर गावातील नागरीकांना तेथे पोहोचण्यास अडण निर्माण झाली असती त्यामुळे जनसुनावणी वे.को.लि.च्या सामुदायिक भवनामध्ये घेण्यात येत आहे.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात येत आहे. वे.को.लि.तर्फे जनसुनावणीदरम्यान उपस्थित सर्व मुद्यांची उत्तरे घेण्यात येतील. जनसुनावणीदरम्यान उपस्थित नागरीकांनी मांडलेले मत, सूचना व आक्षेपांची नोंद घेण्यात येते व शासनाकडे पुढील निर्णयासाठी सादर करण्यात येते. त्यबाबत पुढील निर्णय शासन स्तरावर घेण्यात येते. जनसुनावणीदरम्यान उपस्थित मुद्यांची समाधानकारक उत्तरे वे.को.लि. कडून घेण्यात येईल व नागरीकांचे समाधान करण्याचे प्रयत्न करण्यात येतील. मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे ४० विषय असतात व अपर जिल्हाधिकारी यांचेकडे ४० विषय असतात. कायद्यानूसार कार्यवाही करण्याच्या तरतूदी आहेत. मी सन २००१ पासून पुनर्वसन अधिकारी असून मला भूसंपादन प्रक्रियेदरम्यान अडचणींची माहिती आहे व त्यानूसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. भूसंपादनाच्या सर्व बाबी तपासण्यात येतील व त्याबाबत योग्य तोडगा काढण्यात |

| | | |
|---|---|---|
| | परिसरामध्ये कोळशाची वाहतूक ही सार्वजनिक रस्त्यांवरून करण्यात येते. वे.को.लि.च्या वाहतूकीमुळे नूकसानग्रस्त शेतकऱ्यांनी किती आंदोलने केली, किती उपोषणे केली, किती नूकसान भरपाई वे.को.लि.ने दिली याची माहिती देण्यात यावी. ताडपत्रीने आच्छादन करून वाहतूक करण्यात येत असल्याचे सांगण्यात येते. परंतु तसे होताना दिसत नाही. वे.को.लि. प्रशासनाने खोटी माहिती देणे बंद करावे. कोळसा वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांची माहिती देखील वे.को.लि. प्रशासनातर्फे खोटी देण्यात येते. तसेच वे.को.लि. प्रशासनाकडून त्याचे चारित्र्य प्रमाणपत्र देखील घेण्यात येत नाही. जेणेकरून अपघात झाल्यास त्याचे शोधकार्य देखील करता येत नाही. माझी विनंती आहे की सदर जनसुनावणी पुढे ढकलण्यात यावी व सुधारणा केल्यानंतरच सदर जनसुनावणी घेण्यात यावी. स्थानिकांना या प्रकल्पामध्येच नोकरी मिळाली पाहिजे ही माझी आग्रहाची मागणी आहे. वे.को.लि.च्या ब्लास्टींगमुळे या परिसरातील पाण्याची पातळी खालावलेली आहे व वे.को.लि. प्रशासन १०० मीटर हून २०० मीटरची परवानगी मागत आहे. यामुळे भुजल पातळी खालावणार आहे. सिंचित शेतीच्या नूकसानीबाबत वे.को.लि. नूकसान भरपाई एकमुस्त देणार किंवा वार्षिक देणार याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. वे.को.लि. ने परिसरातील नैसर्गिक नाले वळविल्यामुळे पावसाळ्यामध्ये शेतात पाणी शिरून पूरपरिस्थिती निर्माण होऊन शेतीचे नूकसान होत आहे. तसेच अधिभार ढिगारे टाकल्यामुळे नाल्यातील पाणी अडवण्यात येते व त्यामुळे ऊंच ठिकाणी पाणी पोहोचू शकत नाही. येनक हे गाव कोलगाव प्रकल्पाच्या पश्चिम दिशेला असून ऊंच ठिकाणी आहे. येनक हे गाव ऊंच ठिकाणी असल्याने पाण्याचा प्रवाह कोलगावकडे येणार असून वे.को.लि.ने पाणी वळविले काय? जेव्हापासून कोलगाव प्रकल्प सुरू झाला तेव्हापासून संबंधित शेतकऱ्यांचे जे काही नूकसान झाले आहे त्याचे व्हिडीओ क्लिप, | येईल याची मी शाश्वती देतो. उपस्थितांनी थोडक्यात प्रश्न मांडावी जेणेकरून प्रकल्प प्रवर्तकांना उत्तरे देणे सोईचे होईल. |

| | | |
|---|---|---|
| | उपविभागीय अधिकारी यांनी दिलेले निर्देश, कृषी अधिकारी यांनी केलेले मुल्यांकन या सर्व बाबींचा समावेश करून नस्ती वे.को.लि.च्या ताडाली कार्यालयात सादर करून देखील आजपर्यंत नूकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात आलेली नाही. वे.को.लिद्वारे नैसर्गिक नाले वळविण्यात येते. या प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात अनेक त्रुटी असल्याने सदर जनसुनावणी पुढे ढकलण्यात यावी ही विनंती आहे. स्थानिकांना प्रकल्पामध्येच प्रत्यक्ष रोजगार देण्यात यावा. अधिभार ढिगारे व कोळसा उत्खननासाठी ज्या खाजगी कंपन्यांना निविदा प्रदान करण्यात आली आहे अशा कंपन्यामध्ये चिखली, टाकळी, येनक व कोलगाव या गावातील किती टक्के बेरोजगारांना नोकऱ्या दिल्या आहेत याची माहिती देण्यात यावी. गावातील १-२ व्यक्तिंनी दबाव टाकला तर त्यांना वेतन सुरू करून देण्यात येते. येनक गावाची लोकसंख्या १४००-१५०० असून त्यामध्ये किती प्रमाणात बेरोजगार असतील याची कल्पना कंपनीने करावी. तसेच चिखली, टाकळी व कोलगाव या गावांमध्ये देखील बेरोजगाराची संख्या जास्त प्रमाणात आहे. वे.को.लि. तर्फे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार देण्यात येणार असल्याचे आश्वासन देण्यात येते परंतु त्याचा कालावधी सांगण्यात येत नाही. वे.को.लि.ने प्रकल्पग्रस्त गावांमधील बेरोजगारांना प्रकल्पामध्ये रोजगार देताना प्राधान्य दिले पाहिजे. मी प्रकल्पग्रस्त असल्याने मला माझ्या प्रश्नांची उत्तरे देण्यात यावी. माझ्या प्रश्नांची उत्तरे मिळणार नसतील तर ही जनसुनावणी कशी पार पडणार? वे.को.लि.ने फेज-१ व फेज-२ मध्ये किती बेरोजगारांना रोजगार दिला याची माहिती देण्यात यावी. त्यापैकी प्रकल्पग्रस्त किती आहेत याची माहिती देखील देण्यात यावी. वे.को.लि. प्रशासनाकडे व्यवस्थित माहिती नसल्याची दखल घेण्यात यावी व ही जनसुनावणी पुढे ढकलण्यात यावी ही माझी नम्र विनंती आहे. वे.को.लि.च्या ब्लास्टींगमुळे किंवा खोलीकरणामुळे | |

| | | |
|---|---|---|
| | बोरवेल आणि ट्युबवेलचे नूकसान झाले आहे त्याची नूकसान भरपाई एकमुस्त देणार आहेत किंवा वार्षिक देणार आहे याची माहिती देण्यात यावी. वे.को.लि.ने ज्या अर्थी जनसुनावणी त्यंच्या सामुदायिक भवनामध्ये आयोजित केली आहे त्याअर्थी वे.को.लि. प्रशासनाकडून जनसुनावणीदरम्यान उपस्थित सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे अपेक्षित होती. वे.को.लि.ला लागणाऱ्या १२७ हेक्टर जमीनीपैकी १०१ हेक्टर जमीन येनक गावातील संपादित करणार असल्याने जनसुनावणी येनक गावात का आयोजित करण्यात आली नाही. येनक गावातील नागरीकांना जनसुनावणी करिता येण्यासाठी वे.को.लि.ने वाहतूक व्यवस्था का केली नाही. प्रकल्पग्रस्त नागरीकांना जनसुनावणी करिता उपस्थित होत आले पाहिजे व त्यांना त्यांच्या समस्या या ठिकाणी मांडता यायला पाहिजे होती. जर ही जनसुनावणी येनक गावात आयोजित केली असती तर जिल्हा प्रशासनाला वे.को.लि.तर्फे सीएसआर अंतर्गत करण्यात आलेल्या कामांचा आढावा घेता आला असता. मा. मुख्यमंत्र्यांच्या पुढकाराने येनक गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले व सदर रस्ता उच्च दर्जाचा असून वाहतूकीसाठी अत्यंत सोईस्कर आहे. वे.को.लि.ने मा. अध्यक्षांची दिशाभूल करू नये. वे.को.लि.च्या सादरीकरणामध्ये नमूद केलेल्या बाबी आजपर्यंत पूर्ण करण्यात आलेल्या नाहीत. फेज-१ व फेज-२ मध्ये दिलेली आश्वासने आजपर्यंत पूर्ण करण्यात आलेली नसल्याने फेज-३ करिता मंजूरी कशी देण्यात यावी हा मुख्य मुद्दा आहे. सदर जनसुनावणी रद्द करायची कि पुढे सुरू ठेवायची याबाबतचा निर्णय मा. अध्यक्ष यांनी घ्यायला पाहिजे. माझ्या सुचना चुकीच्या असतील तर वे.को.लि. प्रशासनाने खोडून काढावे. माझे मुद्दे सादरीकरणाला अनुसरून आहेत. शेतकऱ्यांना मोबदला एकमुस्त देण्यात येणार आहे किंवा तहसिलदार व कृषी विभागाच्या मुल्यांकनानूसार देण्यात येणार आहे किंवा वे.को.लि.च्या नियमानूसार देण्यात येणार आहे | |

| | | |
|---|---|---|
| | याची माहिती देण्यात यावी. ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी वे.को.लि.ने संपादित केल्या आहेत त्या प्रकल्पाग्रस्तांना या प्रकल्पामध्येच सामावून घेण्यात यावे. वे.को.लि.ने सार्वजनिक रस्त्यावरून कोळशाची वाहतूक करू नये. स्थानिकांना आरोग्याच्या समस्या झाल्या तर वणी येथे सुसज्जित दवाखान्यांचा अभाव असल्याने चंद्रपूर येथे उपचाराकरिता जावे लागते. येनक, कोलगाव, चिखली व टाकळी येथून चंद्रपूर व वणीचे अंतर सारखे आहे. या परिसरात एसटी महामंडळाच्या ०५ बसेस ये-जा करत असतात. वे.को.लि.च्या वाहतूकीमुळे रस्त्याची व पुलाची दुर्दशा झाल्यामुळे बस सुविध बंद करण्यात आली आहे. त्यामुळे रूग्ण दवाखान्यात वेळेत पोहोचू शकत नाही व प्रवासादरम्यान त्याचा मृत्यू होतो. कोळशाच्या वाहतूकीमुळे रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नूकसान झाले आहे. तसेच पर्यावरण आघात मुलयांकन अहवालामध्ये नमूद हवा प्रदूषण नियंत्रणेबाबतची माहिती पूर्णपणे खोटी आहे. त्याची नूकसान भरपाई केव्हा देणार याची माहिती देण्यात यावी. माझ्या भावाच्या शेतीचे नूकसान झाले असून मा. श्री. हंसराज अहीर यांच्यामार्फत वे.को.लि. च्या ताडाली येथील क्षेत्रीय कार्यलयात वेळोवेळी निवेदन सादर करून देखील आजपर्यंत नूकसान भरपाई मिळालेली नाही. जमीनी संपादित केल्यानंतर १२ बलुतेदार बेरोजगार झाले, शेतमजूर बेरोजगार झाले. त्यांना वे.को.लि.तर्फे कंत्राटदाराकडे सामावून घेण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले होते परंतु त्याची देखील पूर्तता करण्यात आली नाही. वे.को.लि.ने प्रकल्पग्रस्त गावातील ८० टक्के बेरोजगारांना अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. तसेच वे.को.लि. तर्फे ओपनकास्ट खाणीकरिता जमीन संपादित करण्यात येतात परंतु नोकरी अंडरग्राऊंड खाणीमध्ये देण्यात येते. वे.को.लि.ने स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनूसार प्रशिक्षण द्यावे व रोजगार देखील द्यावा. केवळ औपचारिकता करू नये. जोपर्यंत स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक | |

| | | |
|---|---|---|
| | पात्रतेनूसार प्रशिक्षण देऊन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार देण्यात येत नाही तोपर्यंत आमच्या जमीनीला हात लावता येणार नाही. माझ्री अध्यक्ष महोदयांना विनंती आहे की, त्यांनी याबाबत मदत करावी. | |

## ५) **अॅड श्री. रूपेश गुणवंत ठाकरे, प्रशासक, ग्राम पंचायत मुंगोली, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर खाण १२ वर्षांपूर्वी सूरू करण्यात आली होती व आज या खाणीचे विस्तारीकरण करण्यात येत आहे. मी मुद्दे निहाय प्रश्न उपस्थित करणार असून मला मुद्देनिहाय उत्तरे मिळतील अशी मी अपेक्षा करतो. वेकोली वणी क्षेत्रांतर्गत कोलगाव विस्तारित खुल्या खाण प्रकल्पाच्या विद्यमान उत्पादन क्षमतेत ०.६० दशलक्ष टन प्रतिवर्ष वरून ०.८० दशलक्ष टन प्रतिवर्ष इतकी वाढ तसेच ३९७.२५ ते ५२०.६० हेक्टर क्षेत्रापर्यंत विस्तार प्रस्तावाबाबत दिनंाक २०/०४/२०२६ रोजी मनोरंजन केंद्र, कैलासनगर कॉलनी, मुंगोली, ता. वणी, जि. यतवमाळ येथे जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. सदर जनसुनावाी ही केवळ औपचारिकता ठरत असल्याचे वास्तव आहे. उद्योगामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय व सामाजिक समस्यांवर चर्चा केली जाते, मात्र दिलेली आश्वासने प्रत्यक्षात अंमलात येत नाहीत. परिणामी, प्रकल्पग्रस्त नागरीकांना मोठ्या प्रमाणात त्रास व संघर्ष सहन करावा लागतो. सध्या ०.६० दशलक्ष टन उत्पादन क्षमतेमध्येच नागरीकांना प्रदूषण, आरोग्य समस्या, रस्त्यांची दुरावस्था, पाणी टंचाई, ब्लास्टींगमुळे होणारे हादरे, शेतीचे नूकसान व वन्यप्राण्यांचा वाढता धोका अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे उत्पादन क्षमता वाढविल्यास या समस्या अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. उद्योग किंवा कुठलाही प्रकल्प सुरू झाला की त्याचा फायदा व नूकसान, चांगले व वाईट | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | परिणाम होतातच. वेकोली मुळे कोलगांव-विरूर पैनगंगा नदीवरच पूल, मुंगोली-नकोडा नदीवरच पूल, बेलोरा-घुग्घूस वर्धा नदीवरच पूल व कोलगांव फाट ते शिंदोला रस्ता बनवून दिला त्यासाठी परिसरातील सामान्य नागरीकांनी खूप त्रास ही सहन केला, काही नागरीकांना अपघातामुळे जीव ही गमवावा लागला. म्हणूनच खालील प्रश्नांवर समन्वयक व प्रकल्प प्रवर्तकांकडून सविस्तर उत्तरे घेऊन ती अधिकृत इतिर्वृतात नोंद करण्यात यावी.<br>प्रश्न:-<br>१) सदर पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करण्यामागील उद्देश समन्वयक पर्यावरण विषयक जनसुनावणी यांनी स्पष्ट करावा.<br>२) जनसुनावणीदरम्यान नोंदविलेल्या मुद्यांच्या इतिवृत्ताचे पुढे काय केले जाते, याबाबत समन्वयक पर्यावरण विषयक जनसुनावणी यांनी सविस्तर माहिती द्यावी.<br>३) वेकोलि वणी क्षेत्र अंतर्गत मुंगोली-निर्गुडा डीप विस्तारीकरण प्रकल्पात मुंगोली गावांचे पुनर्वसन झाले त्यात कायमस्वरूपी रहिवाशी मात्र शिवनी (जहा) या गावाच्या शिवेत शेती असणारे शेतकरी १) केशव कोंडू पिंपळशेंडे २) कांताबाई किसन पिंपळशेंडे ३) दशरथ धर्मा भास्कर या तीनच शेतकऱ्यांची एकूण २.६७ हेक्टर शेतजमीन संपादित करण्याचे वेकोलि वणी क्षेत्राचे काय नियोजन आहे?<br>४) मौजा मुंगोली येथील गट नंबर १०४ व शिवणी (जहा) येथील गट नंबर ३२, २६३ व २६६ या शेतजमीनी मुंगोली-निर्गुडा डीप विस्तारीकरण प्रकल्पासाठी संपादित करण्यात आल्या. 'Unregistered वाटणीपत्र' या कारणासाठी वे.को.लि.ने कोर्टाची पायरी चढली SDO, Add. Collector, Commissioner व आता High Court या सर्व न्यायालयांनी शेतकरी बांधवांच्या बाजूने निकाल दिला. यात मात्र शेतकरी बांधवांना ५ ते ६ वर्षांपासून नोकरीपासून वंचित | |

| | | |
|---|---|---|
| | राहावे लागले व वेकोलिने जमीनीचे खोदकाम केल्यामुळे शेतीतून उत्पन्न ही घेऊ शकले नाही अस दुहेरी नूकसान शेतकरी बांधवांच झाल त्यामुळे या सर्व शेतकरी बांधवांना ५-६ वर्षापासून जे नूकसान झाले त्याची नूकसान भरपाई देणार का? उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचा आदेश दिनांक २७/०५२/२०२६ रोजी झाल्यानंतर ही या शेतकरी बांधवाना नोकरी (रोजगार) कधीपर्यंत देणार?<br>५) आता नुकताच १५ एप्रिल २०२६ ला कोलगांव खुल्या खदानीत डम्पिंग परिसरात वाघाचे दर्शन झाले. २-३ महिन्यापूर्वी कोलगाव चेकपोस्ट जवळ वाघाचे दर्शन झाले होते. प्रत्येक वर्षी उन्हाळ्याची चाहूल लागताच वाघ हा खुली खदान परिसर व खाणीलगतच्या शेतात किंवा गावात दिसतोच. त्यामुळे खाणीलगत असलेले गाव व गावालगत असलेली वेकोलिने संपादित केलेली शेतजमीन तिथे ऑस्ट्रेलियन बाभळीचे जंगल तयार झाले आहे. त्या संपूर्ण परिसराची पाहणी करून ते जंगल साफ करून तिथे पर्यावरण पोषण वृक्ष लागवड करण्यात येणार का?<br>६) वाघ दरवर्षीच येतो काहीप्रमाणात मनुष्यहानी होते या परिसरात वाघाची दहशत निर्माण होते. परिसरातील नागरीकांवर भीतीचे सावट असते. यावर वेकोली प्रशासन काय उपाययोजना करणार?<br>७) कोलगांव विस्तारीत खुल्या खदानीकरिता संपादित करण्यात येत असलेल्या ३१६.१२ एकर जमीनीच्या बदल्यात भूधारकांना रोजगार कधीपर्यंत देण्यात येणार?<br>८) भूधारकांना संबंधित प्रकल्पात किंवा वणी क्षेत्रातच रोजगार देण्याबाबत काय धोरण आहे?<br>९) R & R List जिल्हाधिकारी साहेत यवतमाळ यांच्याकडे Approval साठी कधी पर्यंत पाठवणार? | |

| | | |
|---|---|---|
| | १०) कोळसा वाहतूकीदरम्यान रस्त्यावर सांडणाऱ्या कोळशामुळे निर्माण होणाऱ्य धुळीवर नियंत्रणासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येणार?<br>११) कोळसा वाहतूक करणाऱ्या रस्त्यांची नियमित साफसफाई व देखभाल कधीपासून आणि कशा पद्धतीने केली जाणार?<br>१२) घूग्घूस-बेलोरा पुलियावर व पूलाच्या दोन्ही बाजूने साचलेला कोळश्याच्या भुकटीचा धूळ वेकोलि प्रशासन कधी साफ करणार?<br>१३) जून-जुलै महिन्यानंतर कोलगाव, मुंगोली व गाडेगाव खदानीतून कोळसा वाहतूक ही साखरा-मुंगोली-नकोडा-घुग्घूस मार्ग होणार आहे, वाहतूकीमुळे नागरीकांच्या सुरक्षेसाठी कोणती ठोस उपाययोजना करण्यात येणार?<br>१४) सदर प्रकल्पामुळे एकूण किती गावे बाधित आहेत, याची माहिती द्यावी.<br>१५) CSR (सामाजिक उत्तरदायित्व) निधी अंतर्गत आतापर्यंत कोणती विकासकामे करण्यात आली आहेत व भविष्यातील नियोजन काय आहे?<br>१६) पर्यावरण संरक्षण व समतोल राखण्यासाठी आतापर्यंत कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत व भविष्यरतील आराखडा काय आहे?<br>१७) धूळ नियंत्रणासाठी यंत्रणा व उपाययोजना कोणत्या आहेत?<br>१८) प्रकल्पग्रस्त गावांसाठी रूग्णवाहिका सुविधा उपलब्ध आहे का?<br>१९) प्रकल्पग्रस्त गावांमध्ये नियमित आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात का?<br>२०) भविष्यात मोफत वैद्यकीय उपचार, औषधे व शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत का?<br>२१) केवळ कोळसा उत्पादनापुरते मर्यादित न राहता प्रकल्पग्रस्त गावातील नागरीकांसाठी प्रकल्प | |

| | | |
|---|---|---|
| | प्रवर्तक नेमक्या कोण-कोणत्या जबाबदाऱ्या पार पाडणार आहेत?<br>वरील सर्व प्रश्नावर सविस्तर उत्तरे घेऊन ती इतिवृत्तात नोंछ करण्यात यावित व त्यानूसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. | |

**६) <u>श्री. नरेंद्र रामदास नांदे, माजी सरपंच, ग्राम पंचायत साखरा, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, मौजा साखरा (को) हे जवळपास ३०० लोकवस्तीचे गाव असून वेकोली (WCL) च्या मुंगोली-निर्गुडा डी विस्तारीकरण प्रकल्प व पैनगंगा प्रकल्पाला लागून आहे. गावातील लोकांचे महत्त्वाचे उदरनिर्वाहाचे साधन म्हणजे शेती ही सदर प्रकल्पात संपादित करण्यता आली. परंतु ग्रामस्थांना सदर कोळसा प्रकल्पांमुळे अनेक समस्यांना तांड द्यावे लागत असून वेकोलि मुळे लोकांच्या आरोग्यावर अनेक विपरीत परिणाम होऊन आयुष्यमान कमी झाले आहे. सदर वेकोलि मुळे निर्माण झालेल्या समस्या खालीलप्रमाणे असून सदर समस्यांचे निराकरण करण्याविषयी संबंधित अधिकाऱ्यांना आदेशीत करावे ही विनंती.<br>१) मुंगोली व पैनगंगा प्रकल्पात साखरा (को) हद्दीतील जवळपास ९०% शेतजमीन संपादित करण्यात आली आहे उर्वरित १०% जमीन शिल्लक असल्याने ती कसण्यासाठी अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. तरी आमची विनंती आहे की उर्वरित शेतजमीन सुद्धा संपादित करण्यात यावी.<br>२) मौजा साखरा (को) गावाला लागून सायलो लागले असून तेथून रेल्वेत कोळसा भरण्यात येतो त्यामुळे हवेच्या माध्यमातून कोळशाचे कण गावात येऊन याचा विपरीत परिणाम लोकांच्या आरोग्यावर होत असून ग्रामस्थांना श्वसनाचे | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आजार होत आहे. याचे लवकरात लवकर निराकरण करण्यात यावे.<br>३) मौजा साखरा (को) गावाच्या चारही बाजूने वेकोलीची डम्पिंग असून त्यावर पडणारे पावसाचे पाणी वाहून शेतजमीनीत येते त्यामुळे जमीनीचा सुपीक थर वाहून जात आहे. व जमीनी निरूपयोगी बनल्या आहेत. शेतजमीनीला लावलेल्या खर्चाच्या तलनेत अतिशय कमी उत्पन्न होत आहे.<br>४) वेकोलीकडून कोळसा उत्खनन व वाहतूक या प्रक्रियांमुळे मोठ्या प्रमाणात हवा प्रदूषण निर्माण झाले असून त्याचा वाईट परिणाम लोकांच्या आरोग्यावर होत आहे. आसपासच्या गावातील ग्रामस्थ अनेक गंभीर आजारांनी ग्रस्त असून लोकांचे आयुष्यमान कमी झाले आहे. यावर लवकरात लवकर उपाययोजना करण्यात यावी.<br>५) मौजा साखरा (को) हे गाव सर्व बाजूनी वेकोलिने वेढले असून वेकोलीच्या कोळसा उत्खननामुळे ग्रामस्थाचे जीवनमान खालावले आहे तसेच लोकांकडे उदरनिर्वाहाचे साधन राहिलेले नाही. कोळसा वाहतुकीमुळे नियमांची पायमल्ली होते त्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत. तसेच प्रदूषणामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहेत. वेकोलिमुळे दळणवळणाचे रस्ते खराब झाले आहेत. त्यामुळे महोदय आपणास विनंती आहे की साखरा (को) गावचे लवकरात लवकर पुनर्वसन करण्यात यावे.<br>६) वेकोलिच्या डम्पिंगवर मोठ्या प्रमाणात ऑस्ट्रेलियन बाभळीचे जंगल वाढले असून त्यात हिंस्त्र प्राण्याचा वावर वाढला आहे. ह्या जंगलामध्ये लवकर शिकार उपलब्ध होत असल्याने वाघासारखे प्राणी येथे राहत आहेत. त्यामुळे ग्रामस्थांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. रोजगारासाठी बाहेर पडणाऱ्या लोकांचया जीविताला वाघामुळे धोका निर्माण झाला आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | ७) वेकोलिकडून कोळसाबाधित गावांमध्ये सामाजिक उत्तरदायित्व निधी (CSR) मधून विकासकामे करून देणे आवश्यक असताना कामे करून दिली जात नाहीत. तरी संबंधितांना आपल्या स्तरावरून (CSR) मधून गावामध्ये विकासकामे करून देणेबाबत आदेशित करावे.<br>८) गावामध्ये अनेक कुशल तरूण-तरूणी रोजगाराच्या शोधात असून त्यांच्या हाताला काम नाही. तरी वेकोलीकडून अशा तरूण-तरूणींना त्यांच्या कौशल्यानूसार रोजगाराची साधने देण्यात यावी. जेणेकरून बेरोजगारांना उत्पन्नाचे साधन निर्माण होईल.<br>कोळसाबाधित साखरा (को) गावाच्या संदर्भात सहानुभूतीने विचार करून आमच्या समस्या लवकरात लवकर निकाली काढाव्या ही विनंती. | |

**७) <u>श्री. विजय पिदुरकर, माजी सदस्य, जिल्हा परिषद यवतमाळ, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक मुद्यांबाबत आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये १२६.६७ हेक्टर जमीन अधिग्रहीत होत आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ व २००९ नूसार ज्या गावामध्ये प्रकल्प प्रस्तावित आहे त्या गावातील नागरीकांना त्यांचे आक्षेप, सुचना, निवेदन नोंदविता यावे याकरिता जनसुनावणी प्रकल्प स्थळी घेणे बंधनकारक आहे. मा. अध्यक्ष यांचेकडून कायद्याचे तंतोतंत अनुपालन होणे अपेक्षित आहे. मा. विजय गारगाटे यांनी उपस्थित केलेला मुद्दा ऱ्हास्त आहे. म.प्र.नि. मंडळाने सन २०२२ मध्ये वणी क्षेत्रातील ऑस्ट्रेलियन बाभूळ सारख्या प्रजातीचा संपूर्ण नायनाट करण्याकरिता वे.को.लि.ला पत्र दिले होते. म.प्र.नि. मंडळाने दिलेल्या पत्राचे सन २०२२-२०२६ दरम्यान अनुपालन झाले आहे काय याची माहिती | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, जिल्हा खनिज निधीच्या वापराबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केल्यास त्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | देण्यात यावी. मागे एका व्यक्तिचा वाघाच्या हल्ल्यामध्ये मृत्यू झाला त्यावेळी १०० हेक्टर जमीन साफ करण्यात आली. जेणेकरून त्या मार्गाने जाणारे विद्यार्थी व सामान्य नागरीक यांना त्रास झाला नाही. फोसापिस या झाडामुळे उपजाऊ जमीन नापिक होते. त्यामुळे म.प्र.नि. मंडळाने दिलेल्या पत्राचे अनुपालन होते किंवा कसे याबाबत आढावा घेण्यात येणार किंवा नाही याची माहिती देण्यात यावी. सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक असल्याने या ठिकाणी कृषी तज्ञ, आरोग्य तज्ञ, जल व वायु विषयक तज्ञ व्यक्तिंची उपस्थिती अपेक्षित होती. आपणांस विनंती की, कोलगांव विस्तारीकरण खुली खाण वणी एरिया वेकोलि उत्पादीत क्षमता ०.६० दशलक्ष टनावरून वाढ ०.८० या प्रकल्पाची जनसुनावणी आज दि. २०/०४/२०२६ ला मनोरंजन केंद्र कैलास नगर मुंगोली उपक्षेत्र आयोजित केली त्यात आक्षेत मागीतले यापूर्वी झालेल्या जनसुनावणीमध्ये उपस्थित रस्ते पाणी जल वायु प्रदूषण पर्यावरण यामध्ये वॉटर प्रिवेंन्शन ॲन्ड कन्ट्रोल पोलुशन ॲक्ट १९७४, एअर ॲक्ट १९८१, हॅझर्ड वेस्ट रूल १९८९ यांचे उल्लंघन वेकोलिने केल्याने परिसरातील प्रकल्पग्रस्त ग्रामस्त नागरीकांना नुकसान भोगावे लागत आहे. यात खालील मुद्यांचे खुलासे करून जनसुनावणीत समावेश करण्यात यावे.<br>१) कोलगाव ते मुंगोली पूल घुग्घूस कोळसा वाहतूकीसाठी रस्त्याचे निर्माण वाहनाचा आकार, वजनानूसार वेकोलिने प्रदूषण विरहीत सुरक्षित रस्ता कोळसा वाहतूकी व त्याभागातील नागरीकांकरिता स्वतंत्र रस्ते निर्माण केले आहे काय, याचा खुलासा करावा.<br>२) कोलगांव ते मुंगोली पुलापर्यंत रस्ता दुतर्फा वृक्ष लागवट किती कि.मी व कधी केली ते वर्ष खर्च आज त्यारस्त्यावर किती झाडे जिवंत आहे.<br>३) सार्वजनिक मार्गावर प्रदूषण होणार नाही या करिता रासायनिक प्रक्रिया टायर वाशिंग सयंत्रणा बसविली आहे काय. | |

| | | |
|---|---|---|
| | ४) कोळसाखानी पासून कोळसा हाताळणी (CHP) प्रकल्पापर्यंत हवा प्रदूषण होऊ नये याकरिता फॉगर मशीन उपलब्ध संचया दिवसातून किती वेळा फॉगर केल्या जाते.<br>५) कोळसा वाहतूक करताना रस्त्यावर पडलेला कोळसा व धूळ साठविण्यासाठी डस्ट अरेस्टर मशीन किती सुरू आहे.<br>६) कोलगांव विस्तारीकरणात १२६.६७ जमीन अधिग्रहण यामध्ये रोजगार संख्या माहिती नाही. ७/१२ नूसार किती लोकांना रोजगार संख्या माहिती देणार ज्या प्रकल्पात जमीन गेली तिथे रोजगार नियुक्ती द्यावी.<br>७) येनक, चिखली, टाकळी गावाचा परिसर ब्लॅस्टींग झोन पासून किती दूर आहे. त्याचा परिणाम अभ्यास केला आहे काय का नूकसान झाल्यास काय भरपाई दिली याची माहिती द्यावी.<br>८) प्रकल्पग्रस्त नागरीकांना वेकोलि खाजगी वाहन सेवा कंत्राट अट ५ वर्षे वरून ३० वर्षे करण्यात यावी.<br>९) कोलगांव, चिखली, टाकळी, येनक खान परिसरात सामाजिक आर्थिक परिणामामध्ये येथील शिक्षीत व तांत्रिक प्रशिक्षीत गाव निहाय यादी जोडली नाही. मग आपण त्यांना रोजगाराची अप्रत्यक्ष संधी देणार याची खुलासा करावा.<br>१०) बफर झोन हवेत धुलीकन अभ्यास यामध्ये यात उत्तर दिशेतील शिवणी, येनाडी, शेवाळा, सावंगी ही गावे समावेश नाही खुलासा करावा.<br>११) खानीतील पाणी येतीला वापरता येईल यापुर्वी कोलगांव खदानचे पाणी वापरात आहे काय? खुलासा करावा.<br>१२) पुर्नविकशीत जमीनीवर गाव कडधान्य विविध प्रकारची झाडे लावण्यात येईल परंतु झाडाच्या नावाचा उल्लेख नाही.<br>१३) वेकोलि कौशल्यविकास अंतर्गत शेतीवर अवलंबीत भुमिहीन शेतमजूर बाराबलुतेदार याबाबत उपाययोजना नाही. खुलासा करावा. | |

| | | |
|---|---|---|
| | १४) कोलगांव विस्तारीकरण खाण उत्पादन खाजगी कंत्राटदारामार्फत तिथे लागणाऱ्या कामगारांना शासन धोरणाप्रमाणे ८०% स्थानिक प्रकल्पग्रस्ताना रोजगार देणार काय खुलासा करावा.<br>१५) कोलगांव ते घुग्घूस मार्ग ३ वर्षापासून बंद पब्लीक कार युनिट (PUC) सव्हे रस्ता व्यवस्था कसा आणि केव्हा केला.<br>१६) पर्यावरण दायीत्व अंतर्गत (CER) १४४७.७३ लाख संभावे खर्चाचे विवरण सांगावे.<br>१७) प्रकल्पग्रस्त गावांच्या सरपंचांकडून गावातील विकासकामे करण्याबाबत प्रस्ताव उप-विभागीय अधिकारी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचेकडे सादर करण्याचे निर्देश दिले तर खरोखरच जिल्हा खनिज निधीचा पूरेपूर वापर होईल. | |

## ८) श्री. विजय शामराव गारगाटे, उप-सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | श्री. विजय पिदूरकर यांनी उपस्थित केल्या प्रमाणे श्रीमती पद्माताई नालमवार, आशा सेविका यांना व त्यांच्या वडीलांना सिलींग मार्फत भोगवटा-२ ची जमीन मिळाली होती. परंतु सदर जमीन प्रकल्पामध्ये संपादित करण्यात आली आहे व शासनाच्या नियमानूसार त्याचा मोबदला मिळालेला नाही. १२७ हेक्टर जमीन संपादित करण्यात येत असतील तर त्या प्रकल्पामध्ये १४७ नोकऱ्या अवार्ड झालेल्या आहेत अशी माहिती देण्यात आली आहे. म्हणजेच एकूण १४७ ७/१२ वे.को.लि.कडे आहेत. वे.को.लिच्या नियमाप्रमाणे प्रत्येक २ एकर शेतीच्या मोबदल्यात एक नोकरी देण्यात येते. परंतु एखाद्या शेतकऱ्याकडे दोन एकर पेक्षा जास्त जमीन असल्यास त्यांना त्रास दिला जातो. तसेच वे.को.लि.चे कर्मचारी जर या | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकारच्या जमीनी विकत घेत असतील तर त्यांना ते सोईचे केले जाते. तसेच ती जमीन अल्पदरात विकण्यात येते व त्यांना नोकरी देण्यात येते. शेतकऱ्यांना त्याचा अल्प दर देण्यात येतो. त्यांचे पुनर्वसन देखील करण्यात येत नाही. याबाबत स्थानिकांची मोठ्या प्रमाणात दिशाभूल करण्यात येते. विकास कामे, खनिज विकास निधीचा वापर यासारखे इतर मुद्दे आहेतच परंतु प्रामुख्याने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराची समस्या, भूजलाची खालावलेली पातळी यासारखे मुद्दे प्रलंबित आहेत. तसेच नैसर्गिक नाले व नद्या वळविल्यामुळे होणारे शेतपिकांचे नूकसान आणि सार्वजनिक रस्त्यांद्वारे होणारी कोळसा वाहतूक या मुद्यांचे निराकरण होणे गरजेचे आहे. कोलारपिंपरी क्षेत्रामध्ये माझ्या आईच्या नावाने शेती आहे. वाटणीपत्रानूसार सन २०१३ मध्ये सदर शेत माझ्या नावावर होते. मी सदर शेतीचा कर अदा करत आहे परंतु वे.को.लि.ने सन २०११ च्या यादीनूसार फक्त माझ्या आईचे नाव यादीमध्ये समाविष्ट केले आहे. सन २०१९-२० मध्ये वाटणी केलेल्या जमीनधारकांचे नाव त्या यादीमध्ये समाविष्ट आहेत परंतु माझ्या परिवारातून फक्त माझ्या आईचे नांव समाविष्ट आहे. सदर इसमाने भोगवटदार-२ ची जमीन स्वत:च्या नावाने नोंदणीकृत केली. त्या इसमावर कारवाई होणार आहे किंवा नाही याची माहिती देण्यात यावी. | |

## ९) <u>श्री. आशिष फुलसंगे, माजी जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा परिषद, यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या ठिकाणी बऱ्याच लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे की या परिसरात बऱ्याच सोई सुविधांचा अभाव आहे. तसेच या परिसरातील ही पहिली जनसुनावणी नाही. सन २०१४, २०१६ व २०१८ मध्ये या क्षेत्रामध्ये जनसुनावण्या घेण्यात आल्या होत्या. या परिसरात आरोग्य विषयक सुविधा, चांगले रस्ते व शुद्ध पिण्याचे पाणी या सुविधा पूरविण्याबाबत सातत्याने मागणी | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी वे.को.लि. प्रशासनाला आतापर्यंत झालेल्या जनसुनावणीदरम्यान दिलेल्या आश्वासनांबाबत केलेल्या उपाययोजनांची माहिती देण्यास सांगितले. |

| | | |
|---|---|---|
| | होत असताना देखील या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत नाहीत. जनसुनावणीदरम्यान प्रश्नाचे उत्तर लगेच देण्यात येत होते परंतु मागील २-३ वर्षांपासून जनसुनावणीच्या शेवटी उपस्थित प्रश्नांची उत्तरे देण्यात येत आहेत. आतापर्यंत वे.को.लि.च्या जनसुनावण्या झाल्या आहेत त्याबाबत केलेल्या उपाययोजनांबाबतची माहिती देण्यात यावी. माझी मा. अध्यक्षांना विनंती आहे की त्यांनी वे.को.लि.ला आतापर्यंत झालेल्या जनसुनावण्यादरम्यान दिलेल्या आश्वासनांबाबत कोणत्या उपाययोजना केल्या त्याची माहिती देण्याचे आदेश करावे. वे.को.लि.ने प्रदूषण नियंत्रणाबाबत, पाण्याबाबत, रस्त्यांबाबत व नोकऱ्यांबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत याची माहिती देण्यात यावी, येथे उपस्थित अधिकारी बदलून जातील परंतु स्थानिकांच्या समस्यांचे निराकरण होणार नाही. माझी फक्त एकच विनंती आहे की वे.को.लि.ने केलेल्या उपाययोजनांबाबत माहिती द्यावी जेणेकरून स्थानिक प्रशासनाच्या देखील लक्षात येईल. वे.को.लिने जी कामे केली आहेत ती सर्व कामे जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येतात. वे.को.लि.ने मागील दहा वर्षांमध्ये या कामांव्यतिरिक्त कोणती विशेष कामे केली जेणेकरून स्थानिकांना वाटणार की वे.को.लि.ने काही तरी वेगळं काम केले याची माहिती देण्यात यावी. वे.को.लि. तर्फे फक्त रू. ८.० लक्ष देण्यात येतात व खाजगी कंपन्यांकडून रू. ३०.० लक्ष रूपये देण्यात येतात. एक वाहन फक्त ४ वर्षे वापरण्यात येते व ५ व्या वर्षी दुसरे वाहन घ्यावे लागते. त्याकरिता वे.को.लि.ने आर्थिक सहाय्य द्यावे. अधिभार ढिगाऱ्याबाबतच्या कंत्राटदारातर्फे वापरण्यात येणाऱ्या वाहनांची नोंदणी करण्यात येत नाही. तसेच त्यांना नंबर प्लेट नसतात. पंरतु त्याच ठिकाणी शेतकऱ्यांची वाहने असली तर त्यांच्याकडून दंड वसूल करण्यात येतो. कोळसा खाणीतून निघणाऱ्या कोळशाची किंमत रू. ४५००/- प्रति टन आहे. वे.को.लितर्फे येथे उपस्थित एका नागरीकाच्या | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, उपाययोजनांची माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये व सादरीकरणामध्ये नमूद आहेत.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, सदर जनसुनावणी वे.को.लि.च्या कोलगांव खाणीच्या विस्तारीकरण प्रकल्पाबाबतची असल्याने विस्तारीकरणासंबंधित मुद्दे उपस्थित करण्यात यावे. आपण उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेऊन त्याबाबत वे.को.लि.कडून उत्तरे घेऊन जनसुनावणीचे इतिवृत्त शासनाकडे सादर करण्यात येईल व शासकीय समिती विस्तारीकरणाबाबत पुढील मंजूरी प्रदान करणार आहे.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, मागील २ वर्षांपासून सीएसआरबाबत पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून थीम देण्यात येत आहे. या थीम अंतर्गत सीएसआरची कामे करण्यात येतात. त्यानूसार वे.को.लि.तर्फे ६० टक्के निधीची तरतूद करण्यात येते. भविष्यात बॅटरी बॅकअपसह ५ किलोवॅट क्षमतेच्या सोलार पॅनलची तरतूद करण्यात आली आहे. सन २०१३-१४ पासून आजपर्यंत करण्यात आलेल्या कामांची माहिती सादरीकरणादरम्यान देण्यात आली आहे. सन २०१९-२० मध्ये सीएसआर अंतर्गत ४५.९८ लक्षची तरतूद करण्यात आली होती. त्यानंतर २०२०-२१ मध्ये ३७.४२ लक्ष, कोव्हीड दरम्यान १९.७२ लक्ष, २०२१-२२ मध्ये ५८.३२ लक्ष, २०२२-२३ मध्ये १०७.२१ लक्ष, २०२३-२४ मध्ये १०९.७० लक्ष व सन २०२५-२६ |

| | | |
|---|---|---|
| | शेताच्या सभोवतालची जमीन अधिग्रहीत करण्यात आली परंतु त्यांची जमीन अधिग्रहीत करण्यात आली नाही. त्यांचा मुलगा अर्धांगवायुने ग्रस्त आहे व त्यांची परिस्थिती हलाखीची आहे. त्यांच्या शेतात ये-जा करण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही. त्यामुळे सदर व्यक्ति शेती करू शकत नाही. वे.को.लि.ने त्यांनी जमीन अधिग्रहीत करण्याचे आश्वासन दिले परंतु आजपर्यंत जमीन अधिग्रहीत केली नाही. वे.को.लि.ने जमीन अधिग्रहीत केलेल्या शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला दिला नाही. अधिभार ढिगारा काढणाऱ्या कंपनीमध्ये ४५० कामगार कार्यरत असून त्यापैकी ३५० कामगार हे परप्रांतीय आहेत. तसेच याबाबतचा रेकॉर्ड देखील वे.को.लि.तर्फे ठेवण्यात येत नाही. शासनाने जमीन अधिग्रहीत करण्यापूर्वी जनसुनावणी घ्यायला पाहिजे होती. स्थानिकांच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत ही जनसुनावणी परत घेण्याची शिफारस मा. अध्यक्षांनी करावी. स्थानिकांचे म्हणणे एकून न्याय देण्यासाठी जनसुनावणी घेतली जाते. मागील मुकुटबन येथील जनसुनावणी मध्ये देखील त्या परिसरातील प्रदूषणाचा मुद्दा मी उपस्थित केला होता परंतु आजपर्यंत म.प्र.नि. मंडळाचे अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही. त्या परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण असून कोळशाच्या वाहतूकीमुळे अपघातांचे प्रमाण देखील वाढलेले आहेत. सार्वजनिक वाहतूकीच्या रस्त्यावरून कोळशाची वाहतूक करण्यात येत असून त्याबाबत कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही. मा. पर्यावरण मंत्री यांचा दौरा असताना या ठिकाणी प्रदूषणाचे प्रमाण फार कमी झाले होते. म्हणजे फक्त मंत्री महोदय दौऱ्यावर आले की प्रदूषण मुक्त वातावरण ठेवण्यात येते व इतर दिवशी मोठ्या प्रमाणात प्रदूषण करण्यात येते. मंत्री महोदयांसोबतच स्थानिक नागकरीकांचे आरोग्य देखील महत्त्वाचे आहे. तसेच दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात मंत्री महोदयांच्या वाहनावर कोळशाची भुकटी साचली असल्याची बातमी प्रकाशित झाली. वे.को.लि.चे अधिकारी स्थानिक नागरीकांच्या | मध्ये २३१.९८ लक्षची तरतूद करण्यात आली आहे. रू २३१.९८ लक्षपैकी रू. १७० लक्षची तरतूद मुंगोली क्षेत्राकरिता तरतूद करण्यात आली आहे. येनक गावामध्ये व्यायामशाळेची उपकरणे व इतर देण्यात आले आहेत. याशिवाय जिल्हा परिषद शाळा, चिंचोली येथे आरओ प्युरिफायर पूरविण्यात आले आहेत. याशिवाय कोलगांव येथे शांतीधाम विकसित करण्यात आले व त्याबाबत सादरीकरणामध्ये माहिती देण्यात आली आहे. चिखली गावात ८.२५ लक्ष रूपये व साखरा गावात १२.४० लक्ष रूपये नाल्याचे बांधकाम करण्यासाठी खर्च करण्यात आले आहेत. सीएसआर अंतर्गत जी काही कामे करण्यात येतात त्याबाबतचा प्रस्ताव वे.को.लि.कडे सादर केला जातो. ग्रामपंचायतच्या सरपंचांकडून प्राप्त प्रस्तावानूसारच कामे केली जातात. वे.को.लितर्फे काढण्यात येणाऱ्या कोळशाची किंमत रू. २,०००/- प्रति टन असून लिलावादरम्यान त्याला रू. ४,०००/- प्रति टन इतका भाव मिळतो. कोलगांव खाणीमध्ये ५८,१०० झाडांची लागवड करण्यात आली आहे. तसेच कोलगाव गावात ३,००,००० झाडे लावण्यात आली आहेत. कोलगाव परिसरात रस्त्याच्या कडेला व खाण परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली आहे. तसेच डम्पिंग क्षेत्रामध्ये वृक्ष लागवड प्रस्तावित आहे.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी वे.को.लि.ला जमीनीच्या अधिग्रहणाबाबत स्पष्टीकरण सादर करण्यास सांगितले. सदर मुद्याबाबत वे.को.लि.ने मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे लेखी स्पष्टीकरण सादर करावे. प्रकल्प प्रवर्तकांकडून आपण उपस्थित केलेल्या सर्व |

| | | |
|---|---|---|
| | समस्या ऐकूण घेत नाहीत. यापूर्वी मुंगोली खाणीकरिता जनसुनावणी घेण्यात आली होती. वे.को.लि.ने चिखली, टाकळी, येनक या क्षेत्रात किती झाडे लावली याची माहिती देण्यात यावी. रूग्णवाहिकेची सुविधा वे.को.लि.ने पूरविलेली आहे काय याची माहिती देण्यात यावी. वे.को.लि.ने यापूर्वी झालेल्या सर्व जनसुनावण्यांमध्ये नागरीकांची दिशाभून केल्याचे लक्षात येते. त्यामुळे सदर जनसुनावणी रद्द करून परत घेण्यात यावी. वे.को.लि.ने शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा, आरोग्य शिबीर व स्थानिकांना मोफत उपचार सुविधा पूरविलेल्या नाहीत. तसेच शैक्षणिक सुविधा जसे की प्रशिक्षण केंद्र देखील उभारलेले नाहीत. घुग्घूस, चंद्रपूर व वणी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रदूषण असून सदर क्षेत्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. तरी देखील शासनातर्फे या उद्योगांवर कारवाई करण्यात येत नाही याची कारणे काय आहेत. शासनाने वे.को.लि.ला नोटीस का बजाविली नाही, तसेच यांच्या सीएसआर निधीबाबत माहिती का मागविण्यात आली नाही. सन २०१६ मध्ये वे.को.लि.ने श्री. पिदूरकर यांना पत्राद्वारे कळविले की त्यांची जमीन अधिग्रहीत करण्यात येणार आहे परंतु आजपर्यंत जमीन अधिग्रहीत करण्यात आली नाही. शेतकऱ्याच्या जमीनीची लूट केल्यामुळे वे.को.लि.वर गुन्हा दाखल करण्यात यावा. वे.को.लि.ने मुंगोली क्षेत्रामध्ये ८० टक्के स्थानिकांची जमीन अधिग्रहीत केली असून आजपर्यंत त्यापैकी २० टक्के जमीन अधिग्रहीत करण्यात आली नाही व वे.को.लि.ला जमीनीची गरज नसल्याचे सांगण्यात आले आहेत. वे.को.लि.ला वारंवार निवेदने देऊन देखील कोणत्याही प्रकारची सुविधा पूरविण्यात येत नाही. वे.को.लि. तर्फे ८० टक्के स्थानिकांना रोजगार देण्यात येत नाही. परप्रांतीय लोकांना रोजगार देण्यात येतो. वे.को.लि.ने प्रकल्पग्रस्त गावातील स्थानिकांना प्रथम प्राधान्य दिले पाहिजे. प्रक्रलपग्रस्त गावात जर कुशल कामगार मिळत नसतील तर तालुका, जिल्हा व नंतर परप्रांतीयांना रोजगार दिला पाहिजे. याबाबत | मुद्यांबाबत स्पष्टीकरण घेण्यात येईल व शासनाकडे सादर करण्यात येईल. पर्यावरण समितीतर्फे या सर्व बाबींची शहानिषा करण्यात येते व त्यानंतरच पर्यावरणीय मंजूरी देण्यात येते. |

| | | |
|---|---|---|
| | मी जिल्हाधिकारी व पालकमंत्री यांना निवेदन देणार आहे. चिखली गावातील लोकांची ४५ टक्के जमीन घेण्यास वे.को.लि.ने नकार दिला असल्याचे गावकऱ्यांकडून माहिती झाले. वे.को.लि.तर्फे त्या गावामध्ये अधिभार ढिगारे टाकण्यात येणार आहे. गावातील ८५ टक्के जमीन अधिग्रहीत करण्यात आली. तसेच ९० टक्के पुनर्वसन करण्यात आले आहेत. फक्त १५ टक्के जमीनीवर शेती करायची कशी. अशा प्रकारचे अनेक मुद्दे आहेत ज्यावर वे.को.लि.ला कार्यवाही करण्याबाबत सांगणे गरजेचे आहे. याबाबत मा. पालकमंत्री व मा. उप-मुख्यमंत्री यांना पाचारण करण्याशिवाय आमच्याकडे पर्याय राहणार नाही. तसेच या परिसरात स्थानिकांना वेग-वेगळे आजार होत आहेत. म.प्र.नि.मंडळाने निर्णय घेतला तर या परिसरातील अनेक उद्योग बंद पडु शकतात. म.प्र.नि. मंडळाने या परिसरातील उद्योगांवर जातीने लक्ष देऊन या परिसरातील प्रदूषण कमी करण्याकडे कार्य करावे. | |

१०) **श्री. गणपत, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | स्थानिकांना ८० टक्के रोजगार मिळाला पाहिजे. एखाद्या कुटुंबात ३ एकर जमीन व ३ उमेदवार असेल तर त्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तिला नोकरी मिळणार. उर्वरित दोन उमेदवार हे बेरोजगार राहतील. अशा उमेदवारांना अप्रत्यक्ष रोजगारामध्ये प्राधान्य देण्यात यावे ही आमची अपेक्षा आहे. याबाबत वे.को.लि.ला निर्देशित करण्यात यावे. चंद्रपूर जिल्ह्यातील खाणींमध्ये देखील अशा प्रकारची तरतूद करण्यात आली नाही. वे.को.लि.चे अधिकारी व प्रशासन यांच्यासोबत बैठका होत राहतात परंतु त्याचा तोडगा आजपर्यंत निघालेला नाही. कोलगांव व मुंगोली या खाणी एकमेकांच्या शेजारी स्थित आहेत. कोलगांव या गावातील रहिवशांचे शेत मुंगोली येथे | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, सदर जनसुनावणी दरम्यान उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांची इतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात येते व सदर इतिवृत्त शासनाकडे सादर करण्यात येते. त्यानंतर पर्यावरण समिती प्रकल्पाला मंजूरी द्यायची किंवा कसे याबाबत निर्णय घेते. |

| | | |
|---|---|---|
| | स्थित आहेत. कोलगांव प्रकल्पाचा अहवाल आहे त्यामध्ये ३-४ गट क्रमांकाचे शेत अधिग्रहीत करण्यात आले नाही. शेतकऱ्यांच्या शेतात भिंत बांधण्यात आली आहे. त्यामुळे पावसाळ्यात पाणी त्यांच्या शेतात जाते व शेती करणे अशक्य झाले आहे. म.प्र.नि. मंडळाचे प्रादेशिक अधिकारी यांनी आजपर्यंत एकाही प्रकल्पावर कारवाई केल्याचे निदर्शनास येत नाही. या परिसरात उद्योग येत आहेत परंतु स्थानिकांना रोजगार मिळत नाही. उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत वेकोलिला दि. १५/०६/२०२२ रोजी पत्र देण्यात आले आहे. शिंदोला परिसरातील ३-४ शेत्या आहेत ज्या वे.को.लि.ने आजपर्यंत अधिग्रहीत केल्या नसून त्या ठिकाणी अधिभार ढिगारे टाकण्यात आले आहेत. सदर पत्राबाबत मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्यातर्फे वे.को.लि.ला देखील पत्रव्यवहार करण्यात आला आहे. परंतु आजपर्यंत कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी. या प्रकल्पाला आमची मंजूरी नाही. आमच्यावर जनसुनावणीदरम्यान गुन्हे दाखल झाले आहेत. परंतु जनसुनावणी रद्द झाली नाही. उर्वरित शेतीचे प्रश्न, बेरोजगाराचे प्रश्न, कोळसा वाहतूकीचा प्रश्न, प्रदूषणाबाबत सीएसआर निधीद्वारे उपाययोजना करण्यात याव्या. दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या प्रश्नांचे वे.को.लि. व प्रशासनाने निराकरण करावे. | |

### ११) श्री. विश्वास बोधाने, ग्रामपंचायत शिवणी, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वरील संदर्भनूसार मौजा शिवणी या गावातील संपूर्ण जमीन वे.को.लिद्वारे अधिग्रहण संपादित करणे त्यानूसार<br>१) गावाचे पुनर्वसन स्थळ हे शिवणी नवीन गावालगत किंवा शिवणी फाट्याजवळ देण्यात यावे अन्यथा १०० टक्के शेतजमीन घेण्यात यावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आमच्या गावातील ३० टक्के जमीन अधिग्रहीत करण्यात आली असून उर्वरित ७० टक्के जमीन देखील अधिग्रहीत करण्यात यावी. तसेच गावाचे पुनर्वसन १ ते १.५ किमी अंतरावर करण्यात यावे.<br>२) वे.को.लि.ने शेतजमीन संपादित केल्यानंतर सुधारित दर निश्चत करून सुधारीत नवीन दराने शेती मोबदला देणे.<br>३) ज्या शेतकऱ्याची जमीन संपादित करणार त्या शेतकऱ्यांना त्याच क्षेत्रात नोकरी देणे.<br>४) गावातील जमीनीचे/घराचे नवीन सुधारित दराने मुल्यांकन करून मोबदला देणे.<br>५) शिल्लक जमीनीकरिता शेतीसाठी शेत पांदन रस्ते तयार करून देण्यात यावे.<br>६) गावातील शेतजमीन वे.को.लि.मध्ये संपादित केल्यानंतर बरोजगार/शेतमजूर यांना रोजगार उपलब्ध करून द्यावा.<br>७) शिवणी ते मुंगोली जुना रस्ता गावाचे पुनर्वसन होत नाही तोपर्यंत शिवणी ते मुंगोली जूना रस्ता कायम ठेवण्यात यावा.<br>८) वे.को.लि.मुळे गावातील/क्षेत्रातील कोणतीही भविष्यात जीवीतहानी झाल्यास, नूकसान झाल्यास त्याची भरपाई वे.को.लि.ने देण्यात यावी. वे.को.लि.तर्फे गावालगत बंधारा बांधण्यात येणार असल्याने जो नाला १.५ कि.मी. अंतरावर होता तो नाला आता १०० मीटर अंतरावर आला आहे. त्यामुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नूकसान होणार असून जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>या सर्व बाबी आपण लेखी स्वरूपात पूर्तता करून द्यावी, जेणेकरून गावातील नागरीकांचे समाधान होईल. | |

१२) <u>सौ. ज्योती सुनिल माथुलकर, सरपंच, ग्रामपंचायत जुगद, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मौजा माथोली (जु.) गावाला लागून सायलो लागले असून तेथून रेल्वेत कोळसा भरण्यात येतो त्यामुळे हवेच्या माध्यमातून कोळशाचे कण गावात येऊन याचा विपरीत परिणाम लोकांच्या आरोग्यावर होत असून ग्रामस्थांना श्वसनाचे आजार होत आहेत. यात याचे लवक्रात लवकर निराकरण करण्यात यावे. मौजा माथोली (जु.) गावाच्या बाजूने वे.को.लि.ची डम्पिंग असून त्यावर पडणारे पावसाचे पाणी वाहून शेतजमीनीत येते त्यामुळे जमीनीचा सुपिक थर वाहून जात आहे व जमीनी निरूपयोगी बनली आहे शेत जमीनीला लावलेल्या खर्चाच्या तुलनेत अतिशय कमी उत्पन्न होत आहे. वे.को.लि. कडून कोळसा उत्खनन व वाहतूक या प्रक्रिया मुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. त्यांचा वाईट परिणाम लोकांच्या आरोग्यावर होत आहे. मौजा माथोली (जु.) हे गाव सर्व बाजूनी वे.को.लि.ने वेढलेले असून वे.को.लि.च्या कोळस उत्खननामुळे ग्रामस्थांचे जीवनमान खालावलेले आहे तसेच लोकांकडे उदरनिर्वाहाचे साधन राहिलेले नाही. वे.को.लि.मुळे दळणवळणाचे रस्ते खराब झाले आहे. बाधित गावाच्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत वे.को.लिच्या मालमत्तेवर कर देण्यात येत होता तो मागील काही वर्षांपासून बंद करण्यात आला. सदर रक्कम ही शासन खाती जमा करण्यात येत असल्याचे वे.को.लि.चे म्हणणे आहे. तरी सदर निधीचा उपयोग हा शासनाला न देता बाधित गावामध्ये विकास कामांसाठी करण्यात यावा. अशी आमची मागणी आहे, ती पूर्ण करणार काय. वे.को.लि.च्या डम्पिंगवर मोठ्या प्रमाणात ऑस्ट्रेलियन जंगल वाढलेले आहे त्याचा हिंस्त्र प्राण्यांचा वावर वाढना आहे ह्या जंगलामध्ये लवकर शिकार होत असल्यामुळे वाघासारखे प्राणी राहत आहेत. त्यामुळे ग्रामस्थांचे जिवाला धोका निर्माण | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | झाला आहे रोजगारासाठी बाहेर पडणाऱ्या लोकांच्या जीविताला वाघामुळे धोका निर्माण झाला आहे. वे.को.लि.कडून कोळसा बाधित गावामध्ये सामाजिक उत्तरदायित्व निधी (CSR) मधून विकास कामे करून देणे आवश्यक असताना कामे करून दिली जात नाहीत. तरी संबंधितांना आपल्या स्तरावरून CSR मधून गावामध्ये विकास कामे करून देणेबाबत आदेशित करावे. गावामध्ये अनेक कुशल तरूण तरूणी रोजगाराच्या शोधात असून त्यांच्या हाताना काम नाही तरी वे.को.लि. कडून अशा तरूण तरूणींला त्यांच्या कौशल्यानूसार रोजगाराची साधने देण्यात यावी जेणेकरून बेरोजगारांना उत्पन्नाचे साधन निर्माण होईल. कोळसा बाधित माथोली (जु.) गावाच्या संदर्भात सहानुभूतीने विचार करून आमच्या समस्या लवकरात लवकर निकाली काढाव्या ही विनंती. | |

**१३) <u>श्री. अनिल तेलंग, मुख्य संयोजक, आंबेडकरी जन आंदोलन, ता. वणी, जि. यवतमाळ</u>:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपण पर्यावरण विषयक सुनावणीसाठी सादर केलेल्या प्रकल्प अहवालात जुन्या कोळगाव खाणीची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी प्रकल्पासाठी वाढीव जमीन अधिग्रहीत करण्याचे नियोजित असून ती १२७.१३ हेक्टर आहे. या प्रकल्प अहवालात अधिग्रहीत जमीनीील उत्खननात ॲंथ्रासाईट, बिटॅमिनस, सब-बिॅमिनस आणि लिग्नाईट यापैकी कोणत्या प्रकारचा कोळस सापडणार हे उल्लेखित नाही. या चारही प्रकारातील कोळशाच्या धुळ कणांत वेगवेगळे घटक राहत असल्यामुळे मानवी व वन्य जीवावर होणारे विपरीत परिणाम अभ्यासात येत नाही. त्यामुळे प्रकल्प अहवालातील मानवी व वन्य जीवावर होणार परिणाम यासंबंधित त्रुटी असल्याची शक्यता नाकारता येत नाही किंवा प्रकल्प अहवालख | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | बोगस असण्याचे हे प्रथम लक्षण आहे. आपल्या प्रकल्प अहवालात १२ आठवड्यात २६ डस्ट सॅम्पल धुळीच्या नमुन्याचा अभ्यास करण्यात आला त्यात श्वसना अनुकूल व श्वसनास त्रासदायक स्फटीक कणांच्या अभ्यासात धुळी कणांचा आकार श्वसनास त्रासदायक ≥ १०μ व श्वसनास अनुकूल ≤ १०μ डाल्टन युनिटमध्ये मोजले आहेत. परंतु आपण मोजलेले प्रत्यक्षात डोळ्यांनी पाहता येत नसले तरी श्वसन प्रक्रियेच्या आत किंवा आपल्या कोलगांव खाण परिसरात हल्ली एक तास उभे राहिल्यास श्वसन इंद्रियातील (नाकातील) धुळ कण प्रत्यक्षात अनुभवता येतात. त्यामुळे आपल्या अहवालातील नमूद आकार व प्रत्यक्ष अनुभवातील धुळीकण आकारात, वस्तुमानात बरिच तफावत आहे. यावरून स्पष्ट आहे की आपल्या अहवालातील प्रत्यक्ष अभ्यास व अनुभूतीतील प्रत्यक्ष अनुभव यातील तुलना केल्या अनुभव अभ्यास हा वास्तव आहे. त्यामुळे प्रकलप अहवालातील < > १०μ हे वस्तुमान खोटे असून प्रकल्पग्रस्त नागरीकांची धुळफेक करणारी आहे. आपण प्रकल्पासाठी अभ्यासलेल्या धुळीकणाच्या नमुन्यात २६ ही नमुन्यात Pb-Lead, Cr-Chromium, As-Arsenic, Ni-Nickel, Cd-Cadmium, Hg-Mercury व Ozone असल्याचे स्पष्ट केले आहे, परंतु ग्लोबल वार्मिंगमुळे कोलगाव खाण परिसरातील किंवा खाणीतील कोळसा जळताना कार्बन मोनोक्साईड गॅस, वायु बाहेर निघतो याची नोंद अहवालात केलेली नाही. प्रत्यक्षात कार्बन मोनोक्साईड हा अत्यंत विषारी वायू असतानासुद्धा त्याचा प्रकल्प अहवालात अभ्यासपूर्ण नोंद नसणे म्हणजे मानवी व वन्य जीवावर होणारे विपरित परिणाम याची नोंद नसणे होय. यामुळे हा प्रकल्प अहवाल मानवी व वन्य जीवांच्या जीवनाशी खेळ आहे याचा अर्थ हा अहवालाने परिपूर्ण नाही असा होतो. आपण अभ्यासलेल्या नमुन्यात प्रकल्प अहवालातील कोणत्याही पानांवर Lead, Chromium, Arsenic, Nickel, Cadmium, | |

| | | |
|---|---|---|
| | Mercury आणि Ozone यांचा मनवी परिणामांचा सविस्तर नोंद नाही. Pb-Lead मुळे मानवात व्यंधत्व वाढीवी लागते. लिडयुक्त धुळीकणांमुळे मेंदुला इजा पोहोचते, किडनीवर परिणाम होतो, आयुष्य कमी होतो, हृदयावर परिणाम होतात. मानव किंवा वन्यजीव क्रोमियमच्या संपर्कात आल्यास फुफ्फुस, यकृत आणि मुत्रपिंड यांना हानी पोहोचते. Arsenic-प्रदूषणाने आर्सेनिकचे प्रमाण वाढल्यास त्वचा कर्करोग, फुफ्फुसाचा कर्करोग किंवा मुत्राशयाचा कर्करोग वाढतो. आपल्या प्रकल्प अहवालात केवळ विपरीत (Adverse) परिणाम होतात एवढाच उल्लेख असून रोगांसंबंधी कोणतीही माहिती आढळत नाही. यामुळे प्रकल्प अहवाल तयार करताना प्रकल्पबाधित गावातील नागरीकांना अंधारात ठेवण्याचा उद्देश हेतु दिसतो. SO२ सल्फर डायऑक्साईड हा अत्यंत विषारी वायु आहे जो कोळसा जाळण्याच्या प्रक्रियेतून बाहेर निघतो. त्यामुळे डोळे, फुफ्फुस, हृदय यावर विपरीत परिणाम होतो. त्याचप्रमाणे या वायुंमुळे असह्य वेदना देणारे चर्मरोग, लालडाग, त्वचेवर फोड येणे या प्रकारातील आजार होण्याची शक्यता असते. नायट्रोजन ऑक्साईडमुळे मानव व वन्यजीवांना श्वसनाचा त्रास होऊन फुफ्फुसाची कार्यक्षमता कमी होते ज्यातून अस्थमा नावाचा आजार निर्माण होतो आणि हृदयसुद्धा बंद पडण्याचा आजारा जडतो. आपल्या प्रकल्प अहवालाच्या भाग-१ व भाग-२ मध्ये आम्ही मुद्दा क्रं. २ ते मुद्दा क्रं. ६ मध्ये नोंदविलेल्या आक्षेपातील कोणत्याही मानवी जीवावरील परिणामांचा व आजारांचा उल्लेख आढहत नाही. त्यामुळे आपण तयार केलेला अहवाला संदिग्ध व अपूर्ण आहे. शेतीवर होणारा परिणाम- कोलगाव खाण प्रकल्पा अधिग्रहीत शेतजमीनी व्यतिरिक्त उर्वरित शेतजमीनीवर परिसरातील वातावरणाच्या घनतेचा परिणाम होत असतो. वातावरणाची घनता व आर्द्रता यामुळे धुळीकणाची दिशा वाहणाऱ्या हवेच्या वेगावर अवलंबून असते. वातावरणाची आर्द्रता व घनता कमी झाल्यास धुळीकणाचे हवेद्वारे होणारे वहन | |

| | | |
|---|---|---|
| | वेगाने होत असल्यामुळे ते धुळीकण उर्वरित शेतीयोग्य जमीनीत साचतात. त्यामुळे शेतजमीनीचा पोत कमी होऊन शेतजमीन अधिक कठीण व कडक होते. यामुळे शेतीची उत्पादन क्षमता कमी होते तसेच शेतमजूर व शेतमालकाचे मशागतीची मेहनत व खर्च वाढतो. हा सारा प्रकर दृश्य व अदृश्य धुळीकणामुळे होत असल्याने उर्वरित शेतजमीनीचा अभ्यासपूर्ण आराखडा अहवालात दिसत नाही व शेतजमीनी संबंधी उपाययोजना आढळत नाहीत. मासेमारी व्यवसायावर होणारा परिणाम-वर्धा-पैनगंगा नदी खोऱ्यात मासेमारी व्यवसायावर उदरनिर्वाह करणाऱ्या समूह आहे. प्रकल्प अहवालातील नमूद परिणामकारक घटक काही पाण्यात विरघळणारे असल्याने हवेच्या वेगासह वहन होणारे धुळीकण नदीपात्राच्या पाण्यात विरघळत असल्याने नदीपात्रातील अनेक माशांच्या प्रजाती लुप्त होत आहेत. ज्यामुळे भविष्यात मानवी जीवनात उपयुक्त मासे लुप्त झाल्याने नैसर्गिक मास्यांची बाजारपेठ नाहीयाी होईल व मासेमारी व्यवसायावर अवलंबून असणारा जातीसमूह बेरोजगारीत ढकलला जाईल. आपला प्रकल्प अहवाल तयार करताना १०० मी ते १० किमी परिघात येणाऱ्या गावांचा विचार करण्यात आला आहे. या अहवालात अधिग्रहीत जमीन मालकांच्या हिताचा उल्लेख आढळतो. परंतु भुमिहीन मजूर वर्गाच्या उपाययोजनांचा उल्लेख दिसत नाही किंवा त्यांच्यासंबंधी रोजगाराचा विचार प्रकल्प अहवालात नाही. १०० मी ते १० कि.मी. परिसरात ११,००० लोकसंख्या आहे त्यापैकी ६० टक्के ते ६५ टक्के लोकसंख्या भूमिहीन आहे. त्यामध्ये जातवार विचार केल्यास भूमिहीन वर्गात अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व बारा बलुतेदार वर्गातील भूमिहीनांचे प्रमाण सर्वाधिक आहे. या प्रकल्पातून निर्माण होणारा अस्थायी स्वरूपाचा रोजगार अधिग्रहीत जमीन मालकांच्या वारसांच्या पाल्याऐवजी भूमिहीनांच्या पाल्यास येणे अपेक्षित असताना प्रकल्प अहवालात अस्थायी स्वरूपाचा संभाव्यता रोजगार | |

| | | |
|---|---|---|
| | निर्मितीचा उललेख नाही. त्यामुळे अधिग्रहीत जमीनीवर अवलंबून असणारे भूमिहीन शेतमजूर एक हेक्टर मागे एक मजूर गृहीत धरल्यास प्रकल्पबाधीत गावात ५२० हेक्टर भागे ५०० मजूर, भूमिहीन बेरोजगार होणार आहेत. म्हणून आपण सादर कलेला कोलगांव कोळस खाण वाढीव प्रकल्प अहवाल सामान्य जनतेची फसवणूक व धूळफेक करणारा असून केवळ शेतमालकांचा वा त्यांच्या रोजगाराचा विचार करणार आहे. आपल्या कोलगाव प्रकल्प अहवालात १९९४ च्या वर्धा व पैनगंगा नद्यांना आलेल्या महापूराचा उल्लेख आहे व त्यात उच्च पूर नियंत्रित रेखा असलेल्या घुग्घूस कडील बाजूस १९९४ च्या महापूराने ओलांडल्याचे दर्शविते, परंतु पैनगंगा नदीने उच्च पूर नियंत्रित रेषा ओलांडली नसल्याचे दर्शविले आहे. परंतु पैनगंगा नदीच्या उच्च पूर नियंत्रित रेषेच्या ऊंचीचे मोजमाप नसतानाच्या प्रकल्पाने लावलेला जावई शोध नक्कीच फसव्या आहे. त्याचप्रमाणे मुद्दा क्रं. १ ते ९ पर्यंतच्या आक्षेपांचा विचार केलयास मानवी जीवनावर व वन्य प्राण्यांवर विपरीत परिणाम करणारा आहे. हा प्रकल्प अहवाल राष्ट्रहिताच्या नावाखाली भांडवलदारांना गर्भश्रीमंत करून शेतकरी, शेतमजूर यांना मुके कंगाल करणारा आहे. करिता आपण परिस्थितीचा सांगोपांग विचार करून नव्याने प्रकल्प अहवाल तयार करून पुन्हा जनसुनावणी घेण्यात यावी ही मागणी करीत आहोत. या सर्व मुद्यांच्या विश्लेषणातून संविधानच्या कलम २१ व २१ (अ) मधील मानवांच्या संवैधानिक अधिकाराचे उल्लंघन होत असून माणसांच्या मुलभूत अधिकारावर अतिक्रमाण होत आहे. त्यामुहे आपण परिस्थितीचा सांगोपांग विचार करून नव्याने प्रकल्प अहवाल तयार करून पुन्हा जनसुनावणी घेण्यात यावी ही मागणी करीत आहोत. | |

**१४) श्री. निखील शांताराम उपासे, सदस्य, ग्रामपंचायत साखरा (को.) ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ३६ वर्षांपासून मुंगोली खाण या क्षेत्रात कार्यरत आहे. मुंगोली खाणीच्या कोळसा हाताळणी केंद्रातून निघणारी धूळ आम्ही खात आहे. तसेच १० वर्षांपूर्वी पैनगंगा खाणी सुरू झाली तेव्हा आम्हाला वाटले की पूल तयार झाल्यामुळे आमच्या दळण वळणाचा मार्ग मोकळा झाला. त्यामुळे मुंगोलीची धुळ कमी झाली परंतु पैनगंगा खाणीची वाहतूक आमच्या गावातून सुरू झाली. यापरिसरात आणखी कोळसा खाणी सुरू होणार असून माझा साखरा हा गाव प्रदूषणाच्या विळख्यात आहे. प्रौढ व्यक्ति आजार सहन करू शकतात परंतु लहान मुलांना आजार झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार याची माहिती देण्यात यावी. वे.को.लि.तर्फे आरोग्य शिबीर घेण्यात येतात परंतु त्यामध्ये फक्त उच्च रक्तदाब व मधुमेहाचे औषध तसेच छोट्या आजारांवर उपचार करण्यात येतात. परंतु मोठा आजार झाल्यास त्यावर उपचार करण्यात येत नाही. मागील ४ दिवसांपासून पोलिस प्रशासनाच्या वाहनाद्वारे गस्त घालण्यात येत आहे. मा. अध्यक्षांनी जनसुनावणी संपन्न झाल्यानंतर कोलगांव-शिंदोला मार्गे यवतमाळ गाठावे, त्यांना रस्त्यांची अवस्था कशी आहे याची जाणीव होईल. कोलगांव येथे रस्त्याची अवस्था फार वाईट असून गर्भवती महिलेला दवाखान्यात नेणे कठीण झाले आहे. यापूर्वी घुग्घूस येथे पूलाचे बांधकाम करण्यात आले व सर्व वाहतूक शिंदोलापर्यंत सुरळीत करण्यात आली. कोलगांव चेकपोस्ट पासून सिमेंट रस्त्यापर्यंतचा रस्ता खूप खराब झालेला आहे. मी शिंदोला येथून येत असताना रस्त्याच्या कडेला डस्ट अरेस्टर सुरू असल्याचे दिसून आले. मी कुतूहलाने त्याला विचारले की हे केव्हापसून सुरू आहे तर त्याने सांगितले की जनसुनावणी असल्यामुळे सदर अरेस्टर | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | सुरू करण्यात आला असून सादरीकरणाकरिता छायाचित्र काढण्यात येत आहे. स्थानिकांच्या आरोग्याची काळजी कोण घेणार? कोळशाची वाहतूक दिवस रात्र सुरू राहते. पाणी फवरणी फक्त २ तास करण्यात येते. स्थानिकांच्या आरोग्यावर वाहतूकीमुळे होणाऱ्या धुळीच्या उत्सर्जनाचा काय परिणाम होत असेल? वे.को.लि.च्या अधिकाऱ्यांना वारंवार भ्रमणध्वनीद्वारे टँकरसाठी मागणी करावी लागते परंतु पाणी फवारणी करण्यात येत नाही. जनसुनावणी असल्याने आज सकाळी पाणी फवारणी करण्यात आली. यापूर्वी देखील बऱ्याच जनसुनावण्या झाल्या परंतु स्थानिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले नाही. कोळशाची वाहतूक २४ तास सुरू राहू शकते तर पाणी फवारणी २४ तास का करण्यात येत नाही. वे.को.लि.तर्फे प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना पाठपूरावा केल्याशिवाय का करण्यात येत नाहीत. आणखी किती दिवस स्थानिकांना पाठपुरवा करावा लागणार. तसेच वे.को.लि.तर्फे स्थानिक नागरीकांचा विमा देखील काढून देण्यात येत नाही. दोन महिन्यांनंतर घुग्घूसचा पूल दळणवळणाकरिता सुरू होईल त्यावेळी पूर्ण कोळसा वाहतूक माझ्या गावातून होणार आहे. संपूर्ण क्षेत्रात धुळीचा प्रादुर्भाव आहे. आंदोलने केल्याशिवाय उपाययोजना करण्यात येत नाहीत. खाणीतून निघणाऱ्या खाणपाण्याचा वापर का करण्यात येत नाही. पावसाळ्यामध्ये पाणी फवारणीबाबत निविदा काढण्यात येते. दिवसभरात जवळपास १००० वाहने त्या रस्त्याने कोळशाची वाहतूक करतात व त्याकरिता फक्त ०८ टँकरद्वारे पाणी फवारणी करण्यात येते जी अपूरी आहे. वे.को.लि.ने एकदाच कायमस्वरूपी उपाययोजना करावी जेणेकरून प्रदूषणाचा त्रास कमी होईल. आज जनसुनावणी असल्याने सर्व परिसर स्वच्छ करण्यात आला व ठिक-ठिकाणी फलक लावण्यात आले. परंतु संपूर्ण वर्षभर परिसराकडे लक्ष देण्यात येत नाही. वे.को.लि.ने आमच्या गावाचे प्रदूषण मुक्त क्षेत्रामध्ये पुनर्वसन करावे किंवा साखरा | |

| | | |
|---|---|---|
| | गावातून कोळसा वाहतूक वळवून वे.को.लि.च्या डम्पिंग क्षेत्रातून पर्यायी रस्ता तयार करावा. अधिभार ढिगारे टाकण्याऱ्या कंपनीमुळे ०३ अपघातांमध्ये ०३ मृत्यू झाले असून त्यापैकी एक माझा नातेवाईक श्री. संतोष गावंडे रा. भद्रावती, जि. चंद्रपूर हा होता. त्याबाबत वे.को.लि.ने कोणत्या उपाययोजना केल्या, काय मोबदला दिला. गरीब परिवार वे.को.लि.विरूद्ध लढा देऊ शकत नाही म्हणून त्यांना वाऱ्यावर सोडायचे काय. १० वर्षांपूर्वी वे.को.लि. तर्फे सीएसआर निधीमार्फत आमच्या गावात आरओ प्युरिफायर बसविण्यात आले होते. १० वर्षांनंतर आमच्या गावात नाल्या बांधण्यात आल्या. वे.को.लि.कडे पाठपुरावा केल्यास त्यांचे अधिकारी कार्यालयात उपस्थित नसतात. मागील दहा वर्षात साखरा या गावामध्ये वे.को.लि. द्वारे कोणतेही विकास कार्य करण्यात आले नाही. वे.को.लि.ने साखरा या गावामध्ये १२० x ६० चे सामुदायिक भवन बांधून द्यावे. या क्षेत्रामध्ये वीज पुरवठ्याची सोय व्यवस्थित नाही. साखरा या गावामध्ये १० KW क्षमतेचे सौर ऊजा प्रकल्प सुरू करण्यात यावा जेणेकरून पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध होऊ शकेल. कैलास नगर ते साखरा मार्ग दळणवळणासाठी वापरण्यात येतो. सदर रस्त्यावर पथदिवे लावण्यात यावे जेणेकरून साखरा, माथोली, येथील विद्यार्थी व सामान्य नागरीकांना रात्री दळणवळण करणे सोईचे होईल. साखरा, माथोली व कैलाशनगर या गावांमध्ये जवळपास २५०० ते ३००० लोकसंख्या आहे परंतु एखादा मृत्यू झाला तर त्याचे अंतिम संस्कार करण्याकरिता स्मशानभूमी नाही. तसेच वे.को.लि. करिता संपूर्ण परिसर आरक्षित असल्याने शासनातर्फे स्मशानभूमी बांधण्याकरिता जागा उपलब्ध नाही. त्यामुळे वे.को.लि.ने त्यांच्या आरक्षित जागेवर काँक्रिटची स्मशानभूमी सौंदर्यीकरण करून या ३ गावांकरिता बांधून द्यावी. तीन्ही गावांकरिता वे.को.लि.ने ०.५ ते १ किमी अंतरावर स्मशानभूमी बांधून द्यावी. पैनगंगा खाणीतून काळशाची वाहतूक | |

| | |
|---|---|---|
| | वणी येथे एका पुलावरून करण्यात येते. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात साखरा या गावालगत वाहने उभी केली जातात. तसेच पावसाळ्यात परिस्थिती खूप खराब होते. वे.को.लि.च्या आरक्षित जागेवर वाहनांना पार्कींग करण्यासाठी पार्कींग क्षेत्र निर्माण करण्यात यावा जोणेकरून छोट्या वाहनांना दळणवळण करणे शक्य होईल. दुर्घटना झाली तर योग्य मोबदला देखील वे.को.लि.कडून देण्यात येत नाही. मोबदला म्हणून फक्त २-४ लाख रूपये देण्यात येतात. पैनगंगा पूलापासून कोलगाव चेकपोस्ट पर्यंत कोळसा वाहतूकीकरिता स्वतंत्र रस्ता व्हायला पाहिजे. वे.को.लि.ने पूलापासून साखरा गावापर्यंत रस्ता तयार केला परंतु त्या रस्त्याने जाता येत नाही. वे.को.लि.तर्फे चार महिन्यात रस्ता बनविण्याचे आश्वासन देण्यात येते परंतु त्याची पूर्तता करण्यात येत नाही. प्रकल्पग्रस्त क्षेत्रामध्ये मागील दहा वर्षांपासून पक्का रस्ता बनवून देण्याबाबत मागणी करण्यात येत आहे. रस्त्यावर फक्त मुरूम टाकण्यात येत असून रस्त्याचे डांबरीकरण किंवा कॉंक्रिटीकरण करण्यात येत नाही. रस्त्याची अवस्था फार खराब आहे. माझी आग्रहाची विनंती आहे की अध्यक्षांनी जनसुनावणी संपल्यानंतर साखरा शिवणी मार्गे प्रवास करावा जेणेकरून रस्त्याच्या दुरावस्था किती प्रमाणात झाली आहे याची प्रचिती त्यांना होईल. | |

**१५) <u>श्री. दशरथ पाटील, टाकळी, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे.को.लि. स्थानिकांसाठी घातक जरी असले तरी बाहेरच्या लोकांसाठी आरक्षणाचे केंद्र आहे. माझी अध्यक्ष महोदयांना विनंती आहे की त्यांनी आमच्या क्षेत्रात यावे त्यांना आम्ही वाघाचे आमने-सामने दर्शन घडवतो. मी दि. ०६/०४/२०२६ रोजी माझ्या गावाला जात असताना माझ्या वाहनासमोर वाघ आडवा आला. प्रथम दर्शनी माझ्या पत्नीला पुढे डुक्कर | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, दोन खाणींच्या अंतराबाबत असा कोणताही नियम नाही. तसेच चुनखडीचा साठा ज्या ठिकाणी असेल व शासनातर्फे ब्लॉक वाटप करण्यात आल्यानंतर सर्व विभागाच्या परवानग्या घेऊन खाण सुरू करता येऊ शकते. टाकळी गावामध्ये रस्त्याच्या कडेला वे.को.लि.द्वारे |

| | | |
|---|---|---|
| | असल्यासारखे वाटले परंतु वाहनाचे लाईट वाढविला तेव्हा पुढे वाघ असल्याचे दिसले. मागील दहा वर्षांमध्ये वाघाने स्थानिकांना इजा पोहोचविली नाही अशी एकही घटना घडलेली नाही. वाघाच्या अधिवासामुळे आमच्या क्षेत्रातील पाळीव जनावरे देखील संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहेत. या परिसरात प्रदूषणाचा विषय गंभीर आहेच परंतु त्याचसोबत इतरही गंभीर मुद्दे आहेत त्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. आज या परिसरात जी परिस्थिती निर्माण झाली आहे तीच परिस्थिती जर पश्चिम महाराष्ट्रात निर्माण झाली असती तर त्या ठिकाणी काय घडले असते याचा आपण सर्वांनी विचार केला पाहिजे. आम्हाला फक्त परवानगी दिली तर आम्ही या क्षेत्राचे व्यवस्थापन सुधारायला सक्षम आहोत. काही महिन्यांपूर्वी आमच्या परिसरातील एका दामपत्याचा ट्रकखाली चिरडून मृत्यू झाला. रात्री दोन वाजेपर्यंत वाहतूक विस्कळीत झाली परंतु मोबदला देण्याबाबत निर्णय झाला नाही. या ठिकाणी श्री अनिल तेलंग, श्री. विजय पिदूरकर, श्री. विजय गारगाटे सारखे अनुभवी व्यक्तिंनी समस्या मांडल्या आहेत. परंतु त्यांची सरकार असून देखील ते काही करू शकत नाही याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो. त्यामुळे मा. अध्यक्षांना विनंती आहे की त्यांनी प्रशासनाला सरळ करण्याची आम्हाला परवनगी द्यावी. दोन दिवसांपूर्वी मला रात्री जाग आली तेव्हा मला माझ्या खोलीमध्ये संपूर्ण धूळ पसरल्याचे दिसून आले. त्या डस्ट बाबत श्री. तेलंग यांनी अभ्यासपूर्ण माहिती दिलेली आहे. मी बाहेर येऊन पाहिले तर मला वातावरणात धुळ पसरल्याचे दिसून आले. धुळीमुळे पथदिवे देखील स्पष्ट दिसत नव्हते. इतक्या मोठ्या प्रमाणात धुळ पसरली असल्याचे दिसून आले. मा. पर्यावरणी मंत्री यांचा दौरा असल्याने या परिसरातील बहुतांश कंपन्यांनी त्यांचे उत्पादन घेणे बंद केले असल्याने वातावरणात धुळ दिसली नाही. अस्तित्वात असलेल्या खाणीच्या शेजारी किती कि.मी. अंतरावर खाण सुरू करण्यात येऊ शकते | वृक्षारोपण करण्यात आले होते. परंतु त्या क्षेत्रात फोसोपिसची झाडे जास्त प्रमाणात असल्याने वे.को.लि.ने लावलेली झाडे जास्त प्रमाणात जिवंत राहू शकली नाहीत. मध्य प्रदेश राज्य वन विकास निगम लिमिटेड यांच्यातर्फे वृक्षारोपण करण्यात आले आहे. त्यांचे देयक सद्य:स्थितीत अदा करण्यात आले नसून त्यांनी वचन दिले आहे की जी झाडे जगू शकली नाहीत अशा झाडांचे फोसोपीस प्रजातीचे संपूर्ण निर्मूलन करून परत वृक्षारोपण करण्यात येईल. सदर वृक्षारोपण येत्या पावसाळ्यात करण्यात येणार असल्याचे मध्य प्रदेश राज्य वन विकास निगम लिमिटेड यांनी वचन दिले आहे. सतत वातावरणीय वायु गुणवत्ता तपासणी सयंत्रणा मुंगोली खाणीतील कोलगांव चेकपोस्ट येथे बसविण्यात आले आहे. मुंगोली, पैनगंगा, निलजय सब एरिया ऑफिस व बेलोरा नायगांव सब एरिया क्षेत्रात सतत वातावरणीय वायु गुणवत्ता तपासणी सयंत्रणा बसविण्यात आली आहे. पर्यावरणीय मंजूरी देताना त्यामध्ये अट घालून देण्यात येते. त्यानूसार त्याची जागा निश्चित करण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्यात येतो. नजिकच्या काळा पर्यावरणीय मंजूरीमध्ये गावांमध्ये देखील सदर यंत्रणा बसविण्याबाबत अट घालण्यात आली असल्याने गावांमध्ये देखील सदर यंत्रणा बसविण्याचे प्रस्तावित आहे. मुंगोली खाणीतील एक यंत्रणा कोलगाव चेकपोस्ट येथे बसविण्यात आली असून दुसरी यंत्रणा केंद्रीय मंत्रालयाच्या निर्देशानूसार गावाच्या दिशेने बसविण्यात येणार आहे.<br><br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, खाणींना केंद्रीय मंत्रालयाकडून पर्यावरण मंजूरी प्रदान करताना त्यामध्ये सतत वातावरणीय वायु गुवणत्ता |

| | | |
|---|---|---|
| | याची माहिती देण्यात यावी. तसेच कोळशा व्यतिरिकत इतर खनिजासाठी खाणकाम किती किमी अंतरापर्यंत करता येऊ शकते याची माहिती प्रकल्प प्रवर्तक देऊ शकतील काय. अंदाजे ५०० मीटर पेक्षा कमी अंतर असल्यास दुसरी खाण सुरू करता येऊ शकत नाही असा बहुतेक नियम आहे. पण चिखली आणि टाकळी गावांच्या चारही बाजूने सिमेंट कंपनी, कोळसा खाण प्रकल्प व चुनखडी खाण प्रकल्प असून या उद्योगांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. याबाबत मा. अध्यक्षांना शंका असल्यास त्यांनी त्या क्षेत्राची आमच्यासोबत पाहणी करावी. अशा प्रकारचया चुकीच्या परवानग्या शासनातर्फे देण्यात येत असल्यास सामान्य नागरीकांनी कोणाकडे तक्रार करावी. दालमिया कंपनीने नदीच्या पलीकडे खाणकाम सुरू केले आहे. त्याचे अंतर फक्त ०.५ कि.मी. आहे. दुसऱ्या बाजूला कोळसा खाण आहे, तिसऱ्या बाजूला एसीसी आहे व चौथ्या बाजूला विरूर आहे. जर अशीच परिस्थिती असेल आणि आपण फक्त स्थानिकांचे मत नोंदवून पुढे सादर करणार असल्यास आम्हाला ही जनसुनावणी मान्य नाही. वे.को.लि.ने सादरीकरणादरम्यान त्यांनी केलेले कार्य दाखवून त्यांची बाजू सुरक्षित केली आहे. परंतु या ठिकाणी आम्हाला आमच्या प्रश्नांची उत्तरे मिळायला पाहिजे होती. आमचे जगणे जर वरचे अधिकारी ठरवत असतील तर या जनसुनावणीला अर्थ नसल्याचे माझे मत आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांवर कोणचेही नियंत्रण नसायला पाहिजे. तसेच यामध्य शैक्षणिक सुविधा व आरोग्य विषयक सुविधांचा समावेश देखील करण्यात यावा. कोलगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टर किती वर्षांपासून नाही याची चौकशी करण्यात यावी. तसेच जनावरांच्या दवाखान्यात देखील डॉक्टर उपलब्ध नाही. मागील १५ वर्षांपासून जर प्रशासन डॉक्टर नेमण्यात अपयशी असेल तर आम्हाला विश्वास कसा बसणार हा मोठा प्रश्न आहे. कोळसा खाणींमुळे आमचे जीवन धोक्यात आले असून आम्हाला | तपासणी केंद्र बसविण्याची अट घालून देण्यात येते व ते केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हरशी जोडलेले असते. विस्तारीकरण प्रकल्पाच्या पर्यावरणीय मंजूरीमध्ये कोण-कोणत्या ठिकाणी यंत्रणा बसविण्याची गरज आहे त्या ठिकाणी यंत्रणा बसविण्याची अट पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून वे.को.लि.ला देण्यात येईल. त्या ठिकाणी वे.को.लि.ने सदर वायु गुणवत्ता तपासणी यंत्रणा बसविणे बंधनकारक आहे. आपले मताची नोंद घेण्यात येत असून त्याचे ईतिवृत्त मंत्रालयाकडे सादर करण्यात येणार आहे.<br><br>प्रकल्व प्रवर्तकांनी सांगितले की, आजच्या जनसुनावणीचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग पर्यावरण मंत्रालयाकडे सादर करण्यात येतात. पर्यावरण मंत्रालय जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत वे.को.लि. कडून केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल मागविते. केलेल्या कार्यवाहीबाबत पर्यावरणीय समितीचे समाधान झाल्यानंतरच पर्यावरणीय मंजूरी देण्यात येते. तसेच त्याबाबत लागणारा निधी व कालावधीबाबत अहवाल सादर करावा लागतो. तसेच पर्यावरणीय मंजूरीमध्ये त्याबाबत अटी घालून देण्यात येत असून त्याचे पालन करणे बंधनकारक आहे. पुरामुळे नूकसान झालेल्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल व निर्देश प्राप्त होताच कार्यवाही करण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, वे.को.लि.ला जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे पर्यावरण समिती यांचेकडे सादर |

| | | |
|---|---|---|
| | वाचवणार कोण? आमच्या जमीनीमधून पिक पिकू शकते, कोळसा निघू शकतो, पेट्रोल-डिझेल निघू शकते. परंतु आम्हा प्रशासनाला आमच्या जमीनी विकून स्वत: करिता मृत्यूचे दार उघडले आहे. शेतमालाला भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी त्यांच्या जमीनी वे.को.लि.ला विकल्या. वे.को.लि.ने खाणीचे आयुष्य संपल्यानंतर शेतकऱ्यांना त्यांच्या जमीनी नियमानूसार परत करायला पाहिजे होत्या. परंतु तसे काही करण्यात आले नाही. आमच्या गावातील असंख्य कुशल अकुशल कामगार बेरोजगार झाले आहेत. वे.को.लि.कडे त्यांच्याकरिता रोजगार मागितल्यास रोजगार मिळत नाही. लोकप्रतिनिधींच्या शिफारशीनूसार त्यांच्या कार्यकर्त्यांना रोजगार मिळतो. परंतु स्थानिकांना रोजगार मिळत नाही. त्यामुळे स्थानिक बेरोजगार युवक व्यसनाधीन होतो व त्याचे आयुष्य खराब होते. निसर्गाची सेवा आमच्या पेक्षा जास्त कोणी करू शकत नाही. प्रत्येकाने निसर्गाचे भान ठेवले पाहिजे. माझ्या भागातील किती मुलं सुशिक्षीत होतात. कोळसा खाण सारख्या उद्योगांमुळे उत्पन्न वाढत असून त्याचा फायदा या क्षेत्रातील शैक्षणिक स्तर ऊंचावण्याकरिता व्हायला पाहिजे. परंतु तसे होताना दिसत नाही. ९०टक्के लोक संपले असून फक्त १० टक्के लोक व्यवस्थित असल्याचे व त्यांचे जीवनमान ऊंचावल्याचे दिसून येते. याबाबत शासन का विचार करत नाही हा महत्तवाचा प्रश्न आहे. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत रस्ता बनवून दिला आहे. वे.को.लि.ने दिलेली आकडेवारी खोटी आहे. माझ्या टाकळी गावामध्ये वनीकरण करण्यात आले त्यामध्ये किती खर्च केला व त्यातील किती झाडे शिल्लक आहेत याची माहिती वे.को.लि. ने द्यावी. तसेच आमच्या शेतातील फोसोपिस झाडांचे निर्मूलन कशा प्रकारे करण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. फोसोपिस या झाडामुळे जमीन नापिक होते. तसेच परिसरामध्ये वाघाचा अधिवास देखील वाढतो. वे.को.लि.च्या एका अधिकऱ्याने सांगितले | करणे बंधनकारक आहे. सदर जनसुनावणीचे ईतिवृत्त मंत्रालयाकडे सादर करण्यात येतात व वे.को.लि.ला पर्यावरण समितीपुढे त्यांची उत्तरे देखील सदर करावी लागतात. पर्यावरणीय मंजूरी ही अटी व शर्तीसहीत देण्यात येते. त्यामध्ये काही अटींची पूर्तता एखाद्या उद्योगाने न केल्यास पर्यावरणीय मंजूरी रद्द देखील करण्यात येऊ शकते. पर्यावरण मंत्रालयाच्या अटी व शर्तींचे उल्लंघन करता येत नाही तसेच समितीने सांगितलेल्या उपाययोजना मान्य करणे बंधनकारक आहे. वे.को.लि.ला त्रुटींची पूर्तता करावीच लागते त्याशिवाय पर्यावरण मंजूरी मिळत नाही. आपण उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची नोंद घेण्यात आली असून ते शासनापुढे सादर करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | की, फोसोपिसची लागवड वे.को.लि.द्वारे करण्यात आली असून त्यामुळे माती वाहून जात नाही. याबाबत माझ्याकडे लेखी पुरावा नसल्यामुळे मी सिद्ध करू शकत नाही. परंतु प्रदूषणाबाबत माझ्याकडे व्हिडीओच्या माध्यमातून पुरावे आहेत. प्रदूषणाबाबत प्रशासन व शासनाने गांभीर्याने विचार करावा कारण अज लोक सहन करत आहेत. परंतु पुढची पिढी सहन करणारी नसून प्रतिकार करणारी आहे हे शासनाने लक्षात घ्यावे. आमच्या जमीनीतून मोठ्या प्रमाणात कोळसा उत्खनन करून आमच्या जमीनी सपाटीकरण करून आम्हाला परत करण्यात याव्या. कायद्याची अंमलबजावणी होणे अत्यांत महत्त्वाचे आहे. कार्बन क्रेडिटमध्ये वे.को.लि.तर्फे गंतवणूक करण्यात येत आहे. कार्बन क्रेडीटचा फायदा शेतकऱ्यांना देखील मिळाला पाहिजे. प्रदूषण मोजणी यंत्र वे.को.लि.ने कोण कोणत्या ठिकाणी लावली आहेत याची माहिती देण्यात यावी. स्थानिक नागरीकांना प्रदूषणाची पातळी मोजायची असल्यास त्याची व्यवस्था काय आहे. सतत वातावरणीय वायु गुणवत्ता तपासणी सयंत्रणा विश्वासार्ह आहे काय. ब्लास्टींगमुळे शेतकऱ्यांना शेती करताना श्वास घेणे कठीण होते. या जनसुनावणीनंतर परत एक जनसुनावणी होणार आहे काय व त्या ठिकाणी जनतेच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यात येणार आहेत काय. स्थानिक नागरीकांना यातून काय मिळणार किंवा काय मिळाले हे कळत नाही. तसेच प्रदूषणाबाबत केलेल्या उपाययोजनांचा स्थानिकांना लाभ होताना दिसत नाही. आम्ही आमच्या जमीनी कोळसा उत्खनन करता येईल म्हणूण विकल्या. कोळशातून वीज निर्मिती होत असून त्याचा वहन अधिभार आमच्याकडून वसूल करण्यात येतो. प्रकल्पग्रस्तांना किमान २०० युनिट वीज मोफत मिळायला पाहिजे. या क्षेत्रातील खाणी वर्धा आणि पैनगंगा नद्यांच्या खोऱ्या आहेत. या नद्यांच्या खोऱ्यामध्ये अधिभार ढिगारे टाकल्यामुळे नदीचे पाणी गावामध्ये येते. सन २००६ च्या महापूरामध्ये आमची | |

| | | |
|---|---|---|
| | गावांना पूराचा फटका बसला आहे. भविष्यात त्यापेक्षा गंभीर परिस्थिती निर्माण होणार असून त्याबाबत प्रशासनाच्या काय उपाययोजना आहे त्याची माहिती देण्यात यावी. मी सन २००६ मध्ये आंदोलन केले होते. त्यावेळी सर्वेक्षण करण्यात आले होते व आश्वासन देण्यात आले होते की नूकसान भरपाई देण्यात येईल. परंतु आजपर्यंत कोणत्याही शेतकऱ्यला नूकसान भरपाई मिळालेली नाही. स्थानिकांच्या जागरूकतेमुळे व कोल इंडीयाच्या प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांना या क्षेत्रात पहिल्यांदा धुळीमुळे पिकांचे नूकसान झाल्यामुळे नूकसान भरपाई मिळालेली आहे. आम्ही आश्वासनांवर किती दिवस जगायचे हा प्रश्न आहे. गावांमध्ये जे नूकसान होत आहे त्याकरिता वे.को.लि.कडे कोणत्याही प्रकारच्या तरतूदी नाहीत. लोकांच्या आक्रोशामुळे काही तरी कार्यवाही करण्यात येते परंतु ठोस उपाययोजना करण्यात येत नाही. ज्या स्थानिकांच्या जमीन अधिग्रहीत करण्यात येतात व नोकरी देण्यात येते अशा नागरीकांना सर्व सोई सुविधा मिळते. परंतु उर्वरित नागरीकांना काहीच मिळत नाही. मागील १४ वर्षांपासून भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना यामध्ये योग्य भरपाई व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ नूसार आमच्या जमीनीच्या किंमतींमध्ये वाढ झालेली नाही. आमच्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर मिळत नसल्याने या जनसुनावणीला अर्थ नाही. आजच्या जनसुनावणीमध्ये स्थानिक नागरीकांचे समाधान झाले नसल्यास सदर जनसुनावणी रद्द करून पुढे परत घेण्यात येणार काय. जनसुनावणीच्या सुरूवातीला येथील स्थानिक नागरीकांनी या प्रकल्पाला विरोध दर्शविलेला असून प्रकल्प अहवाल खोटा असल्याचे देखील सांगितले आहे. | |

१६) **<u>श्री. विजय शामराव गारगाटे, उप-सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या ठिकाणी अनेक प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या समस्या मांडल्या व प्रशासनाच्या लक्षात आणून दिले. परंतु आपण जनसुनावणीच्या सुरूवातीला सांगितले की ही जनसुनावणी कायदेशीर आहे. परंतु आमचे मत आहे की सदर जनसुनावणी ही पूर्णपणे बेकायदेशीर आहे. कारण वे.को.लि.ने दिलेल्या सादरीकरणाप्रमाणे या ठिकाणी कार्य झालेले नाही. प्रकल्पग्रस्तांना जनसुनावणी समितीचे अध्यक्ष न्याय देऊ शकतात. या सादरीकरणामध्ये व प्रकल्प अहवालामध्ये दुरूस्ती करून सदर जनसुनावणी महिन्यानंतर किंवा दोन महिन्यांनंतर योग्य स्थळी परत घेण्यात यावी. तसेच प्रकल्पग्रस्तांना देण्यात येणाऱ्या नोकऱ्यांचे नियुक्तिपत्र जनसुनावणीदरम्यान वाटप करण्यात यावे. मागे कोलगांव खाणीची जनसुनावणी त्रुटी असल्याने रद्द करण्यात आली होती. मागील जनसुनावणीच्या त्रुटी पूर्ण केले व नोकऱ्यांचे नियुक्तिपत्र दिले तेव्हा त्या जनसुनावणीस मान्यता मिळाली. या जनसुनावणीदरम्यान जे सादरीकरण करण्यात आले ते चुकीचे आहे. याबाबत सर्व उपस्थितांनी सांगितले आहे. वे.को.लि.ने सादरीकरणातील सर्व दुरूस्त्या कराव्या व किमान २५ टक्के कामगारांच्या नियुक्तिचे पत्र सोबत आणावे तेव्हा या जनसुनावणीला आम्ही मान्यता देऊ. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

१७) **<u>श्री. श्रीकृष्ण गजानन पानघाटे, कोलगांव, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे.को.लि.तर्फे रस्त्याच्या दुरूस्तीची निविदा निघाली नाही तर येत्या १५ दिवसांच्या आत वे.को.लि.ची वाहतूक बंद करण्यात येईल. रस्त्याच्या बांधकामाचा | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कोलगांव चेकपोस्ट ते पुलापर्यंतच्या रस्त्याची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून मानसून |

| | | |
|---|---|---|
| | अधिकार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे किंवा वे.को.लि.कडे आहे याचे स्पष्टीकरण देण्यात यावे. कारण त्या रस्त्यावरून मुकुटबन ते चंद्रपूरला प्रवास करणे शक्य होणार आहे. सदर रस्त्याच्या बांधकामाकरिता एक महिन्याची मुदत देण्यात येत आहे. सदर रस्त्याचे काम पूर्ण न झाल्यास वे.को.लि.ची वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात येईल. चेकपोस्ट ते पुंजा हा रस्ता पूराच्या पाण्यात वाहून जातो व गावाचा संपर्क तुटतो. तो रस्ता देखील दुरूस्त करण्यात यावा. | पूर्वी सदर रस्त्याचे काम करण्यात येईल. सदर १.१ किमी रस्त्याचं बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल. |

## १८) <u>श्री. अरविंद जनार्दन उमरे, मुंगोली, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | साहेब, आपण पुनर्वसन विभागाचे अध्यक्ष आहेत. एखाद्या गावाचे पुनर्वसन केल्यानंतर कंपनीतर्फे कोण कोणत्या सुविधा देण्यात येतात याबाबत पुनर्वसन विभागाला माहिती आहे. मुंगोली गावाचे पुनर्वसन चोर्ली या गावाजवळ करण्यात आले. परंतु त्या ठिकाणी आजपर्यंत पाण्याची सुविधा पुरविलेली नाही. वे.को.लि.ने ३००-४०० फुट खोदुन स्वत:ची बोरवेल उभी केली परंतु तेथे सुविधा देण्यात आली नाही. तसेच रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. नाल्याचे काम करण्यात आले परंतु ते देखील निकृष्ट दर्जाचे असल्याने नाले तुटलेले आहेत. पथदिवे देखील बसविलेले नाहीत. सौर ऊर्जेवर चालणारे पथदिवे बसविण्यात आले असून ते व्यवस्थित कार्यरत नाहीत. माझी मुंगोली ग्रामपंचायत मार्फत मागी आहे की वे.को.लि. तर्फे गावामध्ये बोरवेल बसवून आरओ प्लांट लावण्यात यावा जेणेकरून स्थानिकांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळणार. पुनर्वसन केलेल्या गावामध्ये शुद्ध पिण्याचे पाणी, रस्ते, नाले, अंगणवाडी व प्राथमिक शाळेची सुविधा तात्काळ देण्यात यावी. वे.को.लि.चे पुनर्वसन केलेल्या गावांकडे दुर्लक्ष होत आहे. गावांमध्ये सुविधा | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, वीज पुरवठ्याचे काम झाले आहे, नाल्याचे काम झाले आहे. पिण्याच्या पाण्याकरिता चार बोरवेल करण्यात येणार आहेत. पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे काम होणे बाकी आहे. पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनचे काम झाले असून लवकरच पाण्याच्या टाकीचे काम सुरू करून पूर्ण करण्यात येईल. टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येईल. सीएसआर निधीमार्फत आरओ प्लांट बसविण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | पूरविल्याशिवाय पुनर्वसन करण्यात येऊ नये. पुनर्वसनाच्या मोबदल्यातून निम्मी रक्कम बोरवेलकरिता खर्च होत असेल तर घर कसे बांधता येईल. घरकुल योजनेमध्ये मिळालेली रक्कम तुरळक असून त्यामध्ये घर बांधणे शक्य नाही. ज्या कंत्राटदाराला वे.को.लि. ने निविदा दिली त्याचे देयक जोपर्यंत सर्व सुविधा पूरविण्यात येत नाही तोपर्यंत वे.को.लि.ने थांबवायला पाहिजे. मुंगोली गावाचे पुनर्वसन करताना नमूद करण्यात आले होते की त्या ठिकाणी काँक्रिटचे रस्ते, नाल्या, पाण्याची सुविधा, वीजेचा पुरवठा, खेळण्यासाठी मैदान, शाळा, मंदिर बनवुन देण्यात येईल. परंतु आजपर्यंत यापैकी कुठलीही सुविधा देण्यात आलेली नाही. माझी विनंती आहे की, मे महिन्यापर्यंत पाण्याची सुविधा झाली पाहिजे. वे.को.लि.ने ग्रामपंचायतीमार्फत बोरवेलची सुविधा दिली तर फार चांगले होणार. तसेच गावामध्ये नळाची सुविधा पूरविण्यात आली असून पाण्याची टाकी उभारण्यात आली नाही. २०१८ साली विरूर गाडेगांव या गावाचे पुनर्वसन केले. त्या ठिकाणी पाण्याची सुविधा प्रथम करण्यात आली. परंतु मुंगोली गावामध्ये का करण्यात आली नाही. वे.को.लि.तर्फे प्रत्येक घराला पाण्याच्या कॅनचे वाटप करणे शक्य आहे काय. सीएसआर निधीमार्फत पिण्याच्या पाण्याची सुविधा केली तर लवकर काम हाईल. गावातील मजूरवर्ग त्यांच्या दैनंदिन मजूरी करायला जातील की पाण्याची वाट पाहत बसतील. | |

## १९) श्री. विजय शामराव गारगाटे, उप-सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे.को.लि.ने तात्काळ पिण्याच्या पाण्याची सुविधा करावी व गावकऱ्यांचे पुनर्वसन करताना सर्वप्रथम पिण्याच्या पाण्याची सुविधा पूरवावी. तसेच वे.को.लि.ने गावकऱ्यांना नियमित पाणी पूरवावे. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, सदर जनसुनावणी ०.६० दशलक्ष टन प्रतिवर्ष ते |

| | | |
|---|---|---|
| | पुनर्वसन योग्य न केल्याबाबत वे.को.लि.च्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावे. प्रकल्पग्रस्त गावातील सरपंच व इतर पदाधिकारी यांनी त्यांच्या गावातील समस्या मांडण्याचा प्रयत्न या वे.को.लि.च्या जनसुनावणीदरम्यान केला आहे. ग्रामस्थांच्या समस्या सोडविण्याकरिता व वे.को.लि.कडून सीएसआर मार्फत विकास कामे करून घेण्याकरिता उपविभागीय अधिकारी, गट विकास अधिकारी, सरपंच व इतर पदाधिकारी यांची एक समिती नेमून वे.को.लि.ने केलेल्या विकासकामांचा दर ३, ६ किंवा १२ महिन्यात आढावा घेता येऊ शकते किंवा कसे या पर्यायाचा विचार करावा. त्यामुळे स्थानिकांच्या समस्यांचे निराकरण करणे शासनाला सोईचे होईल. सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी कारण त्यांच्या सादरीकरणामध्ये ९० टक्के त्रुट्या आहेत. तसेच ज्या शेतकऱ्यांच्या प्रकरणांमध्ये त्रुटी नाहीत अशा शेतकऱ्यांना स्थानिक प्रकल्पामध्ये नोकरी देण्याचे नियुक्ति पत्रासह परत जनसुनावणी घेण्यात यावी. त्रुटींची पूर्तता करून परत १-२ महिन्यांमध्ये जनसुनावणी घेण्यात यावी. चुकीच्या सादरीकरणाला मंजूरी का देण्यात येत आहे. सदर जनसुनावणी बेकायदेशीररीत्या घेण्यात येत असल्याचा माझा आरोप आहे. वे.को.लि.ला गावांचे अंतर माहिती नाही, प्रदूषणाचा स्तर काय हे माहिती नाही तसचे पाण्याची पातळी किती खालावली आहे हे देखील माहिती नाही. | ०.८० दशलक्ष टन प्रतिवर्ष या वाढीव उत्पादनाकरिता व खाण लीज क्षेत्रामध्ये १२३ हेक्टर ने वाढ करण्याबाबत आहे. यामध्ये अतिरिक्त मुद्दे देखील येत आहेत. मुंगोली गावाचा विषय या जनसुनावणीशी संबंधित नाही. मुंगोली गावाच्या समस्यांबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल याबाबत स्थानिकांनी आश्वस्त राहावे. वे.को.लि.ला पर्यावरण समितीसमोर सर्व प्रश्नांचे उत्तरे देणे बंधनकारक असून पर्यावरण समितीचे समाधान झाल्यानंतरच त्यांना अटी व शर्तीसह पर्यावरणीय मंजूरी देण्यात येईल. वे.को.लि.ने अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्यास त्यांची पर्यावरणीय परवानगी रद्द देखील होऊ शकते. आपल्या सर्व मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

**२०) श्री. अनिल तेलंग, मुख्य संयोजक, आंबेडकरी जन आंदोलन, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | महोदय, आपण या जनसुनावणीचे अध्यक्ष या नात्याने जनसुनावणीचा निष्कर्ष करणार आहात. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, जनसुनावणीचे निष्कर्ष करण्याचे अधिकार मला नाहीत. |

| | | |
|---|---|---|
| | | पर्यावरण समितीतर्फे याबाबत निष्कर्ष काढण्यात येईल. आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात येत असून वे.को.लि.ला पर्यावरण समितीसमोर सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देणे बंधनकारक आहे. जर उत्तरे समाधानकारक नसेल तर समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल. |

## २१) श्री. विजय पिदुरकर, माजी सदस्य, जिल्हा परिषद यवतमाळ, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे.को.लि. हा भारत सरकारचा उपक्रम असून पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याकरिता सीएसपीडीआयएल यांचेकडे काही रक्कम जमा केली आहे. सदर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल ज्या आधारावर तयार करण्यात आला ता त्रुटीयुक्त आहे. त्रुटीयुक्त अहवालामुळे सर्वांची शक्ती वाया जात आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचे अवलोकन करण्यात येत नाही. आम्ही अहवालाच्या अनुषंगाने पान क्रमांकासहीत संदर्भ देऊन वारंवार सिद्ध करतो की अहवाल खोटा आहे, त्याकडे देखील दुर्लक्ष करण्यात येते. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना, २००९ नुसार जर जनसुनावणी कायदेशीररीत्या घेण्यात येत असेल तर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचे सखोल अवलोकन होणे गरजेचे आहे. ज्यांनी अहवाल तयार केला त्यांना येथे उपस्थित करणे गरजेचे आहे जेणेकरून हवाई अंतर मोजले किंवा कसे याबाबतच्या शंकेचे निराकरण होईल. सदर अहवाल केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे व भारत सरकारच्या पर्यावरण मंत्रालय यांचेकडे सादर करण्यात येतो. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करणाऱ्या व्यक्तिंना अहवालामध्ये चुका | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, अहवाल तयार केला म्हणजे त्याला मान्यता मिळत नाही. अहवालामध्ये त्रुट्या असल्यास त्यामध्ये दुरूस्ती करून अंतिम अहवालामध्ये दुरूस्त्या करण्यात येतात. |

| | | |
|---|---|---|
| | झाल्याबाबत वे.को.लि.द्वारे कळविण्यात यावे. जेणेकरून भविष्यात या चुका परत होणार नाहीत. | |

## २२) श्री. अनिल तेलंग, मुख्य संयोजक, आंबेडकरी जन आंदोलन, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सन २०१०-१२ दरम्यान इस्पात इंडीया लि. या उद्योगाची जनसुनावणी घेण्यात आली होती. त्या वेळेस देखील अहवालामध्ये त्रुट्या असल्याने आम्ही जनसुनावणी हाणून पाडली व तत्कालीन अध्यक्षांनी ती जनसुनावणी रद्द करण्यात आल्याचे जाहीरपणे सांगितले होते. त्यामुळे जनसुनावणी रद्द करण्याचे अधिकार अध्यक्षांना आहे. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## २३) श्री. विजय पिदुरकर, माजी सदस्य, जिल्हा परिषद यवतमाळ, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ज्यांनी अहवाल तयार केला त्यांना अहवालातील चुका लक्षात आणून देण्यात यावे. जनसुनावणी झाल्यानंतर त्यामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांची पूर्तता केल्याची माहिती सामान्य जनतेपर्यंत पोहोचत नाही. टीओआर फक्त ३ पानांचे पत्र येते. सदर समितीकडे स्थानिक पातळीवर निराकरण करण्यायोग्य आक्षेपांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार असल्याने सदर समितीवर अध्यक्ष नेमण्यात आले आहेत. आमचे म्हणणे एवढेच आहे की शासकीय कंपनीने त्यांच्या अहवालामध्ये झालेल्या चुका मान्य कराव्या. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपण उपस्थित केलेल्या चुकांची नोंद घेण्यात येत असून त्याचे छायाचित्रीकरण देखील करण्यात येत आहेत. सदर जनसुनावणीचे ईतिवृत्त पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे सादर करण्यात येईल. जनसुनावणीच्या प्रक्रियेमध्ये स्थानिकांचे मत, सुचना व आक्षेपांची नोंद घेऊन ते शासनाकडे सादर करणे ही कार्यकक्षा आहे.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, |

| | | |
|---|---|---|
| | | यवतमाळ यांनी सांगितले की, पर्यावरण समितीपुढे ईतिवृत्त सादर झाल्यानंतर समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेणार. सदर समितीमध्ये जनसुनावणी समितीला स्थान नाही. |

२४) **प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | वे.को.लि.कडे जनसुनावणी आयोजित करण्यासाठी सामुदायिक सभागृह उपलब्ध असून ते प्रस्तावित प्रकल्प स्थळाच्या जवळ आहे. तसेच खाण प्रकल्प हा वे.को.लि.च्या वणी क्षेत्रांतर्गत येत असल्याने जनसुनावणीचे आयोजन कैलासनगर येथील मनोरंजन केंद्रामध्ये करण्यात आले. |

२५) **श्री. राजेंद्र ढवस, कोलगाव, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सर्वे क्रं. १६० ते १७० पर्यंत पावसाळ्यात पाणी शिरते व डस्ट मोठ्या प्रमाणात येते. आजपर्यंत माझे शेत अधिग्रहीत करण्यात आले नाही. तसेच त्याचा मोबदला देखील देण्यात आला नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपली जमीन प्रस्तावित खाणीच्या नंतर असल्याने घेण्यात आली नाही. मशीनद्वारे आपल्या जमीनीतील पाणी बाहेर काढण्यात येईल. खाणीचे आणखी विस्तारीकरण करण्यात येणार आहे व त्यादरम्यान आपली जमीन अधिग्रहीत करण्यात येईल. |

२६) **प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | कोलगांव प्रकल्पाकरिता सेक्शन ४ च्या वेळेस १४५.७४ हेक्टर जमीन संपादित करण्याचे प्रस्तावित होते. त्यानंतर सीएमपीडीआयएल व मुख्यालयातून त्यामध्ये सुधारणा करण्यात आली व आंशिक संपादनाची प्रक्रिया थांबविण्यात आले होते. त्यामध्ये १४५.७४ हेक्टर ऐवजी १३३.९७ हेक्टर जागा अधिग्रहीत करण्याचे निर्देश देण्यात आले. या क्षेत्रातील वे.को.लि.च्या सर्व प्रकल्पाचे अहवाल सीएमपीडीआयएल व वे.को.लि. नागपूर मुख्यालय यांच्या मान्यतेनूसार तयार करण्यात येतो. सेक्शन ४ च्या वेळेस क्षेत्रात कोळसा साठ्यांच्या शोध व तपासणीचे काम केले जाते. त्यामध्ये जमीन अधिग्रहणाबाबत अंतिम निर्णय घेण्यात येत नाही. |

२७) **श्रीमती कल्पना रमेश टोंगे, सरपंच, ग्रामपंचायत येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
| --- | --- | --- |
| १) | वे.को.लि.ने राजपत्रामध्ये व सेक्शन ४ च्या वेळी वेगवेगळे सर्वे नंबर प्रकाशित केले व ३० हेक्टर जागा दशविण्यात आली होती. त्यामुळे शेतकरी अडचणीत आले. वे.को.लि.ची कार्यपद्धत चुकीची असल्याचे त्यांच्या अधिकाऱ्यांनी मान्य केले. आमच्या शेतकऱ्यांचे प्रश्न कसे सोडविता येईल याबाबत वे.को.लि.ने ठरवावे. तसेच लवकरात लवकर समस्येचे निराकरण करण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सेक्शन ७ जाहीर झाल्याशिवाय सर्वे नंबर जाहीर करता येत नाही. सेक्शन ४ मध्ये फक्त कोळशाच्या साठ्यांचा शोध व तपासणीचे काम केले जाते. जेव्हा सेक्शन ४ जाहीर करताना गावामध्ये माहिती द्यायला गेलो तेव्हा देखील सर्वे क्रमांक जाहीर करण्यात आले नव्हते. सेक्शन ४ जाहीर केल्यानंतर त्यामध्ये सुधारणा करून परत सुधारित अधिसूचना जाहीर करण्यात आली. त्यामध्ये सीमारेषा जाहीर करण्यात आली. |

२८) **प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
| --- | --- |
| १) | भोगवटा-२ च्या जमीनीचे करार झाले नसल्याचा दुसरा प्रश्न होता. त्यामध्ये १४७ लोकांच्या जमीनीचे करार करण्यात आले आहे. भोगवटा-२ मधील १४७ लोकांपैकी १२७ लोकांसोबत करार करण्यात आला आहे. त्यापैकी ११६ लोकांना एकूण रू. २५.२६ कोटी मोबदला देण्यात आला आहे. त्यापैकी जवळपास रू. २० कोटींचे वाटप करण्यात आले असून उर्वरित राहिलेल्या लोकांपैकी १० टक्के रक्कम ही शासनाकडे जमा करावी लागते. या महिन्याच्या अखेरीस संपूर्ण लोकांना मोबदला वाटप करण्यात येईल. वे.को.लि.च्या धोरणानूसार नोकऱ्या देण्यात येतील. त्यामध्ये महिलांना स्थानिक प्रकल्पामध्ये रोजगार देण्यात येईल व पुरूषांना आवश्यकतेनूसार स्थानिक प्रकल्पात किंवा दुसऱ्या प्रकल्पामध्ये रोजगार देण्यात येईल. रेल्वेने कोळसा वाहतूक करण्यात येणार असून त्यामुळे प्रदूषणात घट होणार आहे. |

२९) **<u>श्री. विजय शामराव गारगाटे, उप-सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपण ०.६० दशलक्ष टन प्रतिवर्ष ते ०.८० दशलक्ष टन प्रतिवर्ष विस्तारीकरण प्रकल्पाकरिता परवानगी मागत आहात. त्याकरिता आपण जमीन संपादित केली. वे.को.लि. तर्फे प्रत्यक्ष रोजगार कोणत्या प्रकल्पामध्ये देणार याची माहिती देण्यात यावी. खुल्या खाणीचा प्रस्ताव असून स्थानिकांना भूमिगत खाणीमध्ये रोजगार कशाला देता. धोरणाला बाजूला ठेवून स्थानिकांना या प्रकल्पामध्येच नोकरी देण्यात यावी. दिव्यांगांसाठी जमीन अधिग्रहीत न करता नोकरी देण्याची तरतूद वे.को.लि.कडे आहे काय. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, वे.को.लि.च्या धोरणानूसार स्थानिकांना भूमिगत खाणीमध्ये नोकरी देण्यात येणार आहे. प्रकल्पग्रस्तांना स्थानिक प्रकल्पामध्ये नोकरी देण्याबाबतचा प्रस्ताव मुख्यालयाकडे सादर केला जाईल. |

३०) **<u>श्री. दशरथ पाटील, टाकळी, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे.को.लि.ला प्रत्येक निर्णय घेण्याकरिता मुख्यालयाकडे का जावे लागते. वे.को.लि.चे वरिष्ठ स्तरावरचे अधिकारी जनसुनावणी करिता हजर का राहत नाहीत. वरिष्ठ अधिकारी हजर राहिल्यास स्थानिक पातळीवरच्या समस्यांचे निराकरण करणे सोईचे होईल. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

३१) **<u>श्री. विजय शामराव गारगाटे, उप-सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ज्या अधिकाऱ्यांना निर्णय घेण्याचा अधिकार आहे ते अधिकारी जनसुनावणीकरिता उपस्थित राहणे अपेक्षित आहे. स्थानिक नागरीकांचा परिवार येनक | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ज्या प्रकल्पामध्ये मनुष्यबळाची आवश्यकता आहे त्या प्रकल्पामध्ये नोकरी देण्यात येते. |

| | | |
|---|---|---|
| | येथे वास्तव्यास असल्यास त्यांना उमरेड, नागपूर या ठिकाणी नोकरी का देण्यात येते. ओपनकास्ट खाणीमध्ये जमीन अधिग्रहीत होत असतील तर स्थानिकांना ओपनकास्ट खाणीमध्येच नोकरी देण्यात यावी, अंडरग्राऊंडमध्ये नोकरी देण्यात येऊ नये. एका प्रकल्पाची दोन वेळा जनसुनावणी रद्द करण्यात आली व तीसऱ्या वेळेस जेव्हा स्थानिक प्रकल्पामध्ये नियुक्ती करण्यात आली तेव्हा जनसुनावणीला मंजूरी देण्यात आली. माझी सब एरिया महोदयांना विनंती आहे की, चुकीची माहिती देण्यात येऊ नये. वणी क्षेत्रातील जमीन अधिग्रहीत करण्यात आली असल्याने वणी क्षेत्रामध्येच जसे की, मुंगोली, नायगाव, निलजई, पैनगंगा या कोळसा खाणींमध्ये नोकरी देण्यात यावी. वणी क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रात नोकरी देण्यात येऊ नये. तसेच शैक्षणिक पात्रतेनूसार नोकरी देण्यात यावी. अन्यथा आजची जनसुनावणी रद्द करून पुढे घेण्यात यावी. | रोजगाराची यादी तयार करण्यात आली असून उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आली आहे. |

**३२) <u>श्री. अनिल तेलंग, मुख्य संयोजक, आंबेडकरी जन आंदोलन, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आजची जनसुनावणी रद्द करण्यात यावी याबाबत घोषणा करण्यात यावी. वे.को.लि.चा प्रकल्प अहवाल हा बोगस आहे आणि जनसुनावणी रद्द करण्याबाबत घोषणा करावी. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, वे.को.लि.ने रोजगाराबाबतचे धोरण स्पष्ट करावे.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ज्या प्रकल्पामध्ये मनुष्यबळाची आवश्यकता आहे त्या प्रकल्पामध्ये नोकरी देण्यात येईल. |

३३) <u>श्री. विजय शामराव गारगाटे, उप-सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अप्रत्यक्ष रोजगाराबाबत वे.को.लि.चे काय धोरण आहे याची माहिती देण्यात यावी. ज्या नागरीकांकडे शेती नाही अशा लोकांना ८० टक्के रोजगार देण्यात यावा. त्या प्रकारचा करारनामा वे.को.लि.ने कंत्राटदारासोबत केले पाहिजे. वे.को.लि.च्या कंत्राटदारातर्फे जिल्ह्याच्या व तालुक्याच्या बाहेरील व्यक्तिंना नोकरी देण्यात येते. स्थानिकांना स्पष्टपणे डावलण्यात येते. जर अधिभार ढिगाऱ्याच्या कंत्राटदाराला २०० कामगार हवे असतील तर त्यामध्ये कुशल, अकुशल कामगार घ्यावे लागणार. कुशल कामगारांची कमतरता असल्यास अकुशल कामगारांना प्रशिक्षण देऊन सामावून घेण्यात यावे. शेतमजूरांचा देखील विचार करण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंत्राटदाराला कंत्राट देते वेळी प्रकल्पग्रस्त गावातील कुशल व अकुशल युवकांना रोजगार देण्याची अट टाकण्यात येणार आहे. कुशल कामगारांची आवश्यकता असल्यास कंत्राटदारामार्फत नोकरी देण्यात येईल. स्थानिक कुशल कामगारांना अप्रत्यक्ष रोजगारात प्राधान्य देण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, वे.को.लि.तर्फे स्थानिकांना अप्रत्यक्ष रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. बेरोजगाराची समस्या असल्याने त्या ठिकाणी देखील स्पर्धा असणार आहे. वे.को.लि.च्या निविदेमध्ये या प्रकारची अट टाकण्यात येणार आहे. |

३४) <u>श्री. अनिल तेलंग, मुख्य संयोजक, आंबेडकरी जन आंदोलन, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या ठिकाणी कुशल व अकुशल कामगारांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला परंतु त्याचे समाधानकारक उत्तर वे.को.लि.कडून मिळत नाही. निविदेमध्ये वे.को.लि. तर्फे काही अटी व शर्ती टाकण्यात येतात. ज्या कंपनीला कंत्राट देण्यात येणार आहे त्या कंपनीसोबतच्या करारनाम्यामध्ये भूमिहीन नागरीक व ज्या कुटुंबामध्ये एक पेक्षा जास्त उमेदवार आहेत अशा | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, वे.को.लि.ने रोजगाराबाबतचे धोरण स्पष्ट करावे.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ज्या प्रकल्पामध्ये मनुष्यबळाची आवश्यकता आहे |

| | | |
|---|---|---|
| | बेरोजगारांना नोकरीमध्ये प्रथम प्राधान्य देण्याची एक अट वाढविण्यात यावी. परंतु वे.को.लि. हे मानायला तयार नाही. | त्या प्रकल्पामध्ये नोकरी देण्यात येईल. नवीन निविदामध्ये आपण सुचविलेली अट टाकण्यात आलेली आहे. |

### ३५) प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे:-

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | कोळशाची वाहतूक येत्या २-३ महिन्यात घुग्घूस मार्गे वळविण्यात येणार आहे. कोळशाची साठवणूक मुंगोली सायलोमार्फत करण्यात येईल. |

### ३६) श्रीमती कल्पना रमेश टोंगे, सरपंच, ग्रामपंचायत येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ग्रामपंचायतीला जो कर देण्यात येत होता ता कशा प्रकारे देण्यात येणार आहे याची माहिती देण्यात यावी. कारण कराचा वापर हा औद्योगिक क्षेत्रात न होता संपूर्ण जिल्ह्यात होत आहे. कराच्या निधीचा वापर आमच्या प्रकल्पग्रस्त क्षेत्रात झाला तर प्रकल्पग्रस्त गावांच्या छोट्या-मोठ्या गरजा पूर्ण करणे शक्य होईल. शासनाला कर न देता ग्रामपंचायतींना कर अदा करण्यात आला तर गावाच्या विकासकामांमध्ये वापर करता येईल. आजच्या काळात शिक्षणाचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मागील तीन वर्षांपासून शाळा दुरूस्ती करून देण्याचे आश्वासन वे.को.लि.ने दिले होते परंतु आजपर्यंत त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. माझ्या गावाच्या एका बाजूला एसीसीची खाण आहे व दुसऱ्या बाजूला वे.को.लि.ची खाणी असून त्यामुळे माझ्या गावातील भूगर्भाची पाण्याची पातळी खालावली आहे. एप्रिल व मे महिन्यात मी आपणांस भ्रमणध्वनीद्वारे गावामध्ये पिण्याचे पाणी पूरविण्याबाबत संपर्क केला होता. आपणातर्फे उत्तर मिळाले की टँकर पाठवा आम्ही पाणी भरून पाठवतो. आमच्या ग्रामपंचायतीकडे टँकर उपलब्ध नसताना आम्ही टँकर कसा पाठवायचा. वे.को.लि.ने त्याबाबत बेजबाबदार उत्तर | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पाणी टंचाई समस्या असल्यास वे.को.लि.कडे मागणी केल्यानंतर पाणी पूरविण्यात येईल. एप्रिल-मे महिन्यात पाण्याच्या टंचाईची समस्या उद्भवल्यास वे.को.लि. तर्फे पाणी पूरविण्यात येईल. खाणीमध्ये पाण्याची उपलब्धता आहे. ग्रामपंचायतीने त्यांना ज्या ठिकाणी पाणी हवे त्या ठिकाणाचा प्रस्ताव दिल्यास पाणी पूरविण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, वे.को.लि. तर्फे पाण्याचा कायमस्वरूपी पुरवठा करण्यात येईल.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ग्रामपंचायतीने पाण्याच्या पुरवठ्याबाबत प्रस्ताव तयार करून वे.को.लि.कडे सादर करावा. प्रस्तावानूसार खाणपाण्यावर प्रक्रिया करून शेतीकरिता, पिण्याकरिता व इतर गरजांकरिता पाण्याचा पुरवठा करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | दिले आहे. वे.को.लि.ने गाव दत्तक घेतले असून पाण्याचा पायाभूत सुविधेमध्ये समावेश होतो त्यापासून आपण गावाला वंचित कसे ठेऊ शकता. सन २०२१ मध्ये देखील अशीच परिस्थितीती निर्माण झाली होती. त्यावेळी नगर परिषद वणी, एसीसी लि., यांचेकडून मदत मिळाली परंतु वे.को.लि.कडून सर्वात शेवटी मदत मिळाली. यावरून वे.को.लि.चा निष्काळजीपणा लक्षात येतो. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीने ग्रामसेवकामार्फत प्रस्ताव तयार करून सादर करावा, त्यावर कार्यवाही केली जाईल. तसेच गरज भासल्यास जिल्हा परिषदेमार्फत देखील पाण्याचे टँकर पूरविले जातील. वे.को.लि.ने कायमस्वरूपी पाणी पुरवठा करावा. |

**३७) प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | कोलगांव खाणी मधून होणाऱ्या ब्लास्टींगबाबत सिम्फर (CIMFR) या संस्थेमार्फत शास्त्रीय अभ्यास करण्यात आला आहे. सिम्फर या संस्थेच्या प्रस्तावानूसार केलेल्या ब्लास्टींगमुळे बसणाऱ्या हादऱ्यांचे प्रमाण फार कमी झाले आहे. याबाबत तपासणी वेळोवेळी करण्यात येते. तपासणी अहवालानूसार सद्य:स्थितीत ब्लास्टींगचे हादरे विहीत मर्यादेच्या आत असल्याचे दिसून येते. तरी देखील वे.को.लि.तर्फे सर्वेक्षण करण्यात येईल व त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याबाबत उपाययोजना केले जातील. ब्लास्टींग करताना पाणी फवारणी केली जाते. त्यामुळे हवेमध्ये धुलीकण पसरणार नाहीत. |

**३८) श्री. दशरथ पाटील, टाकळी, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे.को.लि.च्या ब्लास्टींगमुळे ७-८ वर्षांपूर्वी एक भिंत कोसळली महिलेचा मृत्यु झाला होता. वे.को.लि.चे ब्लास्टींगचे हादरे फार भयानक असतात. सदर मृत महिलेचे शवविच्छेदन देखील करू देण्यात आले नाही. वे.को.लि.तर्फे पुरावे नष्ट करण्यासारखे काम देखील करण्यात येतात. याबाबत उपाययोजना करण्यात यावी. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

३९) श्रीमती कल्पना रमेश टोंगे, सरपंच, ग्रामपंचायत येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येनक गावामध्ये २०२१-२२ मध्ये २ आरोग्य शिबीर घेण्यात आले. सन २०२५ मध्यं ०१ आरोग्य शिबीर घेण्यात आले. परंतु सन २०२२, २०२३, २०२४ मध्ये आरोग्य शिबीर घेण्यात आले नाहीत. तसेच आरोग्य शिबीरांमध्ये नागरीकांकरिता फक्त रक्तदाब व मधुमेहावर उपचार करण्यात येतो. इतर आजारांवर आरोग्य शिबीरांमध्ये कोणतेही उपचार करण्यात येत नाही. तसंच नागरीकांची गर्दी वाढल्यास औषधांचा साठा संपल्याचे जाहीर करून आरोग्य शिबीर संपन्न झाल्याचे सांगण्यात येते. | डॉ. सुवर्णा, बालरोग तज्ञ, वे.को.लि.राजीव रतन हॉस्पीटल, घूग्घूस, ता. जि. चंद्रपूर यांनी सांगितले की, चिखली, टाकळी, येनक, कोलगाव व मुंगोली या गावांमध्ये सातत्याने आरोग्य शिबीरांचे आयोजन करण्यात येत आहे. येनक मध्ये सन २०२१ मध्ये ०२, २०२५ मध्ये ०२ आरोग्य शिबीर घेण्यात आले असून सन २०२६ मध्ये आरोग्य शिबीर प्रस्तावित आहे. |

४०) आशा सेविका, ग्रामपंचायत येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे.को.लि.तर्फे आरोग्य शिबीरांमध्ये योग्य तपासणी करण्यात येत नाही. गावातील आशा सेविकांमार्फत नागरीकांच्या आरोग्याबाबत औषधे देण्यात येतात. वे.को.लि.कडे औषधांचा साठा नसल्याचे सांगण्यात येते. वे.को.लि.तर्फे वेळेवर आरोग्य शिबीरांबाबत माहिती देण्यात येते. आरोग्य शिबीरांचे वेळेवर आयोजन करणे ग्रामपंचायतीसाठी शक्य नसते. वे.को.लि.ने किमान एक आठवड्यापुर्वी आरोग्य शिबीरांबाबत ग्रामपंचायतीला माहिती देणे अपेक्षित आहे जेणेकरून आरोग्य शिबीराची तयारी करणे शक्य होईल. तसेच नागरीकांची आरोग्य शिबीराकरिता उपलब्धता देखील फार महत्त्वाची असल्याने त्यांना देखील माहिती देणे शक्य होईल. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, वे.को.लि.तर्फे घेण्यात येणाऱ्या आरोग्य शिबीरांमध्ये प्रदूषणामुळे होणाऱ्या आजारांबाबत तपासणी होणे गरजेचे आहे. जेणेकरून प्राथमिक स्तरावर आजाराचे निदान होणे तसेच पुढील उपचारासाठी मोठ्या दवाखान्यांमध्ये पाठविणे शक्य होईल. |

## ४१) श्रीमती कल्पना रमेश टोंगे, सरपंच, ग्रामपंचायत येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | राजीव रतन हॉस्पीटलमध्ये नेत्र तपासणी तसेच शस्त्रक्रिया व कॅनसर सारख्या आजारांवर उपचार करण्यात यावे. माझे गाव फार लांब असल्याने स्थानिकांना त्रास होत आहे. तसेच वे.को.लि.ने माझ्या गावामध्ये महिन्यातून दोन वेळा जरी रूग्णवाहिका पाठविले तर राजीव रतन हॉस्पीटल येथे स्थानिकांना उपचाराकरिता मदत होईल. परंतु वे.को.लि.चे म्हणणे आहे की, स्थानिकांना गरज असल्यास त्यांनी राजीव रतन हॉस्पीटल येथे उपचाराकरिता यावे असे बेजबाबदार वक्तव्य करत आहेत. आरोग्य शिबीरांबाबतचे नियोजन सरपंचांमार्फत करण्यात येत असल्याने आशा सेविकांना यामध्ये गुंतवणे योग्य नाही. राजीव रतन हॉस्पीटलच्या डॉक्टरांचे वक्तव्य चुकीचे आहे. | डॉ. सुवर्णा, बालरोग तज्ञ, वे.को.लि.राजीव रतन हॉस्पीटल, घूग्घूस, ता. जि. चंद्रपूर यांनी सांगितले की, आरोग्य विषयक समस्यांबाबत सर्वप्रथम सरपंचांना भ्रमणध्वनीद्वारे विचारण्यात येते. परंतु जर आशा सेविकेशी संपर्क साधायचा असल्यास यापुढे आशा सेविकेच्या संपर्कात राहून आरोग्य शिबीरांचे आयोजन करण्यात येईल. राजीव रतन हॉस्पीटल येथे डॉ. काटकर या तज्ञांद्वारे सीएसआर अंतर्गत मोतीबिंदूच्या रूग्णांवर नियमितपणे शस्त्रक्रिया करण्यात येते. तसेच रूग्णांना त्यांच्या गावांमध्ये रूग्णवाहिकेद्वारे पोहोचविण्यात येते. आठवड्यातील एका दिवशी सीएसआर अंतर्गत ओपीडी सेवा देखील राजीव रतन हॉस्पीटल येथे पूरविण्यात येते. त्यामध्ये रक्त तपासणी व एक्स-रे सुविधा मोफत देण्यात येते. नागरीकांना विनंती आहे की ते कोणत्याही वेळी राजीव रतन हॉस्पीटल येथे तपासणीकरिता येऊ शकतात. त्यांना त्या ठिकाणी उपचार उपलब्ध करण्यात येतील. तसेच एखाद्या रूग्णाला मोठ्या दवाखान्यात रेफर करण्यात येत असल्यास रूग्णवाहिकेची सुविधा देखील देण्यात येते.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, डॉक्टरांचे म्हणणे आहे की, स्थानिकांकरिता २४ तास आरोग्य सेवा उपलब्ध आहेत. |
| २) | गावाच्या सभोवतालच्या पसिरातील रस्त्यांवर यापूर्वीच पथदिवे बसवायला पाहिजे होते. तसेच वे.को.लि.ने गावातील दुधाळ जनावरांकरिता त्यांचया जागेवर चाऱ्याची सुविधा करून देण्यात यावी. शिंदोला ते | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, गावाजवळील जोड रस्ता साफ करण्यात येईल आणि रस्त्यांवर पथदिव्यांची व्यवस्था देखील वे.को.लि.मार्फत करण्यात येईल. तसेच वन्यजीव संवर्धनाचा |

| | | |
|---|---|---|
| | कोलगाव या रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करण्यात यावे. परंतु उन्हाळ्यामध्ये त्या रस्त्यावरील झाडे जिवंत आहेत किंवा कसे याबाबत वे.को.लि.मार्फत सर्वेक्षण करण्यात यावे. प्रकल्पग्रस्त नागरीकांसाठी पुनर्वसन योजनेची योग्यरीत्या अंमलबजावणी करण्यात यावी. नोकरी बाबत १५ महिने उशीर झाला असून त्या १५ महिन्यांची नूकसान भरपाईची जबाबदारी कोण घेणार याची माहिती देण्यात यावी. वे.को.लि.तर्फे लवकरात लवकर स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल आम्हाला दाखविण्यात यावा. | आराखडा उप-वनसंरक्षक पांढरकवडा यांचेकडे सादर करण्यात आला आहे. उप-वनसंरक्षक, पांढरकवडा यांचेकडून प्राप्त झालेल्या निर्देशानूसार वन्यजीव संवर्धनाच्या आराखड्यावर काम करण्यात येईल. राष्ट्रीय परीक्षण व अंशशोधन प्रयोगशाळा प्रत्यायन बोर्ड (NABL) मान्यताप्राप्त प्रयोगशाळेद्वारे वर्षातून ४ वेळा भूजल पातळीची तपासणी करण्यात येते. तसेच केंद्रीय भूजल बोर्ड द्वारे भूजल पातळीची तपासणी करण्यात येते. त्यानूसार भूजल पातहीमध्ये फक्त ०.५ मीटर खालावल्याचे दिसून येत आहे. वणी तालुक्याचा भूजलाची सुरक्षित पातळी ७० मीटर पर्यंत आहे. वणी तालुक्यातील भूजलाची पातळी केंद्रीय भूजल बोर्डनूसार ४० मीटर असून सीएमपीडीआयएलनूसार ५० मीटर पर्यंत असल्याचे दिसून येते. तरी मा. सरपंचांच्या मागणीनूसार खाणी संवर्धन योजनेअंतर्गत त्यांना गरज असल्यास पाणी पुरवठा करण्यात येईल. फोसोपिस हे झाडाची लागवड वे.को.लि.तर्फे करण्यात येत नसून त्याची नैसर्गिकरीत्या लागवड होते. वे.को.लि.तर्फे रस्त्याच्या कडेला असणाऱ्या फोसोपिसची झाडे नियमितपणे काढण्यात येतात. यापुढे देखील या झाडांची सफाई करण्यात येईल. तसेच जनावरांचा त्रास होऊ नये याकरिता गावातील सभोवतालचे रस्ते वे.को.लि.तर्फे साफ करण्यात येईल. तसेच रस्त्यांवर पथदिवे लावण्यात येतील. गावातील पाळीव प्राणी जसे की, गाय, म्हशी व इतर प्राण्यांकरिता वे.को.लि.च्या खाणकाम संपुष्टात आलेल्या जागेवर चाऱ्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. सदर रस्त्याच्या कडेला सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वृक्ष लागवड करण्यात आली होती. परंतु त्यास यश आले नसून वे.को.लि.तर्फे शिंदोला ते कोलगाव या रस्त्यावर वृक्ष लागवड करण्यात येईल. वे.को.लि.ने १२७ हेक्टर जागा अधिग्रहीत केलेली |

| | | |
|---|---|---|
| | | असून त्यामध्ये जवळपास १४७ प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्यात येणार आहे. सदर प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत मा. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्तुत करण्यात येते. मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून मंजूरी मिळाल्यानंतर सदर प्रस्ताव वे.को.लि.च्या मुख्यालयाकडे सादर करण्यात येईल. वे.को.लि.च्या बोर्डाची परवानगी मिळताच पुढील कार्यवाही सुरू करण्यात येईल. अंदाजे मे महिन्याच्या शेवटपर्यंत नोकरी वाटप करण्याचे काम सुरू होऊन जाईल. सन २०१६ मध्ये जो अहवाल तयार करण्यात आला होता त्यावेळी गट नं. ४५, ४६, ४७ हे गट नंबर सुटले होते. त्यानंतर सीएमपीडीआयएल कडून अहवाल तयार करण्यात आला असून त्यामध्ये देखील उपरोक्त गट नंबर प्रकल्पाच्या सीमारेषेबाहेर असल्याने सुटले आहेत. या नंतरच्या विस्तारीकरणाच्या प्रकल्पामध्ये त्यांचा समावेश करण्याबाबत प्रयत्न करण्यात येतील. |

**४२) श्री. विजय पिदूरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मुंगोली गावाचे पुनर्वसन करण्यात आले आहे व ते गाव अपघाती क्षेत्रामध्ये आहे. वे.को.लि.ने सन २०१६ मध्ये नविन चिंचोली शिवणी प्रकल्प प्रस्तावित केला. आपणांस पूर्वी देखील सांगण्यात आले आहे की जर एखाद्या व्यक्तिला अर्धांगवायु झाला तर त्याचे वडील ६०-७० वयाचे असून त्यांचे उपचार करणे शक्य होत नाही. याबाबत मा. अध्यक्षांनी विशेष बाब म्हणून आदेश द्यावे की, पुनर्वसन करताना सर्वांगीण पुनर्वसन होणे गरजेचे आहे. सेक्शन ७ जरी लागू झाला असला तरी यामध्ये एक संधी आहे. वे.को.लि.तर्फे त्या दोन शेतकऱ्यांचा स्वतंत्र प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने वे.को.लि.मुख्यालयाकडे सादर करावा. एनआयटी वाहनाद्वारे देण्यात येणाऱ्या रोजगाराची | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रस्ताव एक आठवड्याच्या आत मुख्यालयाकडे सादर करण्यात येईल. यापूर्वी याबाबत असे उत्तर देण्यात आले होते. मात्र, आता असे सांगितले जात आहे की कंत्राटी रोजगारासंबंधीच्या NIT (निविदा सूचना) मध्ये संबंधित अट समाविष्ट करण्यास सांगितले जाईल. कंत्राटी रोजगाराच्या NIT (निविदा सूचना) मध्ये ती अट समाविष्ट करण्यास सांगितले जाईल. चार वर्षांनंतर नवीन निविदा (टेंडर) निघेल, त्यामध्येही ही अट समाविष्ट करण्यात येईल. निविदा कोणाला मिळेल हे आधीपासून निश्चित नसते. |

| | | |
|---|---|---|
| | मर्यादा ५ वर्षांपर्यंत न ठेवता ती मा. जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने ६० वर्षांपर्यंत वाढविण्याबाबतचा प्रस्ताव वे.को.लि.द्वारे त्यांच्या मुख्यालयाकडे सादर करण्यात यावा. ज्या व्यक्तिचा रोजगार जाणार आहे त्या व्यक्तिला कौशल्य विकास योजने अंतर्गत रोजगार देण्याची हमी वे.को.लि. देणार आहे. जर एका व्यक्तिला फक्त ४ वर्षांचा कंत्राट देणार असतील तर त्याच्या कुटुंबाचा उदर्निर्वाह कसा जगणार आहे. पर्यावरण दायित्व अंतर्गत २४४७ कोटींची तरतूद वे.को.लि.द्वारे करण्यात आली आहे परंतु त्याबाबतचे विवरण वे.को.लि.तर्फे देण्यात आलेले नाही. कोळसा वाहतुकीच्या संदर्भात टायर वॉशिंगची सुविधा पूरविणे बंधनकारक आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार मंत्री असताना त्यावेळेस कोणत्या उपाययोजना करायचा या लिखीत आहेत. परंतु त्याची अंमलगजावणी सन २०२६ मध्ये नियमाप्रमाणे वे.को.लिद्वारे करण्यात येत नाही. कोळसा वाहतूक व सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही वेगवेगळी असली पाहिजे. कोलगाव ते मुंगोली पुलापर्यंतच्या रस्त्यावर व मुंगोली पूलापासून ते मुंगोली ऑफिस पर्यंत रस्त्यावर टायर वॉशिंग सिस्टम बसविलेले नाही. कोलगांव ते मुंगोली ऑफिस पर्यंतच्या रस्त्यावर ३ मृत्यू झाले आहे. वनविकास बोर्ड मध्यप्रदेश यांच्यातर्फे वृक्ष लागवड करण्यात येत असल्याबाबत वे.को.लि.ने माहिती दिली. आमची मागणी आहे की ज्या प्रकारे वे.को.लि. बल्लारपूर क्षेत्रामध्ये महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाला निविदा देण्यात आली आहे त्याप्रमाणे वे.को.लि. वणी क्षेत्रामध्ये देखील महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाला निविदा देण्यात यावे जेणेकरून वृक्षारोपण चांगल्या प्रकारे करण्यात येईल. त्यामुळे त्याची देखरेख करणे व निधीचा व्यवस्थित वापर देखील करण्यात येईल. फोसोपिसच्या निर्मुलनासंदर्भात म.प्र.नि. मंडळाने वे.को.लि. वणी क्षेत्र व वे.को.लि. वणी उत्तर क्षेत्र यांना सन २०२२ मध्ये पत्र दिले. त्यानूसार वे.को.लि. वणी उत्तर क्षेत्राने त्याची अंमलबजावणी केली परंतु वे.को.लि. वणी क्षेत्राने अंमलबजावणी केली नाही. तसेच म.प्र.नि. मंडळाने देखील याबाबत | दीर्घकालीन करारांबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, वे.को.लि.तर्फे चार वर्षांच्या कंत्राटाऐवजी कंत्राट वाढविण्यात यावे व निवृत्तीच्या वयापर्यंत कंत्राट देण्यात यावे.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कॉर्पोरेट पर्यावरणीय जबाबदारी (CER) अंतर्गत आमच्याकडे ४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध आहे. या निधीतून आरोग्य, स्वच्छता, शिक्षण इत्यादी क्षेत्रांवर खर्च करता येऊ शकतो. सध्या CSR निधी हा पूर्णपणे WCL च्या नफ्यावर अवलंबून असतो. मात्र CER अंतर्गत या विशिष्ट प्रकल्पासाठी ४ कोटी रुपये खर्च करता येतील. ज्या प्राधान्याच्या कामांसाठी CSR अंतर्गत निधी उपलब्ध होत नाही किंवा ती कामे होत नाहीत, ती कामे आम्ही CER अंतर्गत पूर्ण करू. टायर वॉशिंग सिस्टीमसाठी आमचे दोन प्रमुख कोळसा वाहतूक मार्ग आहेत. एक पैनगंगा–मुंगोली–कोलगाव मार्ग असून दुसरा निलजई–नायगाव मार्ग आहे. या दोन्ही ठिकाणी टायर वॉशिंग सिस्टीमची कामे मंजूर (Award) झाली असून सुमारे ८०% काम पूर्ण झाले आहे. मुंगोली आणि कोलगाव यांच्यासाठी एकच कोळसा वाहतूक मार्ग असल्याने टायर वॉशिंग सिस्टीमचे बांधकाम मुंगोली तपासणी नाका (Check Post) येथे करण्यात येत आहे. वर्धा नदी पुलापासून साखरा गावापर्यंत आणि साखरा गावापासून पैनगंगा पर्यंतचा LMV (हलकी मोटार वाहने) रस्ता आहे. सध्या या रस्त्याची स्थिती चांगली नाही; मात्र त्याच्या डांबरीकरणाचे (Bitumen Road) काम मंजूर (Award) झाले असून ते लवकरच सुरू होणार आहे. तसेच पैनगंगा पुलापासून |

| | | |
|---|---|---|
| | पाठपुरावा केलेला नाही. सदर झाड ४-५ महिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढते व वर्षभरात खूप जास्त वाढते. तसेच या झाडाखाली गवत देखील उगवत नाही. वे.को.लि.ने दाखविलेली मोकळी जागा खरच उपलब्ध आहे काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण फोसोपिस या झाडाचे बियाणे हवा व पाण्याच्या सहाय्याने पसरतात. त्याला लागवडीची गरज नाही. सन १९७१ मध्ये गुजरात राज्यातील कच्छ या ठिकाणी जागतिक बँकेतर्फे फोसोपिस या झाडाची लागवड करण्याचे प्रस्ताव पारित करण्यात आला व त्य ठिकाणी झाडे लावण्यात आली. सन १९७१ चे परिणाम आज आपण महाराष्ट्र राज्यामध्ये भागत आहोत. सदर झाड जेसीबीच्या सहाय्याने निर्मूलन करावे लागते. त्या झाडावर हवा, पाणी व ऊन याचा काहीच परिणाम होत नाही. परंतु या क्षेत्रामध्ये वाघांचे प्रमाण वाढण्यास सुरूवात झाली असून भविष्यात वन्यजीव व मानवाच्या संघर्षाची शक्यता नाकारता येत नाही. वाघाच्या अधिवासामुळे कोलगाव, चिखली टाकळीसह ०६ गावे प्रभावित आहेत. फोसोपिसच्या निर्मूलनामुळे वे.को.लि.ला मोकळी जागा वृक्षारोपण करण्याकरिता मिळणार. तसेच वन्यजीव व मानवाचा संघर्ष कमी होण्यास मदत होईल. वे.को.लि.तर्फे १४४७ कोटी रूपयांची तरतूद असताना त्याचा वापर फोसोपिसच्या निर्मूलनासाठी करण्यात यावा. आपण या ठिकाणी १२७ हेक्टर जमीन अधिग्रहीत करणार असून १४७ नोकऱ्या देण्यात असल्याचे प्रस्तावित आहे. त्यामध्ये सरसकट १४७ नोकऱ्या आहेत किंवा २ एकर जागेच्या मोबदल्यात १ नोकरी या प्रमाणे रोजगार देण्यात येणार आहे याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. १४७ नोकऱ्यांना वे.को.लि.च्या बोर्डाने मान्यता दिली तर देण्यात येतील असे वे.को.लि.चे मत आहे. महिनाभरापासून मोबदल्याची रक्कम देण्यात येत आहे. परंतु नोकऱ्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून मान्यता घेण्यात आली आहे काय. तसेच मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून १५ दिवसात मान्यता मिळाल्यानंतर साधारणत: किती दिवसात नोकऱ्या देण्यात येतील. स्थानिकांना वणी क्षेत्र किंवा वणी उत्तर | कोलगावपर्यंतच्या रस्त्याचे कामही मंजूर झाले आहे. या कामामध्ये दुभाजक (Divider) बांधून स्वतंत्र LMV रस्ता विकसित करण्यात येणार असून पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण होईल. आम्ही विविध प्रकारची वृक्षारोपणाची कामे करतो. सामान्य वृक्षारोपणासाठी आम्ही राज्य शासनाच्या सर्व वनसंस्थांना आमंत्रित करतो. यामध्ये आम्ही FDCM तसेच वन विभागालाही आमंत्रित केले आहे. आमची कंपनी शासकीय असल्यामुळे निविदा प्रक्रियेत सर्वात कमी दर (L१ Rate) देणाऱ्या संस्थेलाच काम दिले जाते. सामान्य वृक्षारोपणाव्यतिरिक्त, मियावाकी पद्धतीच्या वृक्षारोपणाचे काम आम्ही महाराष्ट्राच्या सामाजिक वनीकरण विभागाला (Social Forestry Department) दिले आहे. आमच्या MOU नुसार तीन प्रकारच्या प्रजातींची लागवड करणे आवश्यक असते — औषधी, फळझाडे आणि शोभेची (Ornamental) झाडे. फळझाडांमध्ये येथील स्थानिक (Native) प्रजाती जसे की आवळा, चिंच, जांभूळ आणि बांबू यांची लागवड केली जाते. शोभेच्या झाडांमध्ये गुलमोहर इत्यादी प्रजातींचा समावेश असतो. फळझाडांच्या प्रजातींची लागवड आम्ही एकूण वृक्षारोपणापैकी सुमारे ३०% प्रमाणात करतो. प्रोसोपिसच्या समस्येबाबत, आम्ही दरवर्षी जे वृक्षारोपण करतो त्यापूर्वी प्रोसोपिसची झाडे काढून टाकूनच वृक्षारोपण केले जाते. यावर्षी देखील आम्ही सुमारे ५० ते ६० हेक्टर क्षेत्रातील प्रोसोपिस हटविणार आहोत. या अंतर्गत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येत असून, प्रोसोपिस पूर्णपणे हटवून त्या ठिकाणी नवीन वृक्षारोपण करण्यात येत आहे. सदर १२७ हेक्टर जमीन संपादित केली जात आहे. त्याबाबत, कोल इंडिया यांच्या प्रचलित नियमांनुसार रोजगार प्रदान करण्यात येईल. ज्यांची जमीन २ एकरपेक्षा कमी आहे, त्यांच्या |

| | | |
|---|---|---|
| | क्षेत्रामध्ये नोकऱ्या देण्याबाबत वे.को.लि.च्या बोर्डाकडे आग्रह करणार आहे काय? या जमीनी २५ वर्षांपर्यंत पडीक राहणार आहेत अशा जागांकरिता अप्रत्यक्ष रोजगार जसे की महिला बचत गट, वे.को.लि.तर्फे CER मध्ये मोठ्या प्रमाणात निधी असून त्याचा वापर करून या क्षेत्रामध्ये फळ झाडे लावण्यात आली तर संपूर्ण भारतामध्ये या प्रकारच्या मॉडेल वृक्षारोपण ठरू शकते. त्यामुळे परिसरातील नागरीकांसाठी एक प्रकारचा रोजगार उपलब्ध होऊ शकतो व नागरीकांच्या उदर्निर्वाहाची समस्या सुटू शकते. आम्हाला तुम्ही झाडे देता, ते अआम्ही लावू. परंतु वे.को.लि.ने २०० हेक्टरमध्ये झाडे लावण्याचे प्रस्तावित केले आहेत. त्यामध्ये अधिभार ढिगाऱ्यांवर किंवा खुल्या जागेमध्ये वृक्ष लागवड करण्यात येईल याबाबत स्पष्टता नाही. परंतु वे.को.लि.ने त्याबाबतचे नियोजन करून झाडे लावली तर त्यामुळे स्थानिकांना फायदा होईल. आपल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये देखील नमूद आहे परंतु त्याची अंमलबजावणी प्रत्यक्षात होत नाही. एक दिवसापूर्वी यवतमाळ येथे कृषी प्रदर्षण पार पडले. त्यामध्ये असे निदर्शनास आले की जंगलामध्ये मोठ्या प्रमाणात चिंच आणि हळद उपलब्ध नाहीत. स्थानिक महिला बचत गट चिंच आणि हळद वेचून बाजारात विकतात. त्या प्रकारच्या झाडांच्या लागवडीकरिता २५० हेक्टर जागेपैकी १०-१५ हेक्टर जागा आरक्षित केली तर त्याचा फायदा होईल. वे.को.लि.च्या मानव संसाधन विभागाने शासकीय विभागाच्या व ग्रामपंचायतींच्या संपर्कात राहून त्यांच्या रोजगाराच्या व आरोग्याच्या गरजा काय आहेत त्याची माहिती घेऊन प्रकल्प अहवाल तयार करायला पाहिजे. वे.को.लि.ने मानव संसाधन विभागामध्ये तज्ञ व्यक्तिंची नियुक्ती करून सर्वेक्षण करून योजना तयार करावी जेणेकरून स्थानिकांचा फायदा होऊ शकणार. | प्रकरणांबाबत वेकोली (WCL) मंडळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल. यासंदर्भातील प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी साहेबांकडे पाठविण्यात येत आहे. साधारणतः पुढील दोन महिन्यांच्या कालावधीत प्रत्यक्ष रोजगार देण्याची प्रक्रिया सुरू होईल. आजूबाजूच्या परिसरातील पात्र व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. लगतच्या (Adjacent) क्षेत्रातील व्यक्तींना रोजगार देण्याबाबतचा प्रस्ताव WCL मुख्यालयाकडे (HQ) पाठविण्यात येईल. कोळसा वाहतूक रस्त्यावर धुळीची समस्या असल्याबाबत जे मुद्दे मांडले गेले आहेत, त्यासाठी सध्या टँकरद्वारे पाणी फवारणी तसेच फॉग कॅनन बसविण्यात आले आहेत. याशिवाय कोलगाव विस्तार प्रकल्पामध्ये आणखी २ नवीन फॉग कॅनन व २ वॉटर स्प्रिंकलर बसविण्यात येणार आहेत. तसेच पर्यावरण संरक्षणासाठी एकूण ₹१२ कोटी खर्च करण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त, वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (WCL) कडून कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येत आहेत. मुंगोली येथे सायलो लोडिंग प्रणाली उभारण्यात येत असून, त्याद्वारे कोळसा थेट पाईपच्या माध्यमातून रेल्वे वॅगनमध्ये भरला जातो. ही प्रणाली स्वयंचलित पाणी फवारणी व्यवस्थेसह कार्यरत राहणार आहे. ही प्रणाली सुरू झाल्यानंतर सुमारे ९०% रस्ते मार्गावरील कोळसा वाहतूक बंद होईल. तसेच, कोलगाव प्रकल्पातील कोळसा बेल्ट कन्व्हेयरच्या माध्यमातून थेट मुंगोली सायलोपर्यंत आणला जाईल. भविष्यात गडेगाव खाणीतील कोळसादेखील मुंगोली सायलोमध्ये आणला जाणार आहे. त्यामुळे साखरा गावातील नागरिकांना होत असलेल्या त्रासात मोठ्या प्रमाणात घट होईल. सायलो लोडिंग प्रणालीमध्ये फ्युजिटिव्ह (अनियंत्रित) धूळ उत्सर्जन होत नाही. |

| | | |
|---|---|---|
| | | याशिवाय, पर्यावरण मंत्रालयाच्या निर्देशानुसार सायलो व साखरा गाव यांच्या दरम्यान ७०० मीटर लांबीचा विंड बॅरियर (वाऱ्यामुळे धूळ पसरणे रोखण्यासाठी संरक्षक भिंत) उभारण्यात येणार आहे. आपल्याला ज्या प्रकारची झाडे/रोपे आवश्यक आहेत, त्याबाबत गावकऱ्यांकडून मागणी घेऊन आम्ही ती लागवड करून देऊ. तसेच, सीईआर (CER) निधीअंतर्गत कौशल्य विकास (Skill Development) कार्यक्रमदेखील राबविता येतील. गावकऱ्यांच्या ज्या ज्या गरजा व मागण्या असतील, त्या त्यांच्याकडून घेऊन सीईआर निधीमधून आवश्यक ती कामे व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. आपण जागा उपलब्ध करून द्या. आपण ज्या प्रकारची झाडे लावण्यास सांगाल, तीच झाडे आम्ही लावू. आम्हाला शासनाच्या मार्गदर्शक सूचना (Guidelines) आहेत की, आपण जो प्रस्ताव द्याल त्यानुसार आम्ही वृक्षारोपण करू. त्यामुळे गावकऱ्यांनी त्यांच्या आवश्यकतेनुसार प्रस्ताव द्यावा, आणि त्या प्रस्तावानुसार आम्ही आवश्यक ती झाडे लावण्याची कार्यवाही करू. आपण दिलेल्या सुचनांचे पालन करण्यात येईल. |

४३) **<u>श्री. विजय शामराव गारगाटे, उप-सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपण विस्तारीकरण प्रकल्पामध्ये १०० मीटर पासून २०० मीटर पर्यंत खोलीकरण करण्याची परवानगी मागत आहात. आपण सादरीकरणात सांगितले आहे की यामुळे भूजल पातळी खालावणार आहे. वे.को.लि.तर्फे जी सिंचीत शेती अधिग्रहीत करण्यात आलेली नाही अशा शेतीमध्ये नैसर्गिक स्त्रोत जसे की, टयुब वेल व बोरवेलची पातळी देखील खालावणार आहे. त्याबाबतची नूकसान भरपाई वे.को.लि.तर्फे | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, भूजल पातळी कमी झाल्यामुळे नुकसानभरपाई देण्याबाबत सध्या कोणतेही धोरण (Policy) अस्तित्वात नाही. तसेच, आमच्याकडे उपलब्ध असलेल्या Central Ground Water Board (CGWB) च्या आकडेवारीनुसार भूजल पातळीत कोणतीही घट झालेली आढळून आलेली नाही. तथापि, भूजल |

| | | |
|---|---|---|
| | एकमुस्त देण्यात येणार किंवा वार्षिक देण्यात येणार याची माहिती दिलेली नाही. भविष्यात बोरवेल व ट्युबवेल आटल्याच्या तक्रारी आपल्यापर्यंत आल्या तर त्याची नूकसान भरपाई वे.को.लि. ला द्यावी लागणार याची नोंद घ्यावी. | पुनर्भरणासाठी अमृत सरोवर योजना अंतर्गत गावांमधील तलावांचे खोलीकरण करण्यात येत आहे. तसेच, खाणीतील पाण्याचा उपयोग करून चेक डॅम उभारण्यात येतील व त्याद्वारे भूजल पुनर्भरण करण्यात येईल. भूजल पातळी घटल्यामुळे नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाकडून भविष्यात कोणतेही आदेश प्राप्त झाल्यास, त्या आदेशानुसार आम्ही नुकसानभरपाई देण्याची कार्यवाही करू. |

४४) **श्री. निखील शांताराम उपासे, सदस्य, ग्रामपंचायत साखरा (को.) ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे.को.लि.ने सांगितले की, कोलगांव खाणीतून मुंगोली येथे कन्व्हेअर बेल्टद्वारे कोळशाची वाहतूक करण्यात येणार आहे. परंतु ते इकते सोपे नाही याबाबत येथे उपस्थित सर्व नागरीकांना तसेच अधिकऱ्यांना माहिती आहे. तोपर्यंत काय उपाययोजना केले जातील याची माहिती देण्यात यावी. वर्धा नदीचा पूल सुरू असो किंवा नसो परंतु कोळशाची वाहतूक साखरा या गावातून सुरू राहणारच आहे. मुंगोली कोळस खाण क्षेत्रामध्ये व पैनगंगा कोळसा खाण क्षेत्रामध्ये स्वतंत्र पार्किंग तयार करण्यात यावी जेणेकरून अपघात टाळता येईल. साखरा जंक्शन या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने त्या ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमण्यात यावे. त्यामुळे रस्त्यावर पाणी फवारणी केल्यानंतर रस्ता वाळला की सदर सुरक्षा रक्षक पाणी फवारणी करण्यासाठी वे.को.लि.ला कळवू शकणार. तसेच वाहने थांबणार नाहीत व वाहनांची गती मर्यादेमध्ये राहणार. साखरा ग्रामपंचायतीमध्ये सीएसआर अंतर्गत काम करण्यात आले नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, वर्धा नदीवरील पुलाचे काम प्रगतीपथावर असून ते जून महिन्याच्या अखेरीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. याबाबतचे उत्तर आम्ही पूर्वीच दिलेले आहे. तसेच, अतिरिक्त प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांबाबतही माहिती देण्यात आली होती. त्यानुसार आणखी २ फॉग कॅनन बसविण्यात येणार आहेत. तसेच, एक रोड स्वीपिंग मशीन खरेदीसाठी कार्यादेश (Award) देण्यात आला असून त्यावरील काम सुरू झाले आहे. दरम्यान, करार पद्धतीवरील (Contractual) रोड स्वीपिंग मशीनची व्यवस्था करण्यात आली असून ती कार्यान्वित करण्यात आलेली आहे. यासाठी आणखी दोन पाण्याचे टँकर उपलब्ध करून देण्यात येतील, त्यामुळे याबाबत वारंवार संपर्क साधण्याची आवश्यकता भासणार नाही. पैनगंगा परिसरातील वाहनतळाची (Parking) व्यवस्था पैनगंगा येथेच करण्यात येईल, तसेच मुंगोली परिसरासाठी स्वतंत्र वाहनतळाची व्यवस्था मुंगोली येथे करण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | येईल. सर्व आवश्यक खबरदारीच्या उपाययोजना काटेकोरपणे राबविण्यात येतील. यासाठी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात येईल तसेच वाहनांचा वेग निर्धारित मर्यादेत राहील याची दक्षता घेतली जाईल. कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (CSR) अंतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या विविध विकासकामांचे प्रस्ताव आम्ही संबंधित प्राधिकरणाकडे पाठविले आहेत. |

४५) **श्री. विजय शामराव गारगाटे, उप-सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, येनक, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपण जी शेती अधिग्रहीत करणार आहेत त्या परिसरात येनारी फाटा-येनक-चिखली-टाकळी हा रस्ता मुख्यमंत्री सडक योजनेअंतर्गत रू. ३.७५ कोटींचा रस्ता तयार करण्यात आला आहे. सदर रस्ता आपल्या क्षेत्रात येणार असून त्या बदल्यात स्थानिकांकरिता पर्यायी रस्ता अनवून देण्यात यावे. वे.को.लि. तर्फे सार्वजनिक रस्त्याचा वापर करण्यात येतो परंतु पर्यायी रस्ता पूरविण्यात येत नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर रस्त्याचे डायव्हर्शन (वळण मार्ग) करण्यात येणार आहे. यासाठी प्रथम सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. त्यानंतर त्यांच्या मानके व विनिर्देशांनुसार (Specifications) रस्त्याचे बांधकाम करण्यात येईल. |

४६) **प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | कोळसा उत्खननात ब्लास्टिंग टाळण्यासाठी सरफेस मायनरचा वापर का करण्यात आलेला नाही, असा एक प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. याबाबत असे स्पष्ट करण्यात आले की, सरफेस मायनरचा वापर भूगर्भीय परिस्थितीनुसार केला जातो. उदाहरणार्थ, मुंगोली व निलजई खाणींमध्ये सरफेस मायनरचा वापर करण्यात आला आहे. मात्र, कोलगाव खाणीत उताराचे प्रमाण (Gradient) १:२.५ असल्यामुळे तेथे सरफेस मायनरचा वापर तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य (Feasible) नाही. तसेच, येथील कोळसा बिटुमिनस (Bituminous) प्रकारचा आहे. जड धातूंबाबत (Heavy Metals) देखील प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. याबाबत असे सांगण्यात आले की, जड धातूंचे विश्लेषण दर सहा महिन्यांनी नियमितपणे करण्यात येते. उपलब्ध अहवालांमध्ये जड धातूंशी संबंधित कोणतीही गंभीर समस्या आढळून आलेली नाही. या परिसरातील प्रमुख पर्यावरणीय समस्या ही कणीय प्रदूषणाची |

| | |
|---|---|
| | (Particulate Matter) आहे. हवेतील जड धातूंची पातळी ही शोध मर्यादेपेक्षा (Below Detection Limit) कमी आढळून आली आहे. तसेच, सल्फर डायऑक्साइड ($SO_2$) व नायट्रोजन ऑक्साइड्स (NOx) यांच्या उत्सर्जनाबाबतही प्रश्न विचारण्यात आला होता. याबाबत असे स्पष्ट करण्यात आले की, खाण उद्योगामध्ये या वायूंचे उत्सर्जन हे प्रमुख प्रदूषणाचे कारण नसून, येथे मुख्यतः धूळ प्रदूषणाची समस्या आढळते. ऑक्टोबर २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीतच बेसलाइन अभ्यास का करण्यात आला, असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला होता. यावर उत्तर देताना सांगण्यात आले की, पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बेसलाइन अभ्यास प्री-मॉन्सून किंवा पोस्ट-मॉन्सून कालावधीत करता येतो. त्यानुसार हा अभ्यास पोस्ट-मॉन्सून कालावधीत म्हणजे ऑक्टोबर २०२३ ते डिसेंबर २०२३ दरम्यान करण्यात आला. बेसलाइन अभ्यासासाठी ९ कि.मी. अंतरावरील गावाची निवड का करण्यात आली, याबाबतही प्रश्न विचारण्यात आला. यावर असे स्पष्ट करण्यात आले की, संपूर्ण १० कि.मी.च्या बफर झोनचे प्रतिनिधित्व होणे आवश्यक असते. उदाहरणार्थ, कोलगाव व टाकळी ही गावे जवळ असल्यामुळे दोन्ही ठिकाणी स्वतंत्र निरीक्षण केंद्र उभारण्याची आवश्यकता नसते. त्यामुळे संपूर्ण बफर क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणारी विविध गावे निवडण्यात आली आहेत. ही निवड विंड रोज (Wind Rose) आकृतीनुसार अपविंड (Upwind), डाउनविंड (Downwind) व क्रॉसविंड (Crosswind) दिशांमधील गावांचा विचार करून करण्यात आली आहे. पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (EMP) अहवालामध्ये उच्च पूररेषेचा (High Flood Line - HFL) उल्लेख नाही, अशी हरकत घेण्यात आली होती. मात्र, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा अहवालाच्या पृष्ठ क्रमांक ४५२ वर वर्धा नदी व पैनगंगा नदी या दोन्हींच्या HFL ची माहिती स्पष्टपणे नमूद करण्यात आलेली आहे. पर्यावरण सल्लागाराबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. यावर असे सांगण्यात आले की, कोणत्याही पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (EIA) सल्लागार संस्थेला Quality Council of India कडून मान्यता (Accreditation) प्राप्त करणे आवश्यक असते. Central Mine Planning and Design Institute ही संस्था QCI मान्यताप्राप्त असल्यामुळेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल अभ्यासाचे काम त्यांना देण्यात आले आहे. |

### ४७) **<u>ॲड श्री. रूपेश गुणवंत ठाकरे, प्रशासक, ग्राम पंचायत मुंगोली, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी २१ मुद्दे उपस्थित केले आणि मा. अध्यक्षांच्या म्हणण्यानूसार जनसुनावणीच्या शेवटपर्यंत मी उपस्थित केलेल्या मुद्यांची माहिती देण्यात येईल. तसेच मी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतची माहिती मिळेपर्यंत जनसुनावणी सुरू ठेवण्यात येईल. जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या प्रश्नांची वेळीच उत्तरे देण्यात येतात. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कोलगाव प्रकल्पाच्या विस्तारामध्ये कोळसा उत्पादन क्षमता ०.६ दशलक्ष टनांवरून ०.८ दशलक्ष टनांपर्यंत वाढविण्यात येत आहे. तसेच, प्रकल्पाचे क्षेत्रफळ ३९२.६७ हेक्टरवरून ५२०.६० हेक्टरपर्यंत वाढविण्यात येत आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी जनसुनावणी |

| | | |
|---|---|---|
| | | आयोजित करण्यात आली आहे. शिवणी येथील श्री. केशव कुंडू पिंपळशेंडे, सौ. कांता बाई किसान पिंपळशेंडे आणि श्री. दशरथ धर्मा भोस्कार यांची एकूण २.६७ हेक्टर जमीन संपादनातून वगळली गेली असल्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. यासंदर्भात पूर्वीच उत्तर देण्यात आले असून, या जमिनीच्या संपादनाबाबतचा प्रस्ताव लवकरच सादर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. गट क्रमांक १०४, ३२, २६३ आणि २६६ यांच्या बदल्यात रोजगार (नोकरी) देण्याबाबतचा मुद्दादेखील उपस्थित करण्यात आला होता. यासंदर्भातील स्पष्टीकरण पूर्वीच देण्यात आलेले आहे. वाघांच्या संरक्षणासाठी प्रोसोपिस या आक्रमक वनस्पतीचे निर्मूलन करण्यात येणार असून, आवश्यक त्या ठिकाणी प्रकाश व्यवस्था (लाईट्स) देखील करण्यात येणार आहे. याबाबतचे उत्तरही पूर्वीच देण्यात आलेले आहे. |

**४८) <u>श्री. दशरथ पाटील, टाकळी, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ज्या ठिकाणी वाघाचा जन्म होतो त्याठिकाणी त्याचा अधिवास असतो आणि वन विभागाचा नियम आहे की, वाघाचा ज्या ठिकाणी जन्म होतो त्या ठिकाणीच वाघाला ठेवले पाहिजे. वन्य प्राण्यांच्या अधिवासामुळे मानव व वन्यजीव संघर्ष वाढलेला असून त्यास प्रशासन जबाबदार आहे. त्याबाबत कोणत्या उपाययोजना करण्यात येतील याची माहिती देण्यात यावी. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे स्थानिकांचा मृत्यू झाला असून त्याचा मोबदला मिळालेला नाही. या संदर्भातील बरेच प्रकरण आहेत ज्यांना आजपर्यंत नूकसान भरपाई मिळालेली नाही. | मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, प्राण्यांचा ज्या ठिकाणी जन्म होतो त्याठिकाणाव्यतिरिक्त प्राणी कुठेही राहू शकतात. वन्य प्राण्यांमुळे स्थानिकांचे नूकसान होणार नाही याकरिता प्रोसोपिस या झाडाचे निर्मूलन करण्यात येणार आहे. |

४९) <u>ॲड श्री. रूपेश गुणवंत ठाकरे, प्रशासक, ग्राम पंचायत मुंगोली, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वे.को.लि.ने ज्या गावातील जमीन अधिग्रहीत केलेली आहे आणि वे.को.लि.च्या जमीनीवर शेती करत आहेत अशा जमीनींचे वे.को.लि.ने सर्वेक्षण करावे. तसेच गावालगतच्या प्रोसोपिस या झाडांचे संपूर्ण निर्मूलन करून त्या ठिकाणी वृक्ष लागवड कशी करता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे. याबाबत वे.को.लि.ने योग्य नियोजन केले तर वाघाचा अधिवास संपणार आणि त्याचा भविष्यात गावांना मोठ्या प्रमाणात फायदा होईल. माझी मागणी आहे की, जनसुनावणीच्या माध्यमातून यवतमाळ जिल्ह्याच्या पर्यावरणीय परिस्थितीमध्ये बदल झाला पाहिजे केवळ औपचारिकता म्हणून जनसुनावणी घेण्यात येऊ नये. मा. अध्यक्ष यांनी जबाबदारीने उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबाबत आदेश द्यावे, ही विनंती. | मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, वे.को.लि.ने आपल्या सुचनांचे पालन करणार असल्याचे यापूर्वीच मान्य केले आहे.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, रुपेशजी यांनी निलजईजवळील वर्धा नदी पुलावरील धूळ प्रदूषणाबाबत प्रश्न उपस्थित केला होता. याबाबत असे सांगण्यात आले की, पुलावरील धूळ नियमितपणे साफ करण्यात येईल व त्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात येतील. कोलगाव प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या बदल्यात रोजगार देण्याबाबतचा मुद्दा पूर्वीच स्पष्ट करण्यात आला आहे. रोजगार कोणाला व कोणत्या पद्धतीने देण्यात येईल, याबाबतही यापूर्वी चर्चा झालेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे रोजगारासंदर्भातील प्रस्ताव कधी पाठविण्यात येणार, असा प्रश्न विचारण्यात आला होता. यावर उत्तर देताना सांगण्यात आले की, याबाबतचे स्पष्टीकरण पूर्वीच देण्यात आले असून चालू महिन्याच्या अखेरीपर्यंत संबंधित प्रस्ताव पाठविण्यात येईल. कोळसा वाहतुकीमुळे रस्त्यावर निर्माण होणाऱ्या धूळ प्रदूषणाच्या नियंत्रणासाठी फॉग कॅनन मशीन बसविण्यात आले आहे. तसेच रोड स्वीपिंग मशीनची व्यवस्था करण्यात आली असून, एफएमसी (FMC) प्रकल्पही प्रस्तावित आहे. कोलगाव प्रकल्पामध्ये कोलगाव, टाकळी, चिकली आणि येणक या |

| | | |
|---|---|---|
| | | गावांतील जमिनींचा समावेश आहे. यापैकी सर्वाधिक जमीन येणक गावाची संपादित करण्यात आलेली आहे. सीएसआर (CSR), पर्यावरण संरक्षण आणि धूळ नियंत्रण उपाययोजनांबाबतची माहिती यापूर्वीच देण्यात आलेली आहे. प्रकल्पग्रस्त गावांसाठी रुग्णवाहिका (Ambulance) उपलब्ध करून देण्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. यावर असे स्पष्ट करण्यात आले की, कायमस्वरूपी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आलेली नसली तरी गावातून मागणी प्राप्त झाल्यास तत्काळ रुग्णवाहिका पाठविण्यात येते. यासाठी संबंधित संपर्क क्रमांक सरपंच महोदयांना उपलब्ध करून देण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार संपर्क साधून रुग्णवाहिका मागविता येते. तसेच, प्रकल्पग्रस्त गावांमध्ये नियमितपणे आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येतात आणि त्यामध्ये मोफत औषधे तसेच उपचार सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. पुढील प्रश्नाचे उत्तर यापूर्वीच देण्यात आलेले आहे. |

५०) <u>श्री. अरविंद जनार्दन उमरे, मुंगोली, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मुंगोली गावामध्ये बोरवेलची सुविधा कधी पर्यंत मिळणार. आजपर्यंत बोरवेल सुरू झालेली नसून गावामध्ये पाणी उपलब्ध नाही. स्थानिकांना स्वत:च्या बोरवेल खोदावे लागत आहेत. मे महिन्यामध्ये पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात होणार आहे. मुंगोली गावामध्ये पूर्वी २०००-३००० लिटर क्षमतेच्या टाक्या उभारण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे आता देखील टाक्या उभारण्यात येणार आहेत काय. गावामध्ये केलेल्या नाल्यांचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून वे.को.लि.ने सदर कंत्राटदाराला नोटीस देऊन | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, मुंगोली पुनर्वसन गावामध्ये सध्या एक बोअरवेल कार्यरत आहे. याशिवाय आणखी चार बोअरवेल उभारण्याचा प्रस्ताव आहे. ओव्हरहेड पाण्याच्या टाकीचे बांधकाम सुरू असून ते प्रगतीपथावर आहे. तसेच, तात्पुरत्या पाणीपुरवठ्यासाठी आवश्यकतेनुसार सिंटेक्स (Syntex) पाण्याच्या टाक्याही उपलब्ध करून देण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | कॉंक्रिटच्या नाल्या तयार करून द्याव्या. अन्यथा कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्यात यावे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नाल्यांची तपासणी करण्यात यावी. वे.को.लि.ने आराखडा तयार केला होता. वे.को.लि.ने प्रथम रस्त्याचे बांधकाम करायला पाहिजे होते व नंतर नालीचे बांधकाम करायला पाहिजे होते. इतर क्षेत्रांमध्ये पाण्याची सुविधा पहिले पूरविण्यात आली व त्यानंतर इतर सुविधा पूरविण्यात आल्या. तसेच जिल्हा परिषद शाळेची सुविधा व ग्रामपंचायतीला शेड बांधून देण्यात आले. परंतु या क्षेत्रात या सुविधा का करण्यात आल्या नाहीत. या महिन्यात पाण्याची सुविधा पूरविण्यात यावी. | मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, वे.को.लि.ने तात्काळ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रथम नालीचे बांधकाम करण्यात आले होते आणि त्यानंतर रस्त्याचे बांधकाम करण्यात आले. सध्या काही ठिकाणी कंत्राटदारांच्या कामामुळे तसेच काही ठिकाणी ग्रामस्थांच्या वापरामुळे नालीचे नुकसान झाले असून ती तुटलेली आहे. या संदर्भात आवश्यक दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येईल. तसेच, पाणीपुरवठ्याची आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी योग्य ती व्यवस्था करण्यात येईल. |

### ५१) <u>प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे:-</u>

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | कुर्ली पुनर्वसन गावामध्ये सध्या एक बोअरवेल कार्यरत आहे. याशिवाय आणखी चार बोअरवेल उभारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. ओव्हरहेड पाण्याच्या टाकीचे बांधकाम सुरू असून ते प्रगतीपथावर आहे. तसेच, पाणीपुरवठ्याची तात्पुरती व्यवस्था करण्यासाठी सिंटेक्स पाण्याच्या टाक्याही उपलब्ध करून देण्यात येतील. |

### ५२) <u>श्री. विश्वास भोरपे, शिवणी, ता. वणी, जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जुलै २०२५मध्ये सेक्शन लागू झाला. त्यानंतर मुंगोलीचे सबएरिया मॅनेजर व प्लानिंग ऑफिसर यांची मा. जिल्हाधिकारी यांच्यासोबत बैठक झाली होती. त्यामध्ये सांगितले होते की, १४/०७/२०२५ ला सेक्शन ४ लागू झाल्यानंतर डिसेंबर-२०२५ पूर्वी सेक्शन ७ लागू व्हायला पाहिजे होता. चिंचोली आणि शिवणी गावातील उर्वरित जमीनीला सेक्शन ७ होणार | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, निर्गुडा नाल्याच्या वळण (Diversion) संदर्भातील प्रस्ताव सीडीओ, नाशिक यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे. त्यांच्या स्तरावरून आराखडा (Design) मंजूर झाल्यानंतर संबंधित कामास सुरुवात करण्यात येईल. मुंगोली प्रकल्पासाठी कलम ४ अंतर्गत |

| | | |
|---|---|---|
| | होता. आजपर्यंत सेक्शन ७ लागू झाले नाही. नाला १ किमी अंतरावर होता परंतु आता नाला वळविल्यामुळे आता गावालगत १०० मीटर अंतरावर आला आहे. सदर नाल्यामध्ये पैनगंगा व वर्धा नदीचे बॅकवॉटर येत असल्याने शेतीचे, जनावरांचे व मनुष्याचे मोठ्या प्रमाणात नूकसान होणार आहे. अधिभार ढिगाऱ्याचे एम्बँकमेंट गावाच्या सभोवताली आहे. मुंगोली ते शिवणी हा जिल्हा परिषदेचा रस्ता एम्बँकमेंटच्या मध्यभागातून होता. सदर रस्ता वे.को.लि.ने जमीन अधिग्रहीत करण्यात आल्यामुळे तोडण्यात आला आहे. सन २०२५ मध्ये वे.को.लि.ने लेखी आश्वासन दिलो होते की सदर रस्त्याचे डांबरीकरण केल्याशिवाय रस्ता तोडण्यात येणार नाही. वे.को.लि.ने रस्ता बंद केला व स्थानिकांना दळण वळण करताना त्रास होत आहे. वे.को.लि.तर्फे नाला काढण्यात येणार आहे व त्या नाल्यामुळे जनावरांवे व नागरीकांचे नूकसान होणार आहे. याबाबत उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती व लेखी आश्वासन देण्याचे सांगण्यात आले होते. स्थानिकांचे नूकसान झाल्यास त्याची जबाबदारी वे.को.लिची राहणार असे वे.को.लि.ने लेखी आश्वासन द्यावे. | अधिसूचना (Section ४ Notification) दि. १५ जुलै २०२५ रोजी प्रकाशित करण्यात आली होती. त्यानंतर कलम ७ अंतर्गत प्रस्ताव मंत्रालयाकडे सादर करण्यात आला होता. मात्र, दरम्यान मंत्रालयाकडून तो प्रस्ताव परत पाठविण्यात आला. कारण, नव्याने विकसित करण्यात आलेल्या CLAMP Portal वरूनच प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार, दि. १०/०३/२०२६ रोजी कलम ७ अंतर्गत प्रस्ताव CLAMP Portal वर अपलोड करण्यात आलेला आहे.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, वे.को.लि.ने सदर समस्येचे निराकरण लवकरात लवकर करावे. भविष्यामध्ये बॅकवॉटरची समस्या उद्भवल्यास त्या दृष्टिकोणातून वे.को.लि.ने तपासणी करावी.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, मुंगोली येथील बांधाऱ्यावरून (Embankment) वाहतुकीसाठी रस्ता सुरू करण्यात आलेला आहे. बांधाऱ्यावर WBM (Water Bound Macadam) रस्त्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून ते वापरासाठी खुले करण्यात आले आहे. तसेच, या मार्गावर प्रकाश व्यवस्थाही उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम मंजूर (Award) करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. नाला व कल्व्हर्ट यांच्या बांधकामामुळे कोणतेही नुकसान होणार नाही. तथापि, भविष्यात कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास, मा. उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशानुसार |

| | | |
|---|---|---|
| | | पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, वे.को.लि.ला याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत निर्देशित केले आहे. |

**५३) श्री. दशरथ पाटील, टाकळी, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कोलगाव खाणीच्या तलावातून पाणी वाहत असल्याने माझ्या शेती नूकसान झाले असून त्याचे काम प्रलंबित आहे. सदर काम यावर्षी पूर्ण होईल अशी आशा मी वे.को.लि.कडून बाळगतो. वे.को.लि.ने नंतर ज्या गावातील जमीन अधिग्रहीत केली आहे त्यामध्ये अधिभार ढिगाऱ्यांमुळे पूराचा फटका बसू शकतो. त्या गावांमध्ये चिखली टाकळी या गावांचा समावेश आहे. चिखली व टाकळी या गावाची मागणी आहे की त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, ओव्हरबर्डन (Overburden) डम्पिंगमुळे शेतामध्ये पाणी साचत असल्यास, त्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी नाले (Drains) तयार करून पाणी वाहून जाण्याची व्यवस्था करण्यात येईल. पावसाचे अचूक भाकीत करणे शक्य नसते. काही वेळा अल्प कालावधीत, उदाहरणार्थ एका तासात २०० मि.मी. इतका अतिवृष्टीचा पाऊस पडू शकतो, ज्यामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. अशा परिस्थितीत पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील. यामध्ये नाले बांधणे, पाणी साचलेल्या भागातून बाहेर काढण्यासाठी योग्य व्यवस्था करणे आणि गरजेनुसार अतिरिक्त जलनिस्सारण सुविधा उपलब्ध करून देणे यांचा समावेश असेल. |

## ५४) श्री. ज्ञानेश्वर भास्कर टोंगे, सरपंच, ग्रामपंचायत टाकळी, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सन २००६ मध्ये जी पूर परिस्थिती निर्माण झाली होती तेव्हा साखरा येथे डम्पिंग नव्हती. तेथे पाणी साचण्यासाठी भरपूर जागा उपलब्ध होती. आज त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात डम्पिंग करण्यात आली असल्याने भविष्यात महापूर येऊन शकतो. त्यावेळी ८५-९० टक्के शेती पाण्याखाली गेली होती व १०-१५ टक्के शेतीचे नूकसान झाले नव्हते. आज तर पूर परिस्थिती निर्माण झाली तर संपूर्ण गाव पाण्याखाली येऊ शकते. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, वे.को.लि.तर्फे सर्वेक्षण करण्यात येईल व योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. |

## ५५) श्री. दशरथ पाटील, टाकळी, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या क्षेत्रामध्ये वर्धा आणि पैनगंगा नदीचे संगम असल्याने या दोन नद्यांपैकी एका नदीला जरी पूर आला तर त्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात नूकसान होण्याची शक्यता आहे. मा. अध्यक्ष यांनी पाहणी केली तर त्यांना परिस्थितीची अनुभूती येईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, वे.को.लि.तर्फे सर्वेक्षण करण्यात येईल व योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील. |

## ५६) श्री. वसंत लक्ष्मणराव मुसळे, चिखली, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी चिखली गावाचे पुनर्वसन करण्याबाबत वे.को.लि. वणी नॉर्थ क्षेत्र, उपविभागीय अधिकारी, वणी, उपक्षेत्र प्रबंधक उकणी, क्षेत्र प्लॅनिंग ऑफिसर यांना दि. ०९/११/२०२० रोजी पत्र देऊन यासंबंधी तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सुचना केल्या होत्या. परंतु आजपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर मुद्दा वणी उत्तर क्षेत्राशी संबंधित आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आलेली नाही. यामध्ये चिखली व परमुंड या गावांचे पुनर्वसन प्रस्तावित होते. परमुंड या गावाचे पुनर्वसन झाले असून चिखली गावाचे आजपर्यंत पुनर्वसन करण्यात आले नाही. | |

**५७) श्री. दशरथ पाटील, टाकळी, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | चिखली या गावाची सद्य:स्थिती टाकळी या गावासारखीच आहे आणि भविष्यात फार गंभीर समस्या उद्भवणार आहे. त्यामुळे हा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. या समस्येची जाणीव असावी जेणेकरून भविष्यात वे.को.लि. व प्रशासनाला त्रास होणार नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

**५८) श्री. नरेंद्र रामदास नांदे, माजी सरपंच, ग्राम पंचायत साखरा, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या प्रश्नांची मौखिक उत्तरे देण्यात यावी. सेक्शन ४ लागू केला त्यावेळी काही प्रमाणात आमच्या गावातील जमीनी अधिग्रहीत करण्यात आल्या परंतु काही जमीनी सोडून देण्यात आल्या. पाणी फवारणी करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. सायलो मुळे धुळीचे प्रदूषण होणार आहे. मागील ५-१० वर्षात किती आरोग्य शिबीर घेण्यात आले याची माहिती देण्यात यावी. आमच्या गावात शेतीकरिता जमीन उपलब्ध नाही, रोजगार मिळत नाही व आरोग्याच्या समस्या देखील वाढलेल्या आहेत. त्यामुळे आमच्या गावाचे पुनर्वसन करण्यात यावे. गावामध्ये कुशल व अकुशल कामगारांकरिता रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा. | साखरा गावातील सुमारे १० टक्के जमीन अद्याप संपादनासाठी शिल्लक आहे. आमच्या प्रकल्प अहवालानुसार (Project Report) आवश्यक असलेली जमीन संपादित करण्यात आलेली आहे. भविष्यात प्रकल्पाचा विस्तार झाल्यास आणि अतिरिक्त जमिनीची आवश्यकता निर्माण झाल्यास, उर्वरित जमिनीच्या संपादनाचा विचार करण्यात येईल. सध्या प्रकल्प अहवालामध्ये नमूद केलेल्या आवश्यकतेनुसार जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. ओव्हरबर्डन (Overburden) डम्पमधून पावसाचे पाणी वाहून येत असल्यास, त्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी डम्पच्या सभोवती नाले (Drains) बांधण्यात येतील. तसेच, पावसाचे |

| | | |
|---|---|---|
| | | पाणी साचू नये व त्याचा सुरळीत निचरा व्हावा यासाठी मोठ्या आकाराचे जलनिस्सारण नाले (Major Drains) तयार करण्यात येतील. या उपाययोजनांद्वारे पावसाच्या पाण्याचा सुरक्षित व प्रभावी निचरा करण्यात येईल. काहींनी अशी शंका व्यक्त केली की सायलो (SILO) सुरू झाल्यानंतर धूळ प्रदूषण वाढेल. मात्र, माझे मत असे आहे की सायलो कार्यान्वित झाल्यानंतर धूळ प्रदूषणात लक्षणीय घट होईल. सायलो प्रणाली सुरू झाल्यानंतर सुमारे ९० टक्के रस्ते मार्गावरील कोळसा वाहतूक कमी होईल. तसेच, सायलोमध्ये सतत धूळ दमन (Continuous Dust Suppression) व्यवस्था कार्यरत राहणार आहे. याशिवाय, ७०० मीटर लांबीचा आणि १० मीटर उंचीचा विंड बॅरियर (Wind Barrier) उभारण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे धूळ प्रसारामध्ये मोठ्या प्रमाणात घट होईल. काहींचा असा समज आहे की सायलोमध्ये कोळसा भरण्याच्या प्रक्रियेदरम्यान पेलोडरद्वारे (Payloader Loading) होणाऱ्या लोडिंगप्रमाणे धूळ उडेल. परंतु प्रत्यक्षात तसे होणार नाही. सायलोमध्ये बंदिस्त (Closed Compartment) पद्धतीने कोळसा लोडिंग करण्यात येणार असल्यामुळे धूळ उत्सर्जन अत्यल्प राहील आणि पर्यावरणीय परिणामही कमी होतील.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, याबाबत सादरीकरणादरम्यान व जनसुनावणीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांनूसार माहिती देण्यात आली आहे. वे.को.लि.ने पुनर्वसनाच्या मुद्याची नोंद करून घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| | | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, साखरा येथील शाळेमध्ये पोषण आहार पूरविण्यात आले आहे. साखरा गावात रूपये १२.४० लक्षचे नाल्याचे बांधकाम करण्यासाठी खर्च करण्यात आले आहेत.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, नाल्याचे बांधकाम करण्यात आले किंवा कसे याबाबत वे.को.लि.ने तपासणी करावी.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, शाळांमध्ये विद्यार्थ्यांकरिता स्मार्ट वर्ग सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. साखरा, माथोली आणि जगद या गावांमध्ये सौर ऊर्जेवर चालणारे पथदिवे उभारण्यात येतील. वे.को.लि.तर्फे नवीन कंत्राट देताना त्यामध्ये प्रकल्पबाधित गावातील ८० टक्के स्थानिकांना रोजगार देण्याबाबतची अट घालण्यात येईल. |

५९) **श्री. वसंत लक्ष्मणराव मुसळे, चिखली, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | चिखली गावातील जमीनी अधिग्रहीत करताना १८, १९ व २० हे सर्वे क्रमांक सोडण्यात आले आहे. त्यामुळे शेती करणे अवघड झाले आहे. तसेच सन २०२४ मध्ये ९१, ९२ व ९३ या सर्वे क्रमांकाची जमीन सोडण्यात आली होती. परंतु ९१ व ९३ क्रमांकाची जमीन अधिग्रहीत केली व ९२ क्रमांकाची जमीन सोडून दिली. मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे सर्वेक्षण करण्याकरिता निवेदन देण्यात आले होते. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कोणत्याही खाण प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल केंद्रीय खाण नियोजन व रचना संस्था (CMPDI) द्वारे तयार करण्यात येतो आणि तो अंतिम मानला जातो. प्रकल्प अहवालामध्ये निश्चित करण्यात आलेल्या सीमारेषेबाहेरील जमिनीचे संपादन करता येत नाही. त्यामुळे प्रकल्पाच्या मंजूर हद्दीबाहेर असलेल्या जमिनीचा संपादनासाठी विचार केला जाऊ शकत नाही. |

६०) **श्री. दशरथ पाटील, टाकळी, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | चिखली व टाकळी या गावांच्या सभोवताली चार प्रकल्प झाले आहेत त्यामुळे या दोन्ही गावांमध्ये प्रदूषण, पूर परिस्थिती व वन्य जीवांचा त्रास सुरू झालेला आहे. या दोन्ही गावांचे पुनर्वसनाची जबाबदारी प्रशासनाने घेतली पाहिजे ही नम्र विनंती. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे स्रवांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले १६ सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(सुशिलकुमार राठोड)**
समन्वयक, पर्यावरणविषयक
जाहिर जनसुनावणी समिती तथा
उप-प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(तानाजी यादव)**
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(अनिल खंडागळे)**
अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा अतिरिकत
जिल्हादंडाधिकारी, यवमताळ,
जिल्हा यवतमाळ.